म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ६८६

REFBK-0001624

REFBK-0001624

९६२४

# केशवसुत आणि त्यांची कविता.

[ एक टीकात्मक निबंध. ]

लेखक,

**नरहर शंकर रहाळकर, बी. ए.,**

इंदूर.

प्रकाशक,

**काशीनाथ रघुनाथ मित्र,**

संपादक मनोरंजन, गिरगांव, मुंबई.

इ. स. १९१९.

कि. ०-८-०

# समर्पण.

महाराष्ट्र-कवितेसंबंधानें
ताटस्थ्य
स्वीकारणाऱ्या
सर्व महाराष्ट्रीय वाचकवृंदास.

Printed and Published by K. R. Mitra at the Manoranjan Press,
3, Sandhurst Road, Girgaon, Bombay.

# अनुक्रमणिका.


| | | |
|---|---|---|
| १. | विषयप्रवेश. | १ |
| २. | कुलवृत्त. | २ |
| ३. | शिक्षण. | ३ |
| ४. | नोकरी. | ५ |
| ५. | सृष्टिदेवीचें दर्शन व तल्लीनवृत्ती. | ६ |
| ६. | परलोकवास. | ७ |
| ७. | कवितांचें प्रकाशन | ८ |
| ८. | कविमित्र. | १० |
| ९. | स्वभाव. | १२ |
| १०. | रहाणी. | १४ |
| ११. | गृहचित्र. | १४ |
| १२. | काव्यवृत्ति. | १५ |
| १३. | कवितेविषयीं त्यांची कल्पना. | १५ |
| १४. | त्यांचे आवडते कवि. | १६ |
| १५. | त्यांच्यांतील कवित्वगुण. | १६ |
| १६. | चेहरेपट्टी. | १७ |
| १७. | चतुर्दशपदी कविता. | १७ |
| १८. | इतर लेख. | १९ |
| १९. | काव्याविषयीं विचार. | २० |
| २०. | कविसंमेलनाची कल्पना. | २० |
| २१. | ईश्वराविषयीं विचार. | २२ |
| २२. | निर्यमक कविता. | २४ |
| २३. | कविता लिहिण्याची पद्धत. | २४ |

२४. विनायक कोंडदेव ओकांची भेट. ... ... २५
२५. अर्वाचीन कवींचे वर्ग व त्यांत केशवसुतांचें स्थान. ... २६
२६. त्यांची कविता व तिचें वर्गीकरण. ... ... २७
२७. कवितांच्या कालानुक्रमानुसार वर्गीकरणाचे अनौचित्य. २८
२८. विषयानुरूप वर्गीकरण ( १४ वर्ग ) ... ... २८
( १ ) भाषांतरित ( संस्कृतवरून ) ( इंग्रजीवरून ) २९
( २ ) प्रेमविषयक. ... ... ... ३२
( ३ ) व्यक्तिविषयक. ... ... ... ३८
( ४ ) ऐतिहासिक. ... ... ... ४२
( ५ ) विनोदात्मक. ... ... ... ४४
( ६ ) पौराणिक. ... ... ... ४४
( ७ ) संवादात्मक. ... ... ... ४५
( ८ ) नैतिक. ... ... ... ४७
( ९ ) भूतदयात्मक इ० ... ... ... ४९
( १० ) सृष्टिसौंदर्यात्मक. ... ... ... ५२
( ११ ) किरकोळ. ... ... ... ५७
( १२ ) कवि आणि कविता यांसंबंधीं. ... ६०
( १३ ) मनाला धीर देणारे, राष्ट्राला जागे करणारे, इ० ६४
( १४ ) तात्विक व गूढ. ... ... ... ६९
२९. केशवसुतांच्या कवितेचें बाह्यांग. ... ... ७४
३०. शब्द. ... ... ... ... ७५
३१. वृत्त. ... ... ... ... ७६
३२. कवितेचा मथळा. ... ... ... ७६
३३. कल्पना. ... ... ... ... ७६
३४. उपसंहार. ... ... ... ... ७७
३५. परमेश्वरप्रार्थना. ... ... ... ... ८०

१६२४

# प्रस्तावना.

सुमनारविंद-परिचया । मधुकरां मध्यस्थ कासया ? ।
मकरंद तर्यीं त्या ओढाया । समर्थ आहे ॥

प्रस्तुत टीकात्मक निबंधाचे लेखक—आमचे मित्र श्रीयुत नरहर शंकर रहाळकर—यांचा रसिक महाराष्ट्रवाचकांशीं परिचय करून देण्यास उद्युक्त होणें ह्मणजे मधुकराचा मकरंदपूर्ण अशा कमळाशीं परिचय करून देऊं पाहण्या-सारखेंच हास्यास्पद होय ! नुकताच मासिक मनोरंजनाच्या संपादकांनीं, जुलै तेआक्टोबर १९१८ च्या अंकांतून चार हप्त्यांनीं, त्यांचा निबंध प्रसिद्ध करून, तो महाराष्ट्र वाचकांपुढें ठेविलेलाच आहे. शिवाय त्यांची कविता आज कित्येक वर्षें 'काव्यरत्नावलि,' 'मासिक मनोरंजन' आदिकरून मासिक पुस्तकांतून प्रसिद्ध होत असल्यामुळें त्यांची नव्यानें ओळख करून देण्याची आवश्यकता राहिलेली नाहीं. उलट आम्हींच त्यांचे सप्रेम आभार मानले पाहिजेत. कां कीं, त्यांनीं आह्माला ह्या आपल्या टीकात्मक ' निबंधाला प्रस्तावना लिहिण्याची—क्वचित्च लाभणारी अशी—संधि आणून दिली. हा असा बहुमान फार थोड्यांच्याच वांट्याला येतो. त्यांतूनहि विशेष आनंदाची व अभिमानाची गोष्ट ही कीं, प्रस्तुतचा निबंध—ज्यांच्या निधनानंतर आह्माला त्यांचें चरित्र "मासिक मनोरंजनां"तून देण्याची पाळी आली होती त्या आमच्या कविश्रेष्ठ मित्रांच्या—अर्थात् केशवसुतांच्या—कवितासंग्रहावर आहे. मृत मित्रांच्या स्मृतीचे रम्य चल चित्रपट कोणास आनंदप्रद होणार नाहींत ? त्यांतून ज्या चित्रपटांतून कविश्रेष्ठ मित्राच्या आनंदमूर्त ' आणि अमर अशा आत्म्याचा दर्शनलाभ घडतो असे शब्दब्रह्मानें रंगविलेले चित्रपट तर फारच आनंददायी होत. रंगभूमीवर सद्यःकाळीं पहावयास मिळणाऱ्या चल चित्रपटापेक्षां हा शब्दब्रह्माचा अभिनव चित्रपट पाहणें कविताभक्तांनां आणि रसिक महाराष्ट्रवाचकांनां अत्यंत आल्हादजनक व रमणीय वाटेल, असा आमचा तर्क आहे.

आधुनिक कविवर्गापैकीं ज्या कवीची उपलब्ध असलेली सर्व कविता आज समग्र छापून बाहेर पडली आहे असे कवि केशवसुतच होत. ज्यांनीं केवळ आपल्या प्रतिभेच्या आणि स्फूर्तीच्या सामर्थ्यावरच महाराष्ट्र-कवितादेवीच्या प्रदेशांत, तत्पूर्वीचे सारे चोखाळलेले मार्ग सोडून देऊन नवाच स्वतंत्र मार्ग काढला, त्या कविश्रेष्ठांना समग्र कवितामुद्रणाचा हा अग्रमान मिळावा हें रास्तच होय. पण हा मान मिळण्यास त्यांच्या निधनानंतर एका तपाचा काळ लोटावा लागला, ही गोष्ट मोठ्या सखेदाश्चर्याची आहे! वास्तविक पाहतां केशवसुतांची कविता त्यांच्या निधनानंतर लगेच प्रसिद्ध व्हावयाची. मा. म. चे संपादक श्रीयुत मित्र यांनीं तसें करण्याची आपल्याकडून कंबरहि बांधली होती. पण व्यावहारिक अनधिकारित्व त्यांच्या आड आल्यामुळें त्यांना मूग गिळून स्वस्थ बसण्यापलीकडे या बाबतींत कांहीं करितां आलें नाहीं, यामुळें त्यांचा नाइलाज व मनोभंगच झाला! असो. त्यानंतर एक तपानें कां होईना पण केशवसुतांची समग्र कविता पहिल्यानें प्रकाशन करण्याचें जें श्रेय मिळालें तें ज्या 'करमणूक' पत्रांत केशवसुतांची कविता प्रथमतः प्रकाशित झाली त्या पत्राच्या संपादकांसच, ही गोष्टहि कांहीं कमी आनंद मानण्यासारखी नाहीं; आणि हा योगायोग देखील एका दृष्टीनें अपूर्वच होय. श्रीयुत ह. ना. आपटे यांच्याकडून केशवसुतांच्या कवितेस त्यांच्या विभवसंपन्न आणि प्रसादपूर्ण अशा लेखणींतून उतरलेल्या सुंदर प्रस्तावनेची जोड मिळून तिची खरी तेजस्विता प्रकट झाली असती, ह्मणजे तर ही अपूर्वता विशेषच रमणीय झाली असती. पण असा योगायोग नव्हता! असो. ही तेजस्विता प्रकट करण्याचें काम–ज्या "कोणीतरी"नें केशवसुतांच्या हयातींतच 'त्यांच्या सर्व कविता–रत्नांचा हार गुंफण्यास कोणी सरसावित नाहीं काय;' ह्मणून टाहो फोडला होता–त्यांच्या हातूनच व्हावें असा योगायोग होता. आतां हें काम श्रीयुत रहाळकर यांनीं कशा प्रकारें बजाविलें आहे, यासंबंधानेंच प्रस्तुत प्रस्तावनेंत आह्मास दोन शब्द लिहावयाचे आहेत.

प्रस्तुत टीकाविषयक लेख लिहिण्याच्या आपल्या पात्रतेसंबंधानें ग्रंथकार साशंक असल्याचें त्यांनीं आपल्या लेखाच्या आरंभींच नमूद केलें आहे. गद्यलेखनाच्या अनभ्यस्तपणामुळें त्यांच्याकडून वरील उद्गार निघाले असतील. हें त्यांच्या विद्वत्तेस आणि विनयसंपन्नतेस साजेसेंच आहे. पण ही गद्यलेखनाची हिमशिला त्यांना केव्हांतरी एकदां फोडलीच पाहिजे होती, व हें कार्य केशवसुतांच्या कवितेच्या प्रकाशनानें व कसलेल्या टीकाकारांच्या मौनव्रतानें घडवून आणलें. निबंधकार स्वतः कवि आहेत. तसेच ते सहृदय, रसिक, प्रेमळ आणि गुणग्राही आहेत, हें त्यांनीं आपल्या निबंधाच्या शिरोभागीं उद्धृत केलेल्या कवितेवरूनच स्पष्ट होत आहे. इतकी जय्यत सामुग्री* असल्यावर व ज्या विषयावर कांहीं लिहावयाचें त्यासंबंधानें अतिशय कळकळ व प्रेम असल्यावर लेखनाची स्फूर्ति होण्यास आणखी काय पाहिजे ? त्यांत आणखीहि एक विशेष गोष्ट ही कीं, ज्या कवींच्या कवितेसंबंधानें लिहावयाचें ते कविश्रेष्ठ निबंधकारांचे परम मित्र. मृत मित्राच्या ऋणांतून मुक्त होण्याची संधि अनायासें आली असतां ती कोण व्यर्थ दवडील ? 'केशवसुतांची कविता' या पुस्तकास श्रीयुत आपटे यांनीं प्रस्तावना लिहिण्यांत धरलेलें मौनव्रत, व इतर टीकाकारांनींहि त्यासंबंधानें स्वीकारलेली, ताटस्थ्यवृत्ति यामुळें महाराष्ट्र–कविताभक्तांस एक नवीन टीकाकार लाभला याबद्दल आह्मीं त्यांच्यातर्फें प्रकृत टीकाकारांचें प्रेमपुरःसर अभिनंदनच केलें पाहिजे, व तें आह्मी मोठ्या आनंदानें करितों.

महाराष्ट्रवाङ्मयामध्यें आजकाल गद्यग्रंथांची जितकी भर पडत आहे तितकी भर काव्यग्रंथासंबंधानें नाहीं. पण केव्हांहि हें असेंच असावयाचें. काव्यविषयाचा एक टापू कादंबरीच्या वाङ्मयानें जिंकून टाकल्यामुळें सद्यःकालीं तो मर्यादित झाला आहे. ही गोष्ट लक्ष्यांत ठेविली ह्मणजे कवित-

---

* याशिवाय त्यांनीं शेक्सपीअरकृत "कोरिओलेनस" या नाटकाचें व कालिदासकृत 'उत्तररामचरित्रा'चें अनुक्रमें गद्यांत व संगीतांत भाषांतर केल्याचें आह्मास ठाऊक आहे.

ग्रंथांच्या त्रोटकपणाबद्दल कुरकुर करण्यालाहि विशेषशी जागा रहात नाहीं. त्यांतूनहि साधारण वाचकांचा नाट्यकादंबऱ्यांकडे जसा ओढा असतो तसा तो कवितेकडे अर्थातच नसतो. तेव्हां टीकाकार तरी वाचकांस न रुचणाऱ्या काव्यविषयावर लिहिण्यास कसे सरसावतील? वाचकांच्या आवडीचें गद्यवाङ्मय आजकाल निरनिराळ्या मासिकांतून, मालांतून, आणि स्वतंत्रपणेंहि भाराभर बाहेर पडत असतांहि त्यांची योग्य छाननी करणारा एकादा मार्मिक टीकाकार जर पुढें येत नाहीं, तर कविताग्रंथांवर टीकात्मक लेख लिहिणाऱ्या टीकाकाराची अपेक्षा करणें कशाला पाहिजे? बाहेर पडत असलेल्या ग्रंथांचें यथान्याय गुणदोषपरीक्षण जर न होईल तर ग्रंथकारहि बेताल होतील व वाचकांची सदभिरुचिहि वाढणार नाहीं. याकरितां ग्रंथसंपत्ति जसजशी वाढत जाईल तसतशी त्यांत मार्मिक व चोखाळ अशा टीकाग्रंथांचीहि भर पडणें अत्यावश्यक आहे. आंग्लवाङ्मयाच्या इतिहासांत ही गोष्ट फार ठळकपणें अनुभवाला आलेली आहे. मिल्टन कवीच्या "स्वर्गच्युति" ( Paradise Lost ) या काव्यावर प्रख्यात निबंधकार ॲडिसन यांचे Spectator मधून जेव्हां एकामागून एक असे १०।१२ मार्मिक लेख आले, तेव्हां कोठें सामान्य वाचकांस त्या कवीच्या काव्याचा रसास्वाद घेतां आला, व कवीचा यशोदुंदुभीहि मग सर्वत्र दुमदुमूं लागला. कार्लाइलसारखा प्रख्यात व खंदा लेखक, पण त्याचा "Sartor Resartus" ( स्यूत सौतिक ) 'अर्थात् वस्त्रप्रावरणाची मीमांसा,' हा ग्रंथ छापण्यास कोणीहि प्रकाशक धजेना. ह्मणून ग्रंथकारास प्रथमतः तो एका मासिकांतून हप्त्याहप्त्यानें प्रसिद्ध करावा लागला. तो असा हप्त्याहप्त्यानें बाहेर येत असतां लेखकासंबंधानें व संपादकासंबंधानें कांहीं वाचकवर्ग अत्यंत नाराज झाला, व लेखक त्यांच्या थट्टेला आणि उपहासालाहि पात्र झाला! पण पुढें जेव्हां प्रख्यात एमर्सनसारखा मार्मिक टीकाकार त्याला भेटला, व त्याच्या ग्रंथाबद्दल मोठ्या अभिमानानें व जोरदारपणें त्यानें आपले प्रशंसोद्गार लोकांपुढें मांडले, तेव्हां कोठें लोकांचें लक्ष्य त्या ग्रंथाकडे वेधलें आणि मग अवघ्या दोनतीन आठवड्यांत त्या ग्रंथाची तीस

हजारांची आवृत्ति हां हां ह्मणतां उडून गेली ! हें सांगण्याचें प्रयोजन एवढेंच कीं, मार्मिक टीकाकारांच्या अभावीं चांगल्या ग्रंथांची व्हावी तशी निवड होत नाहीं, व ग्रंथकारांस भवभूति कवीच्या " येनाम केचित् " या उक्तीवर भिस्त ठेवून बसावें लागतें ! विशेषतः ग्रंथसमृद्धि ज्या वेळीं अधिक होत असते त्या वेळीं तर अशा टीकाविषयक ग्रंथांची फारच आवश्यकता असते. त्यांच्या अभावीं वाचकांची दिशाभूल होण्याचाच विशेष संभव असतो. सामान्य वाचकांस पुस्तकाची निवड करण्याचें ज्ञान क्वचितच असतें. वाचकवर्गाचा उत्साहभंग व कालापव्यय न व्हावा हें जर श्रेयस्कर असेल, तर चोख्या आणि शाबरी व्रताचा अंगिकार करणाऱ्या प्रेमळ टीकाकारांचा प्रादुर्भाव होणेंच सर्वथैव इष्ट होय. नाहींतर प्रत्येक वाचकास बाहेर पडणारा प्रत्येक ग्रंथ वाचून पाहून त्यांतून मग त्यास चांगले ग्रंथ कोणचे हें ठरवावें लागेल. पण हेंच काम जर एकाद्या अथवा निरनिराळ्या मार्मिक टीकाकारांकडून होईल तर अशा वाचकांचे किती तरी श्रम वांचतील ! शबरी भिल्लीण श्रीरामभद्राला, जर आपल्या दांतानें चावून व जिभेनें चोखून पाहून बोरें आणून न देती तर रामचंद्राला—कितीतरी आंबट व कडवट बोरें चाखावीं लागून आंबट अथवा कडवट तोंड करण्याची पाळी आली असती ! परंतु शबरीनें योग्य सावधगिरी ठेवून ती त्याजवर येऊं दिली नाहीं. हीच गोष्ट प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या ग्रंथांस लागू आहे; आणि एवढ्याचकरितां आह्मी ह्मणतों, कीं, आह्मांस सध्यां शाबरीव्रताचे टीकाकार पाहिजे आहेत.

प्रकृत निबंधकार हे ह्या पंथांतील एक टीकाकार आहेत. त्यांच्या वांट्याला प्रथमच जो कवि आला तो ' कवींचा कवी ' होण्याला लायक असा. एकाद्या उत्साही शिकाऱ्याला प्रथमतः जशी वाघाचीच शिकार लाभावी त्यापैकींच हा प्रकार घडला आहे. तेव्हां हेंसुद्धां एक प्रकारचें भाग्यच होय. आतां आमचे निबंधकार आपली कामगिरी कशी काय बजावीत आहेत तें पाहूं.

निबंधकारांनीं प्रथमत: कवीचें कुलवृत्त, शिक्षण, व्यासंग, राहणी, स्वभाव, उदरनिर्वाहाचा व्यवसाय, इत्यादि देऊन त्यांचें गृहचित्र रेखाटलें आहे; आणि नंतर ते त्यांच्या काव्योद्यानांत शिरले आहेत. तेथें शिरतांच सर्वच तरुलता पुष्पित होऊन दरवळलेल्या पाहून व त्यांच्या घमघमाटानें आणि रमणीयत्वानें मोहून जाऊन त्यांची काय अवस्था झाली असेल याची कल्पना खऱ्याखुऱ्या पुष्पोद्यानांत रसास्वाद घेत सहल करण्याचा ज्याला लाभ घडला असेल त्याला सहज करितां येईल.

अंगीकृत विषय कसाहि असला तरी तो सामान्य वाचकांसहि कळेल अशा रीतीनें सुगम आणि सुबोध करून तो त्यांच्यापुढें त्यांतील गुणदोष दाखवून मांडणें हें चांगल्या टीकाकारांचें मुख्य काम असतें. तें योग्य तऱ्हेनें बजावण्याकरितां निबंधकारांनीं त्यांच्यापुढें असलेल्या केशवसुतांच्या समग्र कवितांचें विषयानुरूप वर्गीकरण केलें आहे. कवितांच्या अविश्वसनीय अशा कालानुक्रमावर विश्वास ठेवून अनुमानें व तर्क बांधीत जाणें अर्थात्च धोक्याचें होतें. याशिवाय तिसराहि एक वर्गीकरणाचा मार्ग होता. तो ह्मटला ह्मणजे कवीच्या कवितांचा अनुक्रम त्यांच्या उत्कृष्टत्वावरून व सरसनिरसपणावरून लावावयाचा. पण हा मार्गहि रुचिवैचित्र्यामुळें लोकांस कितपत रुचला असता याची शंकाच आहे. तेव्हां कोणत्याहि प्रकारें मतभेदाला सवड न देतां, टीकाकारांनीं विषयानुरूप वर्गीकरण करण्याचा जो मार्ग अवलंबिला आहे तोच आमच्या मतें विषयाचें योग्य प्रकारें आकलन होण्यास फार सोयीचा व उपयुक्त असा आहे. विद्यार्थ्यांना वनस्पतिशास्त्राचे पाठ देण्यास सुलभ जावें ह्मणून ज्याप्रमाणें तज्ञांस वनस्पतींचा रचना-विशेष ठरवून मग वर्गवारीप्रमाणें बाग उठवावा लागतो त्याप्रमाणें केशवसुतांच्या काव्योद्यानांत विहार करणाऱ्या रसिकांस बरोबर रसास्वाद घेतां यावा ह्मणून आमचे मालाकार त्यांच्या कवितांचें योग्य वर्गीकरण करीत आहेत, आणि असें वर्गीकरण केल्यानंतर प्रत्येक वर्गातील एकेक एकेक पुष्प तोडून घेऊन त्याचा परिमल इतस्तत: उधळीत, हळुहळू मंद गतीनें पावलें टाकीत, पुढें पुढें जात आहेत.

आतां आमच्या महाराष्ट्रवाचकांनींहि त्यांच्याच पावलांवर पावलें टाकीत— केशवसुतांच्या कवितोद्यानांतील एकेक वेंचकें पुष्प तोडीत, त्याचा सुवास ग्रहण करीत, व मालाकार उधळीत असलेल्या परिमलाची छाननी करीत— त्यांच्याच मागोमाग जावें ह्मणजेच त्यांस परिमल—सर्वस्व चोखाळ-पणानें लुटतां येईल. निबंधकारांच्या टीकेची योजनाच अशी आहे, कीं, ते आपल्या वाचकांस केशवसुतांची प्रत्येक कविता मूळांतून वाचावयाची जिज्ञासा व कौतुक उत्पन्न करितात. ते केशवसुतांशीं महाराष्ट्रवाचकांचा परिचय केवळ हस्तांदोलनविधीनें करून न देतां प्रत्यक्ष हृदयान्दोलनाच्या द्वारें करून देत आहेत; व हें करण्यास त्यांस प्रत्यक्ष आत्म्याआत्म्यांच्या गांठी घालून द्याव्या लागत आहेत. हस्तान्दोलनाच्या औपचारिक परि-चयापेक्षां हा आत्म्याआत्म्यांचा संयोग किती रमणीय आहे हें आत्मा-नुभवानेंच कळणारें असल्यामुळें केशवसुतांशीं तसा स्नेह जोडण्याची लालसा बाळगणाऱ्या प्रत्येक महाराष्ट्रवाचकानें मालाकारांनीं चोखाळलेल्या मार्गानेंच गेलें पाहिजे. "केशवसुतांची कविता" हें पुस्तक व श्रीयुत रहाळकरांचा हा निबंध हीं दोन्ही मिळून एकच ग्रंथ आहे असें समजूनच वाचकांनीं ह्या रमणीय काव्योद्यानाकडे वळलें पाहिजे.

केशवसुतांची संग्रहित कविता अगदीं थोडी कारण खुद्द कवींनींच आपली सर्व नीरस कविता अग्न्यर्पण केली. तेव्हां अर्थातच उरलेली कविता वेंचकच उरली. संग्रहित कवितांची संख्या पाहतां, व वीसएकवीस वर्षांच्या त्यांच्या कविताकाळावरून सरासरी काढतां, दर वर्षास सहा कविताच पडतात. केशवसुतांच्या कविता इतक्या अल्प असल्याचें पाहून सकृद्दर्शनीं फारच चमत्कारिक वाटतें. पण श्रीयुत रहाळकरांनीं पृ. २४ वर त्यांच्या कविता लिहिण्याच्या पद्धतीसंबंधानें जे विचार प्रदर्शित केले आहेत ते पाहिले ह्मणजे काव्यचिंतनांत कवि कसे निमग्न होत असत, व कवितादेवीच्या उज्ज्वल प्रदेशांत दिव्य दृष्टीनें संचार करावयास लागून त्यांतील दिव्य गूढें ते कशीं उकलीत, ह्याकडे नजर पोंचविली ह्मणजे आपोआपच सर्व शंकानिरसन होतें, व 'ह्मातारी'वरील कविता बाहेर पडण्यास वर्ष दीड वर्ष कां लागतें

याचेंहि गूढ आपोआप उकलतें. तेव्हां अशा वेंचक १२६ कवितांवर टीकात्मक निबंध लिहिणें व त्यांतील सर्व गुणवैभव प्रकट करणें हें काम जितकें कठिण तितकेंच तें विस्ताराचेंहि आहे, व तसें करावयास कालहि बराच लागता. ह्मणून टीकाकारांनीं अगोदरपासूनच आपलें क्षेत्र मर्यादित करून घेऊन केशवसुतांच्या कवितेंतील विशेष रमणीय व गूढ अशा कवितांचें रहस्य प्रकट करितांना मात्र थोडा विस्तार, व इतर कवितांच्या संबंधानें त्यांतील रस चाखतां येईल इतकी मार्मिक टीका करून, आपलें कार्य मोठ्या बहारीनें उरकलें आहे. केशवसुतांची सर्व कविता 'वीणाकाव्य' असल्यामुळें अर्थात् ती भावनामय आहे. तेव्हां टीकाकारांनींहि अर्थातच ज्या भावनांनीं प्रेरित होऊन कवि कविता लिहीत आहेत–त्या भावनांचें रहस्य सांगण्याची खबरदारी घेण्यांत मोठी मार्मिकता दाखविली आहे, व हें कामहि त्यांनीं मोठ्या आटोपशीरपणें केलें आहे.

घुबड ( निबंध पृष्ठ ३१ ), दुर्मुखलेला ( पृ. ३८ ), गांवीं गेलेल्या मित्रास ( पृ. ३९ ), वातचक्र ( पृ. ५५ ), धूमकेतू व महाकवि ( पृ. ६२ ), फिर्याद ( पृ. ६४ ), सतारीचे बोल ( पृ. ६५ ), निशाण ( पृ. ६८ ), ह्मातारी ( पृ. ७१ ), झपूर्झा ( पृ. ७२ ), व हरपलें श्रेय ( पृ. ७३ ), ह्या कवितांवर टीकाकारांनीं मोठ्या बहारीनें प्रकाश पाडला आहे.

'घुबडा'च्या भीषण घूत्काराने उत्पन्न होणारा भयानक रस, 'दुर्मुखले'ल्या कवीची दर्पोक्ति, 'गांवीं गेलेल्या मित्रास' यांतील कविहृदयीं तेवत असणारी देशाभिमानाची ज्योत, 'वातचक्रांत' गिरक्या खात वाचकहि आकाशांत जात असल्याचा होणारा भास, 'धूमकेतू व महाकवि' यांच्यांतील साम्य, 'फिर्यादीं'तील कवितादेवीची विनवणी व काव्याविषयीं कवीच्या कल्पना, 'सतारीच्या बोला'बरोबर कवीची एकतानता होऊन त्यांची विश्वभर पसरणारी विभूति, 'निशाणां'तील उत्साहप्रेरणा, 'नवा शिपाई'यांतील उदात्त शांतिसाम्राज्य, 'तुतारी व स्फूर्ति'यांमधील रूढिदंभावरील हल्ला, व स्फूर्तिच्या दिव्य मद्याचें प्राशन, 'ह्मातारीं'तील कल्पनेची उच्च भरारी, 'झपूर्झां'तील कवीच्या समाधीची फोड, 'हरपलें श्रेय' यामधील कवीचें आदर्शरूप ध्येय, इत्यादि कविभाव प्रकट करण्यांत रममाण होणाऱ्या टीकाकारांच्या प्रसन्न,

मनोहर, आणि तेजस्वी वाणींत कविहृदयाशीं त्यांचें होणारें तादात्म्य उत्कटपणें निदर्शनास येतें. केशवसुतांची मूळ कविता व टीकाकारांची त्यावरील टीका हीं दोन्ही लक्ष्यांत घेऊन एकादा कुशल त्रित्रकार जर नवीन चित्रपट रंगवूं ह्मणेल तर ते फार हृदयंगम, रमणीय आणि बहारीचे असे उतरतील; इतके कीं, या चित्रपटांच्या द्वारेंच त्या चित्रकाराची कीर्तिहि अनंत काळपर्यंत टिकेल ! पण महाराष्ट्रीय कवींच्या गांठीं असे उत्कृष्ट चित्रकार मिळण्याइतकें पुण्य कोठें आहे ?

निबंधाच्या ६ व्या पृष्ठावर टीकाकारांनीं केशवसुत गिरणेच्या पात्रामधील एका खडकावर नदींत पाय सोडून बसल्याचें व निसर्गसौंदर्याशीं तन्मय झाल्याचें जें सुंदर चित्र रेखाटलें आहे तें पाहिलें ह्मणजे हृदय आनंदानें उचंबळून येतें, व त्यांच्या कवितेवरील मार्मिक टीका वाचीत असतांहि असेच मनोहर चित्रपट नेत्रांपुढून चल चित्रपटाप्रमाणें सरकूं लागून, उत्तररामचरित्रांतील प्रथमांकांतील चित्रदर्शनप्रसंगाची स्मृति होते.

'घुबड'या कवितेवर जर चित्रपट काढावयाचा तर कवि आपल्या घराच्या खिडकींत बसला आहे, समोर एक चिंचेचें झाड असून त्यावर एक घुबड ऊंहुः ऊंहुः करीत बसला आहे, कवि त्याच्यावर चरफडून त्यास ह्मणत आहेः—"जा, निघ तेथुनि ! काळें कर तूं येथुनि सत्वर ! " प्रसंग मध्यरात्रीचा असून सर्वत्र काळाकुट्ट अंधार पडला आहे, असा पार्श्वभाग देऊन कवीच्या नैराश्यवृत्तीचें जर चित्र काढलें तर तें किती हृदयंगम होईल ? तसेंच ' दुर्मुखलेला कवि ' यावर दोन चित्रपट होण्यासारखे आहेत. पहिल्यांत कवीचा मेंग्या चेहेरा पाहून पंतोजी त्याचा धिक्कार करीत आहेत असा, व दुसऱ्यांत कवीच्या डोळ्यांत विलक्षण तेज चमकूं लागून तो गुरूजीस सांगत आहे कीं:—" माझ्या दुर्मुखल्या मुखामधुनि या चालावयाचा पुढें । आहे सुंदर तो सदा सरस वाङ्निष्यन्द चोहींकडे ॥" "स्वप्न" ( चुटका ४४ वा ) ह्या कवितेंतील कल्पनेच्या भरारीचें चित्र अद्भुत रसाचें उत्तम द्योतक होईल. कवि स्वप्नांत आपल्या बाहूंस हंसाचीं

पिसें लावून अंतरालांत उड्डाण करितो. तो एका तेजोमय ताऱ्यावर जातो. तेथें प्रियेचें चिंतन करितांच तीहि तेथें येते. तीं दोघें एकमेकांच्या कंठांत हात घालतात तोंच पायाखालील तारा तुटून पडतो!

आतां 'रांगोळी घालतांना पाहून' ही कविता घेऊं. एका पतिव्रता स्त्रीनें द्वारापुढील अंगण सारवून त्यावर तिनें रांगोळीनें मध्यें स्वस्तिक काढून बाजूला सूर्यचंद्र, नक्षत्र-माला, पद्मचक्रादि देवांचीं आयुधें अशा नाना आकृति काढल्या आहेत, व त्यापुढेंच बसून ती तोंडानें कांहीं गीत गात आहे व त्यायोगें सर्वत्र शांत रस दाटून गेला आहे. अशा समयीं तेथें कवि येतो व एक पापी मनुष्यहि येतो. कवि त्यास सांगतो, कीं, "ह्या साध्वीच्या दरवाजापुढें हें सुदर्शनचक्र आहे. पापवृत्ति टाक. हा स्वर्भूसंगम आहे. सूर्यचंद्र हिच्या दरवाज्यांत पहारा करीत उभे आहेत. ते पहा!" असा चित्रपट काढल्यास किती रमणीय होईल ? असे एक कीं दोन किती प्रसंग ह्मणून दाखवावे. पुष्कळशा कवितांतून असे रमणीय प्रसंग निवडून दाखवितां येतील. पण तसें करणें फार विस्ताराचें होईल एवढ्याकरितां केवळ कविता व चित्रपट यांच्या संयोगाची एक दिशा दाखवण्याकरितांच वरील प्रसंगांचा उल्लेख केला, व हें सुचावयाचें कारण तरी टीकाकारांची टीकाच होय. इंग्रजी काव्यांतील कांहीं प्रसंग साधून असे चित्रपट काढल्याचें पुष्कळांनीं पाहिलें असेल. आपल्याकडील चित्रकाव्यांपेक्षां ह्या अशा चित्रपटांची योजना जास्त बहारीची आणि सामान्य वाचकांनां काव्याची अभिरुचि लावण्यासहि ती फार फायदेशीर होईल, असें आह्मास वाटतें, आणि ह्मणूनच आह्मीं येथें ह्याचा उल्लेख केला. पण ह्या चित्रपटांतील रंग मात्र शाश्वत टिकणारे नव्हेत. कवितेंतील शब्दचित्रांचे रंग केव्हांहि उडून जाणारे नाहींत. उलट अशा टीकांनीं त्यांची खुलावट वाढेल, ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.

केशवसुत हे गुरुवर्य आगरकरांचे चेले असल्याबद्दल पृ. ३९ वर उल्लेख आहे. पण तो 'दुर्मुखलेला' या कवितेंतील त्यांच्या दर्पोक्तीसंबंधानें केलेला आहे. पण केशवसुतांची कविता वाचणारांस आह्मास एक गोष्ट

प्रमुखत्वानें सांगावयाची आहे ती हीच कीं, केशवसुत हे आगरकरांचे चेले असल्यामुळेंच त्यांनां कवित्वाची इतकी गोडी लागली. कारण, आगरकर हे त्या वेळीं इंग्रजी ६।७ इयत्तांस इंग्रजी कविता शिकवीत असत, व कविता शिकविण्याची त्यांची पद्धत कवीच्या हृदयाशीं विद्यार्थ्यांच्या मनोवृत्तींचें तादात्म्य करुन देणारी असे. त्यामुळें पुढें होणाऱ्या कवीवर त्यांच्या शिकवणीचें कार्य झालें असल्यासहि कांहीं नवल नाहीं. दुसरी गोष्ट अशी कीं, केशवसुतांनीं रूढि, दंभ, धार्मिक व सामाजिक अंधाचार यांवर कोरडे ओढून जी जागृति देणारी जोरदार कविता लिहिली आहे तिजकडे नजर पोंचविली ह्मणजेहि गुरूंच्या विचारांची छाप शिष्याच्याहि विचारांवर कशी पडली होती, याचेंहि अनुमान करितां येतें. इ. स. १८८५ ते १८८९ पर्यंत केशवसुत पुण्यास न्यू. इं. स्कूलमध्यें होते. त्या वेळचे प्रो. आगरकरांचे त्यांच्या पत्रांतून येणारे लेख पाहिले ह्मणजेहि त्यांच्या लेखांची छाप केशवसुतांच्यावर कसकशी बसत गेली असावी याचाहि उलगडा करितां येईल. याशिवाय टीकाकारांनीं दिलेल्या आवडत्या कवींचें वाचन—याचाहि परिणाम त्यांच्या कवितेवर झाला असल्याचें स्पष्ट दिसतें. त्यांत मूळची प्रतिभा, स्फूर्ति, आणि कल्पकता असल्यावर वर निर्दिष्ट केलेल्या परिस्थितीचें जें कार्य व्हावयास पाहिजे तेंच व्हावयाचें. हा उल्लेख येथें करण्याचें प्रयोजन एवढेंच कीं, ज्या देशभक्तानें न्यू इं. स्कूल ही संस्था प्रथम काढली, त्याच्या व त्याच्या अनुयायांच्या विचारांची मुद्रा त्याच्या शिष्याच्या मनोभूमीवर किती व कशी जोरदारपणें उमटली याची बरोबर कल्पना केशवसुतांची कविता वाचीत असतां वाचकांस बरोबर व्हावी.

केशवसुतांनीं एकादें महाकाव्य लिहिण्यास हातीं घ्यावें ह्मणून निबंधकारांनीं त्यांस लिहिलें असतां, तें लिहिण्याची आपली अद्याप पात्रता नाहीं व अनुकूल अशी मनस्थितिहि नाहीं ह्मणून उत्तरीं लिहिलें. याच उत्तरांत "गेल्या शंभर वर्षांत नांव घेण्यासारखें एकहि महाकाव्य निर्माण झालें नाहीं. तर तें कोणी तरी प्रतिभासंपन्न कवींनींच हातीं घेतलें पाहिजे," असेंहि केशवसुत लिहितात. तेव्हां गेल्या १०० वर्षांत एकहि नांव घेण्या-

सारखें महाकाव्य न होण्याचीं कारणें काय, ह्या प्रश्नाचा छडा काव्यसाहित्या-कडे लक्ष्य दिलें असतां लावणें जरूर आहे. राजकीय परिस्थिति व कवींचें दारिद्र्य या दोन गोष्टी सकृद्दर्शनी आमच्या डोळ्यांसमोर उभ्या राहतात. पण निश्चयपूर्वक वरील प्रश्नाचा निर्णय करण्यास आज तरी आमच्याजवळ कांहीं साधनें नाहींत. कदाचित् अशीहि एक गोष्ट संभवेल कीं, कोणी कवींनीं अशीं महाकाव्यें लिहूनहि त्यांचें आजवर प्रकाशन झालें नसेल ! अनंत-तनयांचें एक महाकाव्य "थोरले माधवराव" हें अद्याप अप्रकाशित असल्याचें आह्मास ठाऊक आहे. त्याचप्रमाणें श्रीयुत ना. कृ. गद्रे यांनीं "प्रतापसिंह" काव्याचे दोन सर्ग छापून काढलेले आम्हीं पाहिलेले आहेत–तसेंच रा. ब. गणेश जनार्दन अगाशे यांचे "प्रतापसिंह" काव्याचे पहिले पांच सर्ग १८९४–९५ सालीं तयार झाल्याचें आह्मास ठाऊक आहे. तेव्हां याप्रमाणेंच इतर कवींनींहि जर अशींच काव्यें लिहून तीं आजवर बाहेर आलीं नसतील तर त्यांच्या प्रकाशनाच्या मार्गांत येणाऱ्या अडचणी दूर करण्याचा प्रयत्न होणें जरूर आहे. असो—

केशवसुतांनीं चतुर्दशपदी कवितेचा जो नवा प्रचार सुरू केला त्यासंबंधानें बरेंच लिहितां येण्यासारखें आहे. तसेंच निर्यमक कवितेसंबंधानेंहि. पण त्या वादांत पडण्याचें हें स्थल नसल्यामुळें, ह्या दोहों संबंधानें येथें मौनच स्वीकारलेलें बरें.

केशवसुतांच्या शब्दयोजनेसंबंधानें टीकाकारांनीं नमूद केलेले विचार मननीय आहेत. आपल्या कवितांस त्यांनीं घेतलेले विषय, त्यांची एकंदर मनोवृत्ति व परिस्थिति या सर्वांचा विचार करितां त्यांच्या कवितेंतील शब्दयोजनेंत कोमलपणाच्या ऐवजीं काठिण्य दिसणेंच युक्त होतें, असेंच ह्मणावें लागतें; आणि ह्मणूनच त्यांच्या कवितेस '**खडकाळ कविता**' असेंहि कित्येकांकडून संबोधिलें जाई; व हेंहि खरेंच कीं, त्यांच्या कवितेचें मर्म सामान्य वाचकांस चटकन् समजण्याजोगे त्यांतील विषय नसल्यामुळें व ती शाश्वत टिकणारी अशी कविता असल्यामुळें तिनें खडकाळ रूपच स्वीकारिलें होतें, असें ह्मटल्यासहि हरकत नाहीं.

केशवसुतांस महाकवि कोणी ह्मणोत वा न ह्मणोत, महाकवि होण्याची त्यांच्यांत सर्व सिद्धता होती, ही गोष्ट डॉ. गुणे व कविश्रेष्ठ रे. ना. वा. टिळक यांसहि कबूल करावी लागून त्यांनीं त्यांस ‘ स्वतंत्रतेचे शाहीर ’ ठरवून व ते “ कनिष्ठिकाधिष्ठित कविश्रेष्ठ ” आहेत असें सांगून त्यांनां आधुनिक कविमंडळांत अग्रस्थान दिलेलें आहे, हेंहि सरळच आहे. कविकुलमुकुटमणि कालिदास याच्यासंबंधानें लिहितांना शास्त्रीबुवांनीं त्यांच्या मेघदूतासंबंधानें एक मजेदार उलेख केला आहे तो असा:—“ कालिदासाचे बाकीचे सर्व ग्रंथ बुडून हें लहानसें काव्य जरी मागें उरतें तरीहि कविवृंदांत तो अग्रस्थानींच गणिला जाता. यांत तिळमात्रहि संदेह नाहीं !” केशवसुतांच्या उपलब्ध असलेल्या कवितेवरूनच काय, पण त्यांच्या कांहीं निवडक चुटक्यांवरून देखील आधुनिक कविवृंदांत त्यांस अग्रस्थानच मिळालें पाहिजे. त्यावर त्यांचा हक्कच आहे. इतकेंच नव्हे, पण याच्या पुढेंहि थोडी मजल मारून आह्मी त्यांची महाकवींत गणना करण्याचें धाष्टर्य करितों.

केशवसुतांनीं आपल्या कवितेला स्वतंत्र वळण देऊन, त्याचें एक स्वतंत्र विद्यालयच निर्माण केलें आहे. ह्या विद्यालयांत प्रमुखत्वेंकरून गोविंदाग्रज, ठोमरे, सुमंत आदिकरून कवि येतात. प्रस्तुत टीकाकार तर स्वतःला केशवसुतांचे शिष्य ह्मणवून घेतात. माधवानुजांनींहि तसाच भाव प्रकट केला आहे. इतकेंच नव्हे, पण केशवसुतांचे जुने दोस्त असे विद्यमान कवींतील कविश्रेष्ठ श्रीयुत रे. टिळक यांच्यावरहि केशवसुतांच्या कवितेची विलक्षण छाप बसून, त्यांनींहि केशवसुतांच्या या विद्यालयांत प्रवेश केल्याचा पुष्कळदां भास होतो ! केशवसुतांच्या “तुतारी” नंतर टिळकांचें जें “रणशिंग” बाहेर पडलें त्या योगें हा केवळ भास नसून तशी वस्तुस्थितीच असल्याचें प्रत्ययास येतें. असो. आह्मीहि हें केशवसुतांचें शिष्यत्व मोठ्या आनंदानें व प्रेमानें स्वीकारूं, पण त्यांचा शिष्य होण्यास लागणाऱ्या प्रतिभेचा , स्फूर्तीचा, व उत्तान अशा

कल्पनाशक्तीचा आमच्या ठिकाणीं निर्झर नसल्यामुळें त्या मानास पात्र होण्याइतकी योग्यताच नाहीं असें वाटून आह्मास केवळ निराश होऊन बसावें लागतें! अस्तु.

श्रीयुत रहाळकरांचा हा टीकाविषयक लेख प्रथम मासिकांतून प्रसिद्ध होऊन तोच आज स्वतंत्रपणें पुस्तकरूपानें प्रसिद्ध केला जत आहे; याचा उद्देश एवढाच कीं केशवसुतांच्या कवितेचा अभ्यास करूं जाणाऱ्या कविताभक्तांस ही टीका एकीकडे स्वतंत्रपणेंच वाचावयास सांपडावी. हा उद्देश सफल होऊन, केशवसुतांच्या कवितेचें मर्म सामान्य जनांसहि कळून काव्यवाचनाची त्यांची अभिरुचि थोडी वाढली, तरी देखील टीकाकारांच्या श्रमाचें चीज झालें असें होईल. प्रस्तुत टीकाकारांनीं ही टीका लिहून केशवसुतांच्या संबंधानें महाराष्ट्र वाचकांचे जें औदासीन्य व जी तटस्थ वृत्ति होती ती अंशतः तरी दूर केलेली आहे. यापुढें महाराष्ट्रकवितेच्या भक्तांनीं व केशवसुतांच्या चाहत्यांनीं केशवसुतांच्या कवितेसंबंधानें आपले विचार उघडपणें प्रकट करण्यास सरसावावें, ह्मणजे आधुनिक कवींसंबंधानें आपली आस्था व कळकळ, व त्याबरोबरच आपली रसिकताहि प्रकट केल्यासारखें होईल. श्रीयुत ह. ना. आपटे यांचें केशवसुतांच्या कवितेचें पुस्तक बाहेर पडल्यावर त्यांच्या आणखी कांहीं कविता मनोरंजनांत छापल्या गेल्या आहेत, व त्यापूर्वीं श्री. ना. वा. भिडे यांनीं **वीणेचा पहिला भाग** ह्मणून काव्यरत्नावलीच्या द्वारें "केशवसुत यांची कविता" ह्मणून जें पुस्तक छापलें आहे त्यांत 'प्रियेचें पुनर्दर्शन,' 'टिमकीवाला,' व 'पहिलें चुंबन,' ह्या तीन कविता जास्त आलेल्या दिसतात. पण ह्या तीन कवितांपैकीं पहिल्या दोन कवितांसंबंधानें श्रीयुत ना. वा. टिळक यांनीं आपलें स्वामित्व जाहीर केलें आहे. * तिसरी कविता 'पहिलें चुंबन,' ही केशवसुतांची नसावी असें श्रीयुत रहाळकरांचें मत आहे. मनोरंजनांत आलेल्या कविता खास केशव सुतांच्या आहेत, याबद्दल प्रश्नच नाहीं. कारण त्या खुद्द कवींच्याकडूनच त्यांचे मित्र प्रो. वासुदेव बळवंत

---

* काव्यरत्नावलि पु. २८, अंक ५ वा, पृष्ठ ९८ वें पहा.

पटवर्धन यांनां ज्या कांहीं कविता वेळोवेळीं लिहून गेल्या होत्या त्यांपैकीं त्या आहेत. असो.

यापुढें केशवसुतांच्या कवितेची योग्य छाननी होऊन त्यांची समग्र कविता सुंदर रीतीनें एकत्र छापली जाण्याचा योग पुनः लौकर येवो, व त्यांच्या व त्यांच्या कवितेसंबंधानें लिहिलें जाणारें सर्व वाङ्मय व केशवसुतांचा व कविमित्रांचा झालेला सर्व पत्रव्यवहार, हा देखील त्याबरोबरच बाहेर पडण्याचा सुदिन लौकर येवो, अशी इच्छा प्रकट करून ही लांबलेली प्रस्तावना येथेंच पुरी करितों.

बेळगांव,
ता. ३ फेब्रुवारी १९१९. इ.

**किरात.**

हृदयांतून न जे बोल ॥
निघती, ते सगळे फोल ॥

केशवसुत.

# केशवसुत आणि त्यांची कविता.

अर्वाचीन  कवींत कोण गगनीं मारी भरारी वरी ?
शौर्ये कोण रणांगणीं झगडला अंगें "निशाणा"सवें ?
राष्ट्रा जागृति आणण्यास कविता जागी कुणाची पुरी ?
निद्राग्रस्त मनें दणाणुनि दिलीं कोणीं "तुतारी"–रवें ?
"आम्ही कोण?" ह्मणूनि कोण कवि तो गर्जोनि आला पुढें !
"वेडा पीर" खराच कोण कवितेमागें पुरा जाहला ?
कोणाचा वच पौरुषोक्त पडतां कर्णांत वारें चढे
शौर्याचें  सगळ्या तनूंत ? कवि हा तो कोण? सांगा मला.
आहे तो कवि तूंच 'केशवसुता !' तूंही कवींचा कवी,
हा ! हा ! का कविता परी तव अशी गुल्दस्त ती राहवी ?
रत्नें सोज्ज्वल मोलवान पडलीं येथेंतिथें हीं अशीं,
त्यांचा हार न गुंफण्या रसिकता आह्मांत येई कशी ?
कोणीं संग्रह का तिचा न करणें एके ठिकाणीं कसा ?
चित्तीं हा शिरतां विचार सलतो मन्मानसा शल्यसा. !

'कोणीतरी.'

—मनोरंजन, पु. ८ अंक ९.

शिरोलेखांत उद्धृत केलेली कविता मासिक मनोरंजनाच्या १९०२ च्या नोव्हेंबरच्या अंकांत प्रसिद्ध झालेली आहे. आज त्याला जवळजवळ सोळा वर्षे झालीं. ही कविता प्रस्तुत निबंधाच्या लेखकानेंच 'कोणीतरी' ह्या टोपण नांवानें पाठविली होती. तेव्हां केशवसुत हयात होते. यानंतर तीन वर्षांनीं ते परलोकवासी झाले. केशवसुतांची मोलवान सोज्ज्वळ कविता–रत्नें इतस्ततः पडलेलीं असून, त्यांचा सुंदर हार गुंफण्यास लागणारी

रसिकता आह्मांत कधीं येणार, व त्यांच्या कवितांचा संग्रह एकत्र कधीं होणार, हें शल्य त्या वेळेपासून आमच्या मनास टोंचून राहिलें होतें. त्याचप्रमाणें तें प्रत्येक रसिक कविताभक्ताच्याहि अन्तःकरणाला आज कित्येक वर्षें सलूनच राहिलें होतें; यांत शंका नाहीं. अखेरीस तें तेथून उपटून काढण्याचें श्रेय एवढ्या दीर्घ कालावधीनें कां होईना, श्रीयुत हरि नारायण आपटे यांनीं १९१७ सालीं घेऊन, '**केशवसुत यांची कविता**' हें पुस्तक प्रसिद्ध करून, महाराष्ट्राला अत्यंत ऋणी करून ठेविलें आहे. तथापि त्यांनीं केशवसुतांच्या नुसत्या चुटक्यांचाच संग्रह करून, त्यांच्या गुणावगुणासंबंधीं किंवा खुद्द कवीसंबंधीं त्यांचे स्वतःचे जे कांहीं विचार अथवा कल्पना झाल्या असतील त्या त्यांनीं वाचकांनां कांहींच कळविल्या नाहींत; यामुळें रसिकांचा फार हिरमोड आणि मनोभंग झाला असेल, यांत बिलकूल शंका नाहीं. ही राहिलेली उणीव केशवसुतांच्या स्नेह्यांनीं, शिष्यांनीं, व रसिकांनीं भरून काढली पाहिजे. प्रस्तुत लेखहि, तसलीच उणीव अंशतः तरी भरून काढावी एवढ्याच करितां केलेला, एक अल्पसा प्रयत्न आहे. प्रस्तुत लेखक या कार्याला वाहून घेण्याच्या स्वतःच्या पात्रतेसंबंधानें बराच साशंक आहे. तथापि यथामति यत्न करून शिरावर पडलेल्या ऋणभारांतून अंशतः तरी मोकळें व्हावें याच इच्छेनें प्रेरित होऊन तो हें कार्य अंगिकारीत आहे.

## कुलवृत्त.

'केशवसुत' यांचें संपूर्ण नांव **कृष्णाजी केशव दामले**. यांचा जन्म ता. १५ मार्च १८६६ रोजीं रत्नागिरी नजीक मालगुंड गांवीं झाला. यांच्या वडिलांनां 'केसोपंत' ह्मणत असत. ते रत्नागिरी जिल्ह्यांत मराठी शाळेवर हेडमास्तर होते. त्यांचा पगार ३ रुपयांपासून ३० रुपयांपर्यंत चढत गेला. गरीबींतहि व्यवस्थितपणें संसार करून राहिल्यामुळें ते कर्जाच्या चक्रांत कधींच सांपडले नाहींत. केसोपंतांचा दरारा व शिस्त मोठी कडक असे. त्यांची रहाणी संभावितपणाची आणि नेकीची होती. केसोपंतांची बहुतेक नोकरी रत्नागिरी जिल्ह्यांतच झाली. उत्तम रीतीनें नोकरी करून

त्यांनीं पेन्शन घेतलें, व तें तेरा वर्षें भोगलें. १८९३ सालीं ते परलोकवासी झाले. त्यांची सुशील पत्नी त्यांच्यामागें नऊ वर्षें होती.

केसोपंतांनां एकंदर बारा अपत्यें झालीं. त्यांत सात मुलगे आणि पांच मुली. सर्वांत वडील मुलगा अकरा वर्षांचा असतां बुडून वारला. दुसरा मुलगा अल्पवयांतच गेला. तिसरे श्रीधरपंत हे जगन्नाथ शंकरशेट स्कॉलर होते. एल्फिन्स्टन कॉलेजांतून बी. ए. होऊन बडोद्याच्या कॉलेजांत त्यांनां संस्कृतचे प्रोफेसर नेमलें होतें. परंतु तेथें फक्त एकच वर्ष नोकरी केली नाहीं तोंच १८८३ च्या जानेवारींत त्यांच्यावर मृत्यूचा घाला पडला. चौथे चिंतोपंत हे मराठी सहावी इयत्ता पास होऊन संसारांत पडले. केसोपंतांचें पांचवें अपत्य हेच आपले 'केशवसुत' होत. त्यांच्या पाठचे प. वा. श्रीयुत मोरो केशव दामले, एम्. ए.; हे उज्जनीला माधव कॉलेजांत 'मॉरल ॲण्ड मेन्टल फिलासफी'चे कांहीं वर्षें प्रोफेसर होते, व पुढें अखेरपर्यंत नागपुर येथें नील सिटी हायस्कूलचे प्रिन्सिपॉल होते. यांची वृत्ति फारच प्रेमळ असे. न्यायशास्त्रावरील यांचे ग्रन्थ प्रसिद्ध आहेत. यांनीं मराठी भाषेचें व्याकरण लिहून मातृभाषेची योग्य सेवा केली आहे. यांचा अंत रेल्वेच्या एका भयंकर अपघातांत झाला,हें बहुतेक सर्वांनां ठाऊकच आहे.सातवे चिरंजीव श्रीयुत सीतारामपंत हेहि महाराष्ट्राच्या पूर्ण परिचयांतलेच आहेत. हे एक अष्टपैलू लेखक आहेत. 'सयाजी विजय,' 'इंदुप्रकाश,' 'मराठा' या पत्रांत पूर्वी ते लेख लिहीत असत. माजी 'राष्ट्रमता'चे ते संपादक होते, व हल्लीं 'राजकारण' नांवाचें नवीन साप्ताहिक पत्र त्यांनीं काढलें आहे. कादंबऱ्या लिहिण्यांतहि त्यांनीं आपली लेखणी बरीच झिजविलेली आहे. ते कविहि आहेत. त्यांच्या कांहीं कविता 'विविधज्ञानविस्तार,' 'मनोरंजन,' 'काव्यरत्नावली' वगैरे मासिकांतून 'मार्गण' या सहीनें प्रसिद्ध झाल्या आहेत.

## शिक्षण.

केशवसुतांचें मराठी सर्व शिक्षण १८८२ सालापर्यंत रत्नागिरी जिल्ह्यांतील खेड नामक गांवीं झालें. १८८२ सालीं ते बडोद्यास आपल्या बंधूंकडे गेले. तेथें एक वर्ष ते इंग्रजी शिकत होते.याच्या अगोदरच त्यांची कवित्व-

शक्ति जागृत झाली असून ते कांहीं कविताहि लिहूं लागले होते. कविता करण्याची स्फूर्ति त्यांनां कोणत्या कारणामुळें झाली हें आह्मांला ठाऊक नाहीं. मात्र मराठी शिकत असतां पोथ्यावगैरे वाचण्याचा त्यांनां विशेष नाद असे. यांचे वडील बंधु श्रीधरपंत यांनां कवितेची फार आवड असे, व क्वचित् प्रसंगीं ते कविताहि लिहीत असत. ते कॉलेजांत असतांना सुटी असली ह्मणजे घरीं येत. त्यांच्या सहवासानेंच केशवसुतांनांहि कवितेची गोडी लागली असावी. बडोद्यांत असतांना एखादी गचाळ कविता श्रीधरपंतांच्या वाचनांत आली किंवा कोणी आणून त्यांनां दाखविली तर ते ह्मणत, कीं, " यापेक्षां आमचा कुशा कितीतरी उत्तम कविता लिहितो." या वेळेस केशवसुतांचें वय सोळा वर्षांचें होतें. यावरून ' केशवसुत ' बऱ्याच अल्प वयांत कविता लिहूं लागले असावेत, हें स्पष्ट होतें. असो. वडील बंधु वारल्यामुळें केशवसुतांनां बडोदें सोडावें लागलें.

श्रीधरपंत निवर्तल्यावर कृष्णाजीपंत व मोरोपंत हे दोघेहि, त्यांचे मातुल कै. रामभाऊ करंदीकर यांच्याकडे वर्धा येथें गेले. हे गृहस्थ वर्ध्यांचे एक नामांकित वकील होते; पण इ. स. १८८३ त वर्ध्यास इंग्रजी शाळा नसल्यानें या दोघां मुलांस त्यांच्या मामांनीं नागपुरास पाठविलें. ज्या नागपुरच्या सिटीस्कूलचे मोरोपंत पुढें सुपरिन्टेन्डंट झाले त्याच शाळेंत हे दोघेहि या वेळीं विद्यार्थी ह्मणून दाखल झाले. परंतु केशवसुतांच्या प्रकृतीला तेथील हवा न मानवल्यामुळें त्यांनां नागपुर सोडून पुण्यास जावें लागलें. सन १८८४ पासून १८८९ पर्यंत पुणें येथील "न्यू इंग्लिश स्कूल"मध्यें राहून त्यांनीं अभ्यास केला. न्यू. इं. स्कूलमध्यें असतांना त्यांनां चित्रें काढण्याचाहि फार नाद होता. वाटेल त्याचा Likeness (ओळख पटेसा चित्रपट) ते अर्ध्या तासाच्या आंत काढीत. वर्गांत अभ्यासाकडे दुर्लक्ष्य करूनहि टिळक, आगरकर वगैरे शिक्षकांचीं चित्रें ते आपल्या वहींत काढीत, हें त्यांच्या अनेक सहाध्यायांनीं पाहिलेलें आहे. याप्रमाणें काव्यकला आणि चित्रकला यांमधील निकट संबंध व साधर्म्य त्यांच्या ठायीं दिसत होतें. त्यांच्या कवितांतूनहि कांहीं प्रसंग इतके बहारीचे आहेत कीं, त्यांचीं

कुशल चित्रकारानें चित्रें काढल्यास तीं फारच मनोहर उतरतील. १८८९ सालीं 'केशवसुत' प्रवेशपरीक्षेंत उत्तीर्ण झाले, पण गरीबीमुळें त्यांचा पुढील शिक्षणक्रम बंद पडून त्यांनां नोकरी पहाणेंच भाग पडलें.

## नोकरी.

वडिलांचा करारीपणा व स्वतःच्या पायावर उभें रहाण्याची अर्थात् स्वावलंबनाची धमक हे गुण केशवसुतांच्या अंगीं पूर्णपणें बाणले होते. मुंबईला जाऊन नोकरी शोधावयाची, असा विचार ठरवून ते घरून निघाले. निघते वेळीं वडिलांनीं आपल्या एका मुंबईच्या थोर मित्राला आपल्या मुलासंबंधीं पत्र लिहून तें केशवसुतांजवळ दिलें; परंतु केशवसुतांनां शिफारसीनें नोकरी मागणें कसेंसेंच वाटलें ! मुंबईला आल्यावर तें पत्र त्यांनीं आपल्या खिशांतच ठेवून देऊन आपल्याच हिमतीवर नोकरीची खटपट करून ती मिळविली. १८९० पासून १८९६ पर्यंत मुंबईंत निरनिराळ्या ठिकाणीं त्यांनीं नोकरी केली. कांहीं दिवस ते 'कमसरिएट' कचेरींत, कांहीं दिवस 'दादर इंग्लिश' शाळेंत, कांहीं दिवस 'ज्ञानोदय' कचेरींत आणि कांहीं दिवस सरकारी टेलिग्राफ आफिसांत त्यांनीं घालविले. पुढें १८९७ सालीं, मुंबईंत प्लेग झाल्यामुळें त्यांनीं मुंबईचा संबंध सोडून दुसरीकडे जाण्याचें ठरविलें.

केशवसुतांचें लग्न १८८१ त झालें होतें. त्यांचे श्वशुर श्रीयुत केशव गंगाधर चितळे हे खानदेशांत चाळीसगांव येथील मराठी शाळेवर हेडमास्तर होते. मुंबई सोडण्याचा केशवसुतांचा विचार ठरला त्याच सुमारास भडगांव येथील ए. व्ही. स्कूलमध्यें असिस्टंट टीचरची जागा रिकामी असल्याचें केशवसुतांनां कळल्यावरून त्यांनीं तिकडे अर्ज केला व त्यांत त्यांनां यशहि आलें. भडगांव येथील म्युनिसिपल स्कूलांत प्रथम १५ रुपये दरमहावर त्यांनां शिक्षकाची नोकरी मिळाली. तेथेंच पुढें दोन वर्षांनीं त्यांनां २० रुपये झाले.

भडगांव हा गांव खानदेशांतील पाचोरें तालुक्यांत असून फारच रम्य आहे. हा गांव ह्मणजे खानदेशांतील कोंकणस्थ ब्राह्मणांची एक वसाहतच आहे, असें

ह्मटलें तरी चालेल. हा गांव गिरणा नदीच्या तीरावर वसला असून पावसाळ्यांत तर तो एक बेटच बनतो. एका बाजूनें सतत बाराहि महिने वहात असलेला गिरणेचा प्रवाह, व दुसऱ्या बाजूनें पुरामुळें पाट फुटून (एरवीं उन्हाळ्यांत या भागाला कोरडी नदी ह्मणतात; कारण त्या वेळेस तो भाग शुष्क असतो.) जोरानें वहात आलेला प्रवाह, गांवाला वेष्टन घालून पुनः मूळच्या नदींत मिळाल्यामुळें हा गांव एक सुंदरसें द्वीपच दिसूं लागतें.

## सृष्टिदेवीचें दर्शन व तल्लीनवृत्ति.

भडगांव येथें असतांना रोज सायंकाळीं नदीतीरावर सहल करणें हा केशवसुतांच्या नित्यक्रमांतील एक प्रमुख क्रम असे. गिरणा नदीच्या प्रवाहाचें नितान्त श्रवणमनोहर गायन ऐकून, दोन्ही तटांवर उभ्या असलेल्या वृक्षराजींनां अवलोकन करून, नदीतीरीं असलेल्या खडक, वाळू व बारीक रेती या प्रस्तरांच्या तीनहि अवस्था पाहून, पलीकडून रानांतून परत येत असलेल्या गाईगुरांच्या पुच्छ उभारलेल्या थव्यांकडे नजर लावून, दूरवर दिसणाऱ्या डोंगरांच्या रांगांचें मनोहर स्वरूप निरखून, उंच आकाशांत अनंत तेजोमय तारापुंजांच्या लुकलुकण्याकडे दृष्टि फिरवून केशवसुतांची वृत्ति तन्मय होत असे. खडकावर बसून पाण्यांत पाय सोडून तासांचे तास ते सृष्टिदेवीच्या समागमांत तल्लीन होत असत. त्या वेळेस त्यांच्या वृत्तींशीं साधर्म्य असलेला मनुष्य जर त्यांच्या सन्निध असला तर मग त्यांच्या आनंदाला पारावारच राहत नसे. त्या वेळेस त्यांच्या स्फूर्तीचा स्फोट होऊन ते काव्यमयच बोल बोलत असत. या जागीं त्यांचा प्रत्येक शब्द त्यांच्या अंतःकरणांतील आनंदाचा द्योतक असून त्यांच्या मुखांतून जीवंत वाणी बाहेर पडत असे. त्यांचें सृष्टीशीं तादात्म्य होऊन जाई, व घरीं परत फिरण्याचें त्यांनां भानहि रहात नसे. केशवसुतांच्या या सहवासाचें ज्यांनां सुख मिळालें असेल ते खरोखरच कितीतरी धन्य! असेंच राहूनराहून वाटतें.

## प्रस्तुत लेखकाचा व केशवसुतांचा परिचय.

केशवसुतांची बरीचशी उत्तम कविता या गांवींच लिहिली गेली. या गांवींच प्रस्तुत लेखकाचा केशवसुतांशीं परिचय झाला. १८९८ सालीं

उन्हाळ्याच्या सुटींत आम्ही आमच्या आजोळीं भडगांव मुक्कामीं गेलों होतों. प्रस्तुतलेखकाला कवितेची आवड असून, त्याला कविता लिहिण्याचा त्या वेळींहि बराच नाद होता. आमचें इंग्रजी शिक्षण चौथ्या इयत्तेपर्यंत भडगांव येथील शाळेंतच झालें असल्यामुळें तेथील हेडमास्तर श्रीयुत भास्कर भिकाजी गोडबोले यांनां प्रस्तुत लेखकाबद्दल बरेंच प्रेम वाटे, व ते त्याचा मोठा गौरव करीत. या वेळेपर्यंत आमची बरीचशी कविता (?) 'न्यायसुधा,' 'न्यायसिंधु,' 'हिन्दु पंच,' 'इंदुप्रकाश' वगैरे वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाली होती. तेव्हां अशा शिष्याचा केशवसुतांसारख्या सत्कवीशीं परिचय करून द्यावा असें श्रीयुत गोडबोले यांनां वाटून, त्याप्रमाणें तो त्यांनीं करूनहि दिला. या त्यांच्या उपकारांबद्दल प्रस्तुत लेखक त्यांचा सदैव ऋणीच राहील.

केशवसुतांच्या सहवासानें प्रस्तुत लेखकाची दृष्टि बदलली. त्याला कवितेचें निराळेंच स्वरूप दिसूं लागलें.त्याची आकुंचित दृष्टि विस्तृत झाली, व कवितावाचनांत त्याला अननुभूत असा निराळाच विलक्षण आनंद वाटूं लागला. केशवसुतांचा शिष्य बनून तो त्यांच्या भजनीं लागला. केशव-सुतांबरोबर कविता वाचतांना आपण निराळ्याच सृष्टींत आहोंत, असा त्याला भास होई. आपल्या अल्पस्वल्प प्रयत्नांचें केशवसुत कौतुक करितात, हें पाहून त्याला त्यांच्या थोर अंतःकरणाची प्रचीती पटूं लागली. आपल्या गोड, रसाळ व उद्दीपक वाणीनें केशवसुत त्याला उत्तेजन देत. आमचे दोषहि ते मोठ्या सहानुभूतिपूर्वक प्रेमळ वाणीनें सांगत. त्यांची टीका नेहमीं पोषक,उत्तेजक आणि दिव्यदृष्टि देणारी असे. साधारण मनुष्यालाहि कवि बनविण्याची त्यांच्या ठिकाणीं शक्ति असे. कवित्वाचा थोडासा अंकुर दिसल्यावर तो विकास पावेल अशीच ते योजना करीत. केशवसुतांचा प्रेमळपणा फारच अवर्णनीय असे.आमचा केशवसुतांशीं झालेला हा परिचय दिवसेंदिवस वृद्धिंगत होत जाऊन तो अखेरपर्यंत तसाच टिकला. असो.

## परलोकवास.

भडगांव येथील केशवसुतांचा काल सांपत्तिक स्थितीच्या दृष्टीनें जरी नसला, तरी मानसिक स्थितीच्या दृष्टीनें बराच चांगला गेला, असें ह्मण-

ण्याला हरकत नाहीं. तरी पण बढतीचा योग दिसेना, योग्य योगक्षेमाला पुरेसा पगार मिळेना, व इतकेंहि करून पेन्शनलाहि हक्क नाहीं; तेव्हां तो पोंचावा ह्मणून ते 'सेकन्डरी टीचर्स'च्या परीक्षेला बसले व तींत उत्तीर्णहि झाले. पुढें त्यांनां फैजपुर ( खानदेश ) येथील ए. व्ही. स्कूलच्या हेडमास्तरची ३०रुपये पगाराची जागा मिळाली.तेथें ते दोन अडीच वर्षे होते. त्या ठिकाणीं,त्यांचे स्वतंत्र विचार व निस्पृह वृत्ति यामुळें तेथील अधिकाऱ्यांशीं त्यांचें जमावें तसें न जमल्यामुळें त्यांनीं आपण होऊनच हायस्कूलांत बदली मागितली व ती मिळून धारवाड हायस्कूलांत त्यांनां १९०३ सालीं मराठी शिक्षकाची जागा मिळाली. तेथेंच ते १९०३ च्या एप्रीलपासून अखेरपर्यंत होते. १९०५ मध्यें ते हुबळीला त्यांचे चुलत चुलते श्रीयुत हरि सदाशिव दामले यांजकडे गेले होते. तेथेंच त्यांनां प्लेग होऊन तारीख २ नोव्हेंबर १९०५ रोजीं त्यांचा अंत झाला.त्यांचें कुटुंबहि त्यांच्या दहावे दिवशींच त्याच आजारानें निवर्तलें. मृत्युसमयीं केशवसुतांचें वय अवघें ३९ वर्षांचें होतें.

## कवितांचें प्रकाशन.

केशवसुतांच्या कविता प्रथम 'करमणूक'पत्रांत प्रसिद्ध होऊं लागल्या. पुढें त्या'सुधारक', 'ज्ञानोदय', 'बालसुधा', 'बालमेवा', 'मनोरंजन आणि निबंधचंद्रिका','विद्यार्थिमित्र', 'मासिक मनोरंजन,' 'सुविचारसमागम' 'काव्यरत्नावली' इत्यादि पत्रांतून व मासिकांतून येऊं लागल्या.

## 'केशवसुत' हें नांव कोणीं दिलें ?

केशवसुत १८९८त खानदेशांत भडगांव मुक्कामीं आले तेव्हां 'काव्यरत्नावली'चे संपादक श्रीयुत नारायण नरसिंह फडनीस यांची व त्यांची भेट झाली. या वेळेस श्रीयुत फडनीसांनीं 'काव्यरत्नावली'ला केशवसुतांचें साह्य याचिलें, व तें केशवसुतांनीं मोठ्या प्रेमानें दिलें. या पूर्वीच्या केशवसुतांच्या कविता 'कुणीतरी', 'एक मित्र', 'जगन्मित्र' अशा कांहीं तरी टोपण नांवानें प्रसिद्ध होत असत;पण 'रत्नावली'कारांचें ह्मणणें असें पडलें, कीं, कृष्णाजीपंत दामले यांच्या कविता रत्नावलींत तरी उघड नांवानें

प्रसिद्ध व्हाव्या; पण हें ह्मणणें केशवसुतांनां पसंत पडलें नाहीं. प्रत्यक्ष नांवांत कांहीं विशेष आहे, असें त्यांनां मुळींच वाटेना.तेव्हां केशवसुतांनीं 'रत्नावली' कारांनां "आपणास बरें वाटेल तसें करा" असें सांगितलें; व त्या वेळेपासूनच त्यांच्या कवितेखालीं 'केशवसुत' ही सही 'रत्नावली'-कारांनींच घालण्यास प्रथम सुरवात केली.तेव्हां हा सत्याश्रय करून केलेला नामकरणविधि प्रथम 'काव्यरत्नावली' कारांच्या हस्तेंच झाला, व तोच पुढें केशवसुतहि प्रचारांत आणूं लागले. इतकेंच नव्हे, तर हेंच नांव कांहीं कवितांच्या शेवटीं केशवसुतांनीं आपल्या कांहींकांहीं पद्यांतहि गोविलें आहे. उदाहरणार्थः—

**"मग गणमात्रांतें जोडणें केशवपुत्रातें." —'ह्मातारी.'**

**"केशवसुत ह्मणे देवा दीनानाथा। तुझे पायीं माथा वाहियेला."**

केशवसुतांच्या आरंभीं आरंभीं प्रसिद्ध झालेल्या कविता अमुकच कवीच्या आहेत हें त्यांच्या स्नेह्यांखेरीज इतरांनां कळत नसे, व एकाच सहीखालीं त्या प्रसिद्ध न झाल्यामुळें अमुक अमुक कविता एकाच व्यक्तीच्या लेखणीतून उतरली आहे, हेंहि नीट समजत नसे. पण 'रत्नावली'कारांनीं त्यांनां नांव दिल्यामुळें त्या एकाच कवीच्या कृति आहेत असें पुढें कळूं लागून एका विशिष्ट व्यक्तीबद्दल रसिकांच्या मनांत प्रेम आणि आदर उत्पन्न झाला, व 'केशवसुत' हे केवळ सामान्य कवि नसून ते कोणी अद्भुत शक्तीचे कवि आहेत अशी लोकांची व्यक्तिविषयक भावना दृढ होऊं लागली. या गोष्टीचें श्रेय सर्वस्वी 'काव्यरत्नावली'कारांनांच दिलें पाहिजे. या कवींचें हें नांव जर प्रचारांत आलें नसतें तर त्यांच्या अनेक सरस कृति अनेक नांवांखालीं प्रसिद्ध होऊन त्यांनां एकपणा आला नसता,व केशवसुतांची कविता समग्र संग्रहित होऊन प्रसिद्ध व्हावी अशी आतुरताहि लोकांनां इतकी वाटली नसती. केशवसुतांच्या कवितेसंबंधानें रसिकांची आतुरता आज जितकी तीव्र आहे, तितकीच ती त्यांच्या निधनसमयीं असूनहि त्यांची समग्र कविता प्रसिद्ध होण्याला त्यांच्या निधनानंतर बारा वर्षें—ह्मणजे जवळजवळ एक तप जावें लागतें, तर या मानानें अनेक

नांवांखालीं प्रसिद्ध झालेली त्यांची कविता समग्र प्रसिद्ध होण्याचा योग किती कालानें येता हें एक ईश्वरालाच ठाऊक !

## कविमित्र.

वडील बंधु श्रीधरपंत वारल्यानंतर केशवसुत १८८३ सालच्या जून, जुलै व आगष्ट या महिन्यांत नागपुरास आपल्या मामाकडे गेले होते. तेथेंच आधुनिक कवींतील शिरोमणि श्रीयुत नारायण वामन टिळक यांचा आणि त्यांचा स्नेह जमला. श्रीयुत टिळकांसंबंधीं बोलतांना त्यांच्या कृतीबद्दल केशवसुत फार आदर दाखवीत. कवितेविषयीं या उभयतांचे फारच प्रेमळ-पणें संवाद होत असत. श्रीयुत टिळकांच्या सहवासांत घालविलेल्या दिवसांचें स्मरण होतांच केशवसुतांच्या मुद्रेवर एक विशिष्ट प्रकारच्या आनंदाची झांक दिसत असे. केशवसुतांचा व टिळकांचा स्नेह अखेरपर्यंत अखंड टिकला होता. अर्वाचीन कविकृतींच्या संग्रहाची कल्पना मूळ याच कविद्वयांच्या डोक्यांतून निघाली. श्रीयुत टिळकांकडून ती कल्पना 'दत्त'कवींनां ( प. वा. श्रीयुत दत्तात्रय कोंडो घाटे, बी. ए. ) कळली व त्यांच्याकडून ती श्रीयुत दामोदर सांवळाराम यंदे यांच्यापर्यंत पोंचून अखेर श्रीयुत यंद्यांकडूनच ती थोड्या अंशानेंच कां होईना पण "अर्वाचीन कवि–पूर्वार्ध." या मूर्तस्वरूपांत बाहेर पडली.

केशवसुतांचे दुसरे कविमित्र ह्मणजे प. वा. श्रीयुत विनायक जनार्दन करंदीकर, हे होत. हे धुळ्याचे रहाणारे. यांच्या कवितेशीं रसिकांचा पूर्ण परिचय आहेच. या कवीची कविताहि 'करमणूक' व इतर पत्रांत व 'मासिकमनोरंजनां'त बरीच प्रसिद्ध झाली आहे. भडगांवास आल्यानंतर 'विनायक' कवि केशवसुतांनां वारंवार भेटत असत. या कवीला 'He is a Byron of Maharashtra' असें केशवसुत ह्मणत असत. विनायक कवीच्या प्रासादिक, सरळ व सुलभ रचनेबद्दल त्यांनां फार कौतुक वाटत असे. पण या कवीच्या काव्याबद्दल त्यांनां जितकें प्रेम वाटत असे तितकें त्यांच्या वर्तनाबद्दल वाटत नसे, एवढें सांगून ठेवणें अवश्य आहे. 'कवि काव्यांत दिसतो तसाच कृतींत असेल तर किती गोड होईल'! असे कधींकधीं

विनायकांबद्दल केशवसुत खेदोद्गार काढीत, तर कधीं कधीं ‘कवीपेक्षां त्याच्या कवितेचेंच आयुष्य जास्त असतें’, असें ह्मणून समाधान करून घेत. तरी पण विनायकांच्या कवितेबद्दल त्यांनां अत्यंत प्रेम होतें, हें विसरतां नये.

केशवसुतांचे तिसरे कविमित्र ‘किरात’(श्रीयुत कृष्णाजी लक्ष्मण सोमण). या कवीबद्दल केशवसुतांच्या अन्तःकरणांत विशेषच प्रेम असे. ‘किरात’ हे एक प्रसिद्ध नाटककार असून त्यांचा लेखनव्यवसाय दांडगा आहे. त्यांनीं अनेक गद्य व पद्य नाटकें लिहिलीं असून त्यांपैकीं कांहीं रंगभूमीवरहि आलेलीं आहेत. हे गृहस्थ उत्तम टीकाकारांपैकीं एक असून यांचे टीकात्मक लेख फार वाचनीय आहेत. किरातांची कविता नीटस असून रेखलेली असते, असें केशवसुतांचें ह्मणणें असे. प्रस्तुत लेखकाशीं बोलतांना केशवसुत किरातांच्या नाटकांबद्दल विशेपच प्रशंसोद्गार काढीत. कोंकणांत जातांना व तेथून परत येतांना ते कांहीं काल तरी किरातांच्या सहवासांत घालविल्यावांचून रहात नसत.

प. वा. माधवानुज( डॉ. काशीनाथ हरि मोडक )हे कविहि केशवसुतांच्या विशेष परिचयाचे होते. माधवानुजांच्या कविता त्यांनां आवडत असत. कल्पनेच्या भरारीपेक्षां माधवानुजांचें रचनाचातुर्य विशेष मोहक असतें, असें त्यांचें ह्मणणें असे.

प्रस्तुत लेखकाची व माधवानुजांची १९०६ सालीं मराठी ग्रंथकारांच्या पहिल्या संमेलनाच्या वेळीं गांठ पडली, व उभयतांचा कांहीं काळ एकमेकांच्या कविता वाचण्यांत गेला. यापूर्वींच चार पांच वर्षें केशवसुतांनीं प्रस्तुत लेखकाच्या कवितांचा माधवानुजांजवळ उल्लेख केला होता व मासिकांतूनहि त्यांनां त्यांचा परिचय झाला होता. प्रस्तुत लेखकाला केशवसुतांच्या सहवासामुळें कसकसा आणि काय फायदा झाला,व प्रस्तुत लेखक केशवसुतांनां गुरुस्थानीं कां समजतो, याचा त्यानें माधवानुजांशीं बोलत असतां ओघानुसार सहज उल्लेख केला. तो ऐकून माधवानुजहि ह्मणाले “ मलाहि पण केशवसुत गुरूच्याच स्थानीं आहेत. मुंबईत असतांना नव्या कवितेचें वळण त्यांनींच मला लाविलें.” प्रस्तुत लेखकाजवळून केशवसुतांनीं

ही गोष्ट मात्र लपवून ठेवली होती. तसेंच प्रस्तुत लेखकाला केशवसुतांनीं जें वळण लाविलें होतें त्याचाहि पण त्यांनीं माधवानुजांजवळ उल्लेख केला नव्हता. केवढें थोर अन्तःकरण हें! अशा रीतीनें आपल्या शिष्यालाहि ते स्नेह्याचा मान देत! तेव्हां अशा पुरुषाबद्दल "धन्य त्यांचा थोरपणा!" असे उद्गार आपोआप निघाल्यास त्यांत नवल काय?

याशिवाय केशवसुतांचे अन्य कविमित्र असतील, पण त्यांच्याबद्दल प्रस्तुत लेखकाकडे त्यांनीं कधीं उल्लेख केलेला नाहीं.

## स्वभाव.

केशवसुतांचा स्वभाव फार करारी, बाणेदार व निस्पृह असे. वरिष्ठांशीं 'हांजी हांजी' करणें त्यांनां बिलकुल आवडत नसे. त्यांची वागणूक नेहमींच साधी आणि सरळपणाची असल्यामुळें जगांतील डावपेंचाच्या वागणुकीशीं त्यांचें कधींच जुळत नसे. ते पूर्ण सुशील असून निर्व्यसनी होते. जेथें परिचय नाहीं तेथें त्यांची संकोचवृत्ति निदर्शनाला येत असे. व्यसनी माणसांची त्यांनां मनापासून चीड असे. त्यांच्यांत स्वातंत्र्य, स्वावलंबन, निस्पृहता, प्रेमळपणा आणि कुशाग्रबुद्धित्व हे गुण स्पष्ट दिसत असत. हा त्यांचा स्वभाव त्यांच्या कवितांमधूनहि जागजागीं मूर्त उतरला आहे. त्यांच्या कवितांबद्दल पुढें जे विचार प्रदर्शित केले आहेत त्या ठिकाणीं याचा उल्लेख येईल. त्यांच्या स्वावलंबनाची एक गोष्ट वर (नोकरीबद्दल वडिलांनीं दिलेलें पत्र आपल्याच जवळ ठेवून घेणें ही) दिलीच आहे. दुसरीहि अशीच एक गोष्ट प्रस्तुत लेखकाला माहीत आहे. केशवसुतांचें मासिक वेतन जेमतेमच असल्यामुळें तेवढ्यांत प्रपंच करण्याला त्यांनां बरीच यातायात पडत असे; असें असतांहि त्यांनीं आपल्या बंधूजवळ या संबंधानें कधींहि गोष्ट काढली नाहीं. पण त्यांचे बंधु प. वा. श्रीयुत प्रो. मोरोपंत यांनीं ही परिस्थिति जाणून एकदां—त्यांच्या प्रपंचाला मदत व्हावी म्हणून—मनीऑरडरनें त्यांच्याकडे कांहीं रकम पाठविली; पण केशवसुतांनीं ती न स्वीकारतां परत केली!

केशवसुत अत्यंत मितभाषणी असत; तरी पण एकदा परिचय झाला व एकमेकांचीं मनें व आवडी मिळाल्या ह्मणजे ते फारच मोकळ्या मनानें बोलत. कित्येकांनां त्यांची वृत्ति व्यावहारिक दृष्टीनें चमत्कारिक भासत असे; पण वस्तुस्थिति तशी नव्हती. केशवसुतांचें विचारस्वातंत्र्य विलक्षण होतें व तें त्यांच्या लेखनांत व वर्तनांत नेहमीं व्यक्त होत असे. ते बोलण्यांत फारच निर्भीड असत. आपणाला जें खरें वाटेल तें उघडउघड बोलण्यांत त्यांनीं कधींच कोणाचीहि पर्वा केली नाहीं. तसेच ते फार निश्चयीहि होते.

केशवसुत धुळ्यास 'टीचर्स'च्या परीक्षेला गेले त्या वेळीं एक दिवस आग्रारोडवरून ते चालले असतांना समोरूनच विनायक कवींची स्वारी आपल्या दोनचार रंगेल स्नेह्यांसह येतांना त्यांच्या दृष्टीला पडली. उभय कवींची दृष्टादृष्ट झाली; पण विनायक कवीनें [ कदाचित् त्यांच्याबरोबर त्यांचे रंगेल स्नेही असल्यामुळें ] आपली दृष्टि चोरली, व आपण केशवसुतांनां पाहिलेंच नाहीं असें दाखवून, रस्त्याच्या दुसऱ्या बाजूनें पाय काढला! विनायक कवींचें हें वर्तन पाहून केशवसुतांनां कसेंसेंच वाटलें. तरी पण अखेरीस केशवसुतच स्वतः मागें वळले व त्यांनीं विनायकांनां गांठलें; नमस्कारादि प्रकार झाला तोंच विनायक "मी आपणास येऊन भेटेन," इतकेंच घाईघाईंत ह्मणून पुनः पाय काढूं लागले. तेव्हां केशवसुतांनीं त्यांनां प्रश्न केला "मी कोठें उतरलों आहें त्या ठिकाणाची विचारपूस न करतां आपण मला भेटणार?" हें ऐकून विनायक कवि स्तब्ध झाले, व मनांत विरमून गेले! त्यांची चर्या पाहून केशवसुत ह्मणाले "ज्या अर्थीं आपणास मला भेटण्याची विशेष उत्सुकता दिसत नाहीं त्या अर्थीं मीहि पण कोठें उतरलों आहें हें आपणास कळवीत नाहीं!" इतकें ह्मणून केशवसुतांनीं आपला मार्ग सुधारला, व विनायक कविहि आपल्या रंगेल मंडळींत मिसळून निघून गेले. यापुढें धुळ्यास असूनहि या दोन कवींची भेट पुनः झाली नाहीं! नंतर कांहीं महिन्यांनीं विनायक कवि भडगांवास जाऊन केशवसुतांनां भेटले व धुळें येथील आपल्या वर्तनाबद्दल त्यांनीं दिलगिरी प्रदर्शित केली. या दोघांहि कवींच्या वरील वर्तनावरून त्या दोघांच्या स्वभावाबद्दल वाचकांनींच आपल्या मनाशीं काय ती अटकळ बांधावी.

फैजपुरास असतांना तेथील सद्गृहस्थ श्रीयुत "ढ" यांचें व केशवसुतांचें कांहीं कारणामुळें पटेनासें झालें. आह्मी भुसावळीस असतांना केशवसुत आमच्याकडे सुटींत वगैरे नेहमीं येत असत; एकदां असेच ते भुसावळीस आले असतां त्या वेळचे तेथील ए. व्ही. स्कूलचे हेडमास्तर श्रीयुत 'क्ष' हे त्यांना भेटावयास आले; पण त्यांची भेट घेण्याला केशवसुत तयार होईनात. याचें कारण विचारतां, " 'ढ' यांनीं माझा 'क्ष' यांच्याशीं परिचय करून दिला; पण 'ढ'बद्दल माझें मत बरें नाहीं;ह्मणून मी 'क्ष'नां भेटूं इच्छित नाहीं !" असें केशवसुत ह्मणाले.अखेरीस आह्मांला 'क्ष' हे 'ढ'चे स्नेही या नात्यानें त्यांच्याशीं आपण बोलूं नका; पण ते एक शिक्षक आहेत व आपणहि एक शिक्षक आहांत, तेव्हां या नात्यानें तरी त्यांच्याशीं आपण दोन शब्द बोला," अशी केशवसुतांची समजूत घालावी लागून त्यांची भेट करवावी लागली. पण या भेटींत 'केशवसुत' कुशल प्रश्नापलीकडे विशेष कांहींच बोलले नाहींत !

## रहाणी.

केशवसुतांची रहाणी अत्यंत साधी असे. त्यांचा पोषाक ह्मटला ह्मणजे डोकीला एक साधा रुमाल, अंगांत शुभ्र कोट, धोतराचा कांचा कसलेला, आणि पायांत पायतण अथवा दक्षिणी जोडा, असा असावयाचा. छानछोकीकडे त्यांचें मुळींच लक्ष नसे.

## गृहचित्र.

केशवसुतांचें गृहचित्र पाहण्याचे प्रस्तुत लेखकाला बरेच प्रसंग आले. भडगांवास असतांना केशवसुतांकडे गेल्यावर स्वारी एक सत्रंजी टाकून तिच्यावर बसलेली दिसावयाची. समोर पुस्तक असून त्याचें वाचन चाललेलें असावयाचें, अथवा एकादी कविता लिहीत असलेले दिसावयाचे. त्यांच्या मुलीहि तेथेंच आपल्या वडिलांजवळ असावयाच्या.त्या कोणी पाठीवर,तर कोणी मांडीवर, तर कोणी डोक्याशीं, खेळत असावयाच्या. मधुनमधून हे त्यांच्यांशीं बोलत, त्यांच्या प्रश्नांचीं उत्तरें देत, आणि त्यांचे

लडिवाळहि करीत; पण दुसरी कडे हातांत असलेलें कामहि करीत असत. केशवसुतांचें अपत्यप्रेम विलक्षण होतें. आपल्या कामांत या मुली व्यत्यय आणतात, असें त्यांनां कधींच वाटलें नाहीं. त्यांच्यावर त्यांनीं कधींहि राग किंवा धुसफुस केली नाहीं. त्यांचें त्यांच्या आप्तवर्गावरहि अशाच प्रकारचें अकृत्रिम व अलोट प्रेम होतें. आणि ही गोष्ट त्यांच्या अनेक कवितांतूनहि दृग्गोचर होते.

## काव्यवृत्ति.

केशवसुतांइतकी सबाह्यांतर काव्यविषयांत रंगून गेलेली चित्तवृत्ति क्वचितच आढळेल. ध्यानीं, मनीं, स्वप्नीं कवितेवांचून अन्य विषय त्यांनां माहीत नव्हता, इतकी त्यांची कवितेशीं तल्लीन वृत्ति झाली होती. कवितेचें आराधन करण्यांतच त्यांनीं आपलें सर्व आयुष्य घालविलें, असें ह्मटल्यास त्यांत यत्किंचित्हि अतिशयोक्ति होणार नाहीं. कित्येक आंग्लकवीसंबंधानें असें ह्मटलें जातें, कीं, “He wrote poetry and lived poetry” ( “ त्यानें काव्य लिहिलें आणि काव्यच जन्मभर आचरिलें. ” ) ही गोष्ट केशवसुतांच्या संबंधानेंहि अगदीं निर्धास्तपणें ह्मणतां येईल. असो. प्रसंगानुसार कित्येक वेळीं त्यांच्या तोंडून असे उद्गार येत कीं, “बहुजनसमाजाचा कवि होण्यांत कांहीं विशेष नाहीं; आपण कवींचा कवि झालें पाहिजे !” आणि या उद्गारांप्रमाणें आज ते कवींचे कवि झाल्याचें प्रत्यक्ष घडूनहि आलेलें आहे, यांत अणुमात्र शंका नाहीं.

## कवितेविषयीं त्यांची कल्पना.

केशवसुत नेहमीं काव्यमय सृष्टींत दंग असत. कवीनें शब्दांबरोबर वाहवत न जातां कल्पनेशीं झगडलें पाहिजे, नुसत्या शब्दांच्या थाटमाटानें कविता होत नसते; शब्दांत काव्य नाहीं, तें सर्व कल्पनेंत आहे; शब्दांत जादू असेल, पण ती कल्पनेंतील जादूपेक्षां कमी दर्जाची, असें त्यांचें ठाम मत असे. कवितेचें बाह्य स्वरूप कसेंहि असलें तरी हरकत नाहीं, पण तिचें अंतरंग उदात्त कल्पनांनीं आणि गंभीर व तात्विक विचारांनीं भरलेलें असलें पाहिजे, तरच तिचें उज्ज्वल स्वरूप प्रकट होईल; एरवीं नाहीं. तसेंच केवळ

यमक, प्रास आणि अलंकार यांनीं नटलेली कविता खरी कविता नव्हे, असें ते ह्मणत असत. कवितेच्या चालीसंबंधानें ते अगदीं बेपर्वा असत. काव्याचा विषय आणि स्फूर्ति हीं त्यांना ज्या चालींत गुणगुणावयाला लावतील तीच त्यांची चाल. कवीनें स्वच्छंदानें कविता रचावी; जो सहृदय असेल तोच ती समजून घेईल. कविता मोजक्या शब्दांत असून अर्थप्रचुर असावी, असा त्यांचा कटाक्ष असे, व तदनुसारच त्यांची कविता असल्याचें आढळून येतें.

## त्यांचे आवडते कवि.

महाराष्ट्र कवींपैकीं तुकाराम हा त्यांच्या फारच आवडीचा कवि होता. त्यांनीं आंग्ल कवींच्या काव्यांचें परिशीलन केलें होतें. त्यांच्या आवडीचे कवि ह्मटले ह्मणजे इमर्सन, स्पेन्सर, टॉमस हूड, शेक्सपीअर, ड्रमंड, कीटस्, शेले, वर्डस्वर्थ व ब्रॉउनिंग, हे होत. पालग्रेव्हच्या 'गोल्डन ट्रेझरी'च्या चारहि भागांचें त्यांचें सतत पारायणच चालत असे, असें ह्मटलें तरी चालेल. इंग्रजी कवींच्या वाचनाची त्यांच्या कल्पनेवर इतकी कांहीं विलक्षण छाप बसली होती, कीं, कांहीं विचारूंच नये! कांहीं इंग्रजी कवितांचीं तर त्यांनीं रूपान्तरें केलीं आहेत, आणि तीं मुळापेक्षांहि कित्येक प्रसंगीं सरस उतरलीं आहेत. त्यांच्या रूपान्तरांतहि त्यांचा स्वतःचा शिक्कामोर्तब स्पष्टपणें दृग्गोचर होतो.

## त्यांच्यांतील कवित्वगुण.

केशवसुत हे निसर्गतःच कवि होते, हें त्यांची कोणतीहि एकादी कविता वाचली तरी देखील आढळून येईल. उत्तम कवीला लागणारे बहुतेक सर्व गुण—सदयता, सहृदयता, प्रेमळता, शुद्धता, पावित्र्य, तन्मयवृत्ति, उदात्त कल्पना, उन्नत विचार, गंभीर व उत्साही मनोवृत्ति इत्यादि सर्व त्यांच्या अंगीं वसत होते. त्यांच्या गंभीर आणि विचारी चेहऱ्याचें प्रतिबिंब त्यांच्या कवितेंत स्पष्ट दिसतें. त्यांचा भव्य ललाटप्रदेश व क्वचित् प्रसंगीं त्यावर दिसणाऱ्या रेषा ज्यांनीं पाहिल्या असतील त्यांना त्यांच्या गंभीर मनोवृत्तीची व सात्विक विचारांत गढून गेलेल्या मुखश्रीची स्मृति झाल्याशिवाय

रहाणार नाहीं. विनायक कवींनीं केशवसुतांसंबंधानें एकदा पुढील आशयाचे उद्गार काढले होते:—

" केशवसुतांची रहाणी साधी, वर्तन पवित्र, विचार काव्यमय, व भाषणशैली मनोवेधक असे. केशवसुत बोलतांना खालीं पाहून बोलत, तथापि केव्हां केव्हां ते वर मान करून पहात तेव्हां त्यांचे पाणीदार—हें पाणी खरोखरच अलौकिक होतें—डोळे श्रोत्यांच्या हृदयाचा वेध करून टाकीत !"

## चेहरेपट्टी.

केशवसुतांचा फोटो उपलब्ध नाहीं, तरी पण त्यांच्या तोंडवळ्याची कांहीं कल्पना त्यांच्या कनिष्ठ बंधूंनां—श्रीयुत सीताराम पंतांनां—पाहून होण्यासारखी आहे. केशवसुतांच्या चेहऱ्यावरील तें दिव्य तेज, त्यांच्या नेत्रांतली ती हृदयभेदक दृष्टीची धार, व त्यांच्या चेहऱ्यांतील हृदय आकर्षण करून घेण्याची शक्ति या गोष्टींची जर आपण आपल्या कल्पनाशक्तीनें श्रीयुत सीतारामपंतांच्या चेहऱ्यांत भर घातली, तर आपणांला केशवसुतांच्या चेहऱ्याची बरीच कल्पना येईल.

## चतुर्दशपदी कविता.

वंगदेशीय कवि मधुसूदन दत्त यांनीं बंगालच्या वाङ्मयांत इंग्रजी सॉनेटच्या धर्तीवर चतुर्दशपदी कविता रचून जशी ती प्रथमच प्रचारांत आणली, तशीच महाराष्ट्र वाङ्मयांत प्रथमत: ती केशवसुतांनींच आणिली. या पद्धतीला त्यांनीं शार्दूलविक्रीडित ह्याच जुन्या वृत्ताची योजना केली. यांत एकच मध्यवर्ती कल्पना असून तिचा आरोह पहिल्या आठ ओळींत व अवरोह पुढच्या सहा ओळींत, अथवा पहिल्या आठ ओळींत अवरोह व पुढील सहा ओळींत आरोह होतो. कांहींत पहिल्या बारा ओळींत व शेवटच्या दोन ओळींत वरप्रमाणें आरोह अथवा अवरोह होतो. या पद्धतीच्या चुटक्यांत पहिल्या अर्धकांत पहिली व चवथी, दुसरी व तिसरी, पांचवी व आठवी, सहावी व सातवी, व दुसऱ्या अर्धकांत नववी, अकरावी आणि तेरावी, व दहावी, बारावी व चवदावी या ओळींचीं यमकें साधलेलीं

असतात. या पद्धतीचे केशवसुतांनीं ८।९ चुटके लिहिले आहेत. मराठी कवितेंत चतुर्दशपदीचा हा नवीनच प्रचार असल्यामुळें तो रूढ व्हावा असें केशवसुतांनां फार वाटे, व ते आपल्या प्रत्येक कविमित्राजवळ त्याबद्दल एकाद्या मिशनरीप्रमाणें त्याचें प्रतिपादन करून चतुर्दशपद्या रचण्याविषयीं शिफारस करीत. माधवानुज यांनींहि दोनतीन चुटके या पद्धतीनें लिहिलेले आमच्या वाचण्यांत आहेत. प्रस्तुत लेखकानेंहि या चतुर्दशपदी कवितेचे चारपांच चुटके लिहून केशवसुतांच्या या नव्या उपक्रमाला थोडाफार हातभार लाविला आहे. सन १९०२।१९०३ च्या सुमारास केशवसुत उज्जनीस जात असतां इंदूरला आले होते. त्या वेळीं मध्य प्रांतांतील आधुनिक कविशिरोमणि श्रीयुत भास्कर रामचंद्र तांबे यांची त्यांनीं गांठ घेतली. हा नवीन चतुर्दशपदी कवितेचा प्रचार यापूर्वींच श्रीयुत तांबे यांनांहि पसंत झाला असून त्यांनींहि त्या नमुन्यावर कांहीं चुटके लिहिले होते. या ठिकाणीं ही गोष्टहि पण नमूद करणें आवश्यक आहे,कीं, श्रीयुत तांबे यांची "प्रीतिविषयक वस्तु लोपल्यावर" ही चतुर्दशपदी वाचून केशवसुत फार प्रसन्न झाले व "तांबे हे एक जीवंत वाणीचे निसर्गकवि आहेत !" असे त्यांनीं प्रस्तुत लेखकाजवळ उद्गार काढले. केशवसुतांच्या उत्कट मनोवृत्तींनीं त्यांनां येथेंच थांबूं दिलें नाहीं, तर खुद्द श्रीयुत तांबे यांनांहि एक पत्र पाठवून त्यांत त्यांनीं त्यांचा गौरव केला होता, असें श्रीयुत तांबे यांच्याकडूनच प्रस्तुत लेखकाला पुढें एका प्रसंगीं सहज ओघानें कळून आलें. या उभय कवींची भेट एकदाच झाली, व तास दोन तास एकमेकांच्या कविता वाचण्यांत, ह्मणण्यांत, व ऐकण्यांत आल्यामुळें त्यांचा परस्परांबद्दल आदर विशेष वाढला.

केशवसुतांनीं हा काव्यप्रकार नवीनच प्रचारांत आणला, व त्यांनां कांहीं अनुयायीहि मिळाले. नंतर कांहीं काळानें असा वाद उपस्थित झाला, कीं, चतुर्दशपदी कवितेला शार्दूलविक्रीडित वृत्तच काय करावयाचें? सात साक्या किंवा आर्या रचल्या ह्मणजे झालें; कारण शार्दूलविक्रीडित वृत्ताचें अवलंबन केल्यामुळें तिसरा श्लोक जो अर्धाच राहतो तो तरी या नव्या योजनेनें

रहाणार नाहीं. तसेंच, 'या निरनिराळ्या ओळींचीं यमकें साधण्यांत काय विशेष आहे? उलट यामुळें यमकाच्या स्वारस्याची हानि मात्र होते' असाहि एक मुद्दा पुढें मांडला गेला. पण यासंबंधीं केशवसुतांचें असें ह्मणणें असे, कीं, शार्दूलविक्रीडित हें वृत्त कवितेच्या या प्रकाराला विशेष पोषक असून त्या वृत्तांत जो जोम व शक्ति आहे ती साकींत किंवा आर्येंत नाहीं. शिवाय चतुर्दशपद कविता हा एक विशिष्टरचनेचा प्रकार आहे हें ध्यानांत यावें, व त्याचप्रमाणें या समग्र चौदा ओळी मिळून हा एक रचनेचा निराळाच प्रकार आहे हेंहि चटदिशीं निदर्शनास यावें, ह्मणूनच त्यांतील यमकांची साधणी निराळ्या तऱ्हेची कल्पिलेली आहे. केशवसुतांच्या मतें चतुर्दशपद कविता ही गावयाची नसून खड्या आवाजांत गद्याप्रमाणेंच ह्मणावयाची अथवा वाचावयाची आहे. असो. यानंतर बऱ्याच कवींनीं या नव्या प्रकाराचें अवलंबन केलें आहे. कित्येकांनीं यमकाला संपूर्ण छाटच दिला आहे;परंतु एकंदरींत हा प्रकार बराच रूढ होत चालला आहे.

### इतर लेख.

केशवसुतांच्या कवितेचे आपणांपुढें आज १२६ च चुटके आहेत; पण यापेक्षां त्यांनीं बरीच जास्त कविता लिहिली होती. त्यांच्या अल्पवयांतील बऱ्याच कविता त्यांनीं स्वतःच जाळून टाकल्याबद्दल त्यांनीं प्रस्तुत लेखकाला सांगितलें होतें; पण त्या जाळण्यापूर्वीं त्यांतील चांगल्या विचारांचें त्यांनीं टांचण करून ठेवलें होतें, व त्या विचारांचा योग्य प्रसंगीं, योग्य कालीं व योग्य स्थळीं ते उपयोग करून घेत. ज्या कवितेंत जीव आहे असें आपणाला वाटत नाहीं ती ठेवणें ही चूक आहे,असें त्यांनां वाटे. आणि ह्मणूनच त्यांनां पसंत नसलेल्या कविता आपण होऊन आपल्या हातांनीं अग्निमुखीं ठेवल्या, असें ते मोठ्या गंभीरपणें सांगत. कोणास ठाऊक ! कदाचित् त्या कविता पुढेंमागें पुन्हा नव्या तेजानें बाहेर पडाव्या, याकरितांच त्यांनीं त्या दिव्य भट्टींत टाकल्या असतील ! असो. याशिवाय त्यांनीं लिहिलेलें 'बलिभद्र' नांवाचें एक गद्य नाटक प्रस्तुत लेखकानें वाचलें होतें. हें नाटक ज्या वेळेस राजाराम कॉलेजकडून गद्य नाटकाबद्दल

बक्षीस लागलें होतें तेव्हां लिहिलें गेलें. पण तें बक्षिसाकरितां पाठविलें गेलें नाहीं, किंवाप्रसिद्धहि झालें नाहीं. त्या वेळीं लावलेलें बक्षीस 'गुणोत्कर्ष' नाटकाला मिळालें. प्रस्तुत लेखकानें केशवसुतांचें हें नाटक वाचल्यास आज जवळजवळ १७।१८ वर्षें होऊन गेलीं. तेव्हां त्यासंबंधानें त्याला आज विशेष कांहीं सांगतां येत नाहीं. तरी पण तें नाटक वाचून त्याचा मनावर जो कांहीं पुसट परिणाम अद्याप राहिला आहे तो असा कीं, तें नाटक ह्मणजे एक गद्य काव्यच होतें–नाटक नव्हे! केशवसुतांनीं एक कादंबरीहि लिहिली होती ह्मणून ह्मणतात; पण यासंबंधीं प्रस्तुत लेखकाजवळ केशवसुतांनीं कधीं चुकूनसुद्धां एकहि शब्द काढल्याचें त्याला स्मरत नाहीं. तसेंच त्यांनीं इतर कांहीं गद्य लेख लिहिल्याबद्दलहि प्रस्तुत लेखकाला कांहीं माहिती नाहीं.

## काव्याविषयीं विचार वगैरे.

केशवसुतांचें त्यांच्या विशेष परिचयाच्या मित्रांशीं काव्यासंबंधीं भिन्न भिन्न प्रसंगीं बोलणें व पत्र-व्यवहार होई. ते परस्परांनां आपल्या नूतन कविताकृति पाठवून त्यांवर एकमेकांचे विचार व मतें मागवीत व कळवीत. प्रस्तुत लेखकाला केशवसुतांच्याकडून आलेल्या कांहीं पत्रांतील पुढें दिलेल्या उताऱ्यांवरून त्यांच्या या बाबतींतील विचारांची वाचकांनां कांहीं अटकळ येईल.

## कविसंमेलनाची कल्पना.

श्रीयुत भास्कर रामचंद्र तांबे आणि प्रस्तुत लेखक यांचें कित्येक प्रसंगीं कवितेसंबंधीं बोलणें चाललें असतांना आह्मांला परस्परांनां जो अपार आनंद होई तो आनंद जर सर्व कविताभक्त एके ठिकाणीं जमले आणि आपापले विचार एकमेकांनां कळवूं लागले तर कांहीं विशिष्ट प्रकारचा होईल असें आमच्या कल्पनेनें घेतलें, व तो आनंद अनुभवण्याकरितां एकादें वार्षिक कविसंमेलन भरवून, त्या कल्पनेला मूर्त स्वरूप कां देऊं नये, असा प्रश्न आमच्या आमच्यांतच निघाला. आमचा हा विचार पत्रद्वारें केशवसुतांनां कळविला, तेव्हां त्यांनीं खालील उत्तर धाडिलें:—

"As to the idea of an annual gathering of poets:—Practical men meet periodically for practical purposes. Poets as dreamers should sit aloof, listening to the ethereal voice of silence and trying to render it into their uncouth vernaculars, whenever the muse favours them. Some two or three congenial spirits may at times come together to sip the rainbow drops of the nectar; but more would certainly spoil its flavour.—That is my idea."

वरील विचार वाचून ' कविसंमेलना 'ची कल्पना आह्मीं टाकून दिली. यानंतर दोनतीन वर्षांनीं ( केशवसुतांच्या निधनानंतर) श्रीयुत ना.न. फडनीस 'काव्यरत्नावली'चे संपादक यांनीं जळगांवास एक कविसंमेलन भरविलें; पण तें एकदाच भरून पुनः त्यानें कधीं आपलें डोकें वर काढिलें नाहीं. यावरून कविसंमेलनाच्या फोलपणासंबंधाची केशवसुतांचीच कल्पना बरोबर ठरली, असें कोण ह्मणणार नाहीं ?

तसेंच एके प्रसंगीं प्रस्तुत लेखकानें कवितेच्या स्फूर्तीमुळें आपल्या अन्तःकरणांत होणाऱ्या खळबळीची—गोंधळ उडविणारी—स्थिति त्यांना पत्रद्वारें लिहून कळविली असतां केशवसुतांनीं उत्तरीं लिहिलें:—

"You complained "काय करूं आणि काय नाहीं असें होतें !" 'I give below an extract from Emerson's Essay on "The Transcendentalist" that struck me as an apt illustration of your mood:—

"Now we confess, and by no means happy is our condition if you want the aid of our labour, we ourselves stand in greater want of the labour. We are miserable with inaction. We perish of rust and rest but we do not like your work."

"Then says the world 'show me your own'—'we have none' 'what will you do then ?' cries the world. 'We will wait.' 'How long?'–'Until the universe beckons and calls us to work.'—'But whilst you wait, you grow old and useless.'—'Be it so:, I can sit in a corner and *perish* ( as you

call it ) but I will not move until I have the highest command."

'माधवानुज's eldest brother once said to me that "Our highest poerty was in sitting still and shedding tears." How parallel with the above from Emerson."

तसेंच दुसऱ्या एका प्रसंगीं अलीकडील सर्वच कवि लहानलहान चुटकेच लिहितात, एकादें मोठें काव्य त्यांनीं कां हातीं घेऊं नये ? चुटक्यांतून काव्यस्फूर्तीची नुसती चमक काय ती दिसते; पण तिचें पूर्ण जाज्वल्य स्वरूप मोठ्या काव्यांतच प्रगट होईल. ती दिव्य स्फूर्ति आपणांत ( केशवसुतांत) आहे, आपण असा प्रयत्न अवश्य करावा, असें त्यांस लिहिलें असतां त्यांनीं लिहिलें:—

"Please tell (Mr. × ×) that I request him to undertake a *long poem* and not to waste time in writing short poems only. A century has passed without producing a long Marathi poem worth the name and it is for the geniuses like (×)and Mr. (× ×) to wipe out the disgrace. I am sorry I am a dwarf and don't show any signs as yet of outgrowing. I therefore hate myself and don't like others who atempt only small things.

"You can guess my state of mind from my piece in the last issue of Manoranjan ( हरपलें श्रेय ). A crab in the heart! But, alas! where is the restorative?"

## ईश्वराविषयीं विचार.

केशवसुतांचा ईश्वराच्या अस्तित्वावर विशेषसा भरंवसा नव्हता असें कांहींचें ह्मणणें आहे. या ह्मणण्यांत सत्यहि आहे आणि असत्यहि आहे. त्यांच्या कवितेचें सूक्ष्म अवलोकन केल्यास त्यांचा ईश्वरावर भरंवसा नव्हता असें केव्हांच ह्मणतां येणार नाहीं. उदाहरणार्थ—

( १ ) "जन बाळें तिजला स्मरलीं डोळ्यांत आंसवें आलीं
'देवा रे ' मग ती स्फुंदे एवढा तरी लाभूं दे."
( २ ) "जगांमधीं या तुला कशाला परमेशें धाडिलें?"

—'दंवाचे थेंब'

या कवितेंत तर परमेश्वराला उद्देशून बरींच वाक्यें आहेत. सर्वांचें नियमन करणारी परमेश्वरशक्ति या जगांत भरून उरली आहे हें त्यांनां मान्य होतें व त्या शक्तीला भक्तीनें आळविणें हें आपलें कर्तव्य आहे, असेंहि ते समजत. श्रीयुत आपटे यांच्या पुस्तकांतील पृ. १३ वरील "एक खेडें" ही त्यांची कविता पहा. या कवितेंत ते ह्मणतात:—

"देवळीं त्या देवास बळें आणा, परी राही तो सृष्टिमध्यें राणा.
उंच डोंगर ते उंच कडे भारी, पडे धो! धो! ज्यांचिया वरुनि वारी.
भोंवतालें रान तें दाट आहे; अशा ठायीं देव तो स्वयें राहे!
स्तोत्र ओढे थांबल्यावीण गाती, सूर वारे आपुला नित्य देती,
वृक्षगण तो नाचुनी डुल्लताहे; अशा भक्तीच्या स्थळीं देव राहे!"

( पृ. १४ केशवसुतांची कविता. )

अशा प्रकारचे देवाविषयीं जर त्यांचे उद्गार आहेत तर मग त्यांचा ईश्वरावर भरंवसा नव्हता, असें ह्मणण्यांत काय अर्थ? याचें उत्तर एवढेंच कीं, ते मूर्तिपूजक अथवा सगुणोपासक नसून निर्गुणोपासक होते. एके प्रसंगीं शंकराच्या पिंडीवर नाचल्याचें केशवसुतांनीं आपले मित्र 'किरात' यांनां सांगितलें, त्या वेळेस 'किरातां'नीं इतकेंच उत्तर दिलें, कीं, "या पिंडीतलेंहि ब्रह्म जेव्हां आपणास दिसेल तेव्हां तीच पिंडी आपण शिरावर घेऊन नाचाल!" आणि तें ब्रह्म केशवसुतांनीं पुढें आकळिलें होतेंसें दिसतें. उदाहरणार्थ:—

"तुझें नाम मुखीं, ध्यान तुझें डोळां, तुझे पायीं माथा वाहियेला."

ज्या मंजुळ श्रुतिमनोहर अशा चिन्मय नादश्रवणानुभवाचा उल्लेख बऱ्याच भगवद्भक्तांकडून जागजागीं झाल्याचा आढळतो व शेक्सपीअरनेंहि ज्याचा आपल्या पेरिक्लिज नाटकांत एके ठिकाणीं उल्लेख केला आहे, त्याच दिव्य आणि मधुर नादाचा अनुभव केशवसुतांनां होत असल्याचें त्यांच्याच तोंडानें किरातांशीं बोलतांना बाहेर पडलें, व त्यावर किरातांनीं त्यांनां सांगितलें, कीं, "ज्या अर्थी हा नाद तुह्मांला ऐकूं येऊं लागला आहे, त्या अर्थी हाच नाद तुह्मांला तुकारामादि साधुसंतांप्रमाणें एक दिवस साधू बनवून

परमेश्वराचा नाद लावील." यावर केशवसुतांनीं एवढेंच उत्तर दिलें, कीं, सध्यां "माझी जशी कवितेवर आसक्ति जडली आहे तशीच मग ती परमेश्वराच्या ठिकाणींहि जडेल."

## निर्यमक कविता.

केशवसुतांच्या कवितांचा बराच संग्रह आज आपणापुढें असल्यामुळें केशवसुत निर्यमक कवितेचे खरोखरच चहाते होते किंवा कसें, या प्रश्नाचा सहजच उलगडा झाला आहे. त्यांची कविता निर्यमक नाहीं. फक्त त्यांच्या चतुर्दशपदी कविताच काय त्या आपल्या यमकाच्या रूढीपासून भिन्न आहेत; पण त्यांतहि विशिष्ट ओळींचीं यमकें साधावीं लागतात. आणि हीं यमकें केशवसुतांनीं आपल्या **चतुर्दशपदी कवितेंत** साधलींच आहेत; आणि हीं त्यांनीं कां साधिलीं याचें विवेचन वर केलेंच आहे.

## कविता लिहिण्याची पद्धत.

केशवसुतांनां विचार सुचल्याबरोबर लागलीच ते कविता नेहमींच लिहून काढीत असें नाहीं. कधींकधीं त्या विषयावर त्यांचें कित्येक दिवस सतत चिंतन व मनन चालत असे. या मननाच्या क्रियेंत त्यांनां दिव्य दृष्टि प्राप्त होऊन त्यांच्या काव्यविषयाचें स्वरूप विशेष रमणीय दिसूं लागून त्याच्यांतलें गूढ त्यांनां अधिकाधिक उकलत जात असे. तें गूढ त्यांनां पूर्णपणें व्यक्त झाल्यावर मगच ते कविता लिहिण्यास बसत असत. ते शब्दांची छाननी पूर्ण कसोशीनें करीत. मनांतला मूर्त भाव शब्दचित्रांत जोंपर्यंत उतरत नसे तोंपर्यंत त्या चित्रावर ते आपली कुंचली सारखी फिरवीत असत. ज्या शब्दानें त्यांचा भाव पूर्णपणें व्यक्त होई तोच शब्द ते उपयोगांत आणीत. मग तो शब्द रूढ असो वा नसो, संस्कृत असो वा प्राकृत असो, हिंदी असो वा गांवढळ असो, ग्राम्य असो वा प्रौढ असो. यामुळें त्यांच्या कांहीं चुटक्यांतून अशा शब्दांची सरमिसळ झालेली आहे. आणि ह्याचमुळें ज्या वाचकांनां सरळ, गोड, मिळमिळीत व नटव्या ओळी वाचण्याची संवय झालेली आहे त्यांनां केशवसुतांची कविता वाचतांनां कसेंसेंच वाटतें! पण यांची केशवसुतांनीं मुळींच कधींहि पर्वा केली नाहीं. असो. "हवेंत

उडणाऱ्या म्हातारीवर मी एक चुटका लिहिणार आहें," हें प्रस्तुत लेखकाला सांगितल्यानंतर जवळजवळ एकदीड वर्षानें केशवसुतांची '**म्हातारी**' बाहेर पडली. तोच प्रकार "**आम्ही कोण ?**" याहि चुटक्याचा झाला. 'लढाईवर जाणाऱ्या वीरांच्या पत्नींचे अश्रु 'या विषयावरहि ते चुटका लिहिणार असल्याचें त्यांनीं म्हटलें होतें; पण हा अखेर मुळींच लिहिला गेला नाहीं. याप्रमाणेंच आणखी कितीतरी विषय त्यांच्या बरोबरच गेले असतील! महाराष्ट्र कवितादेवीचें हें दुर्दैव, दुसरें काय ?

## श्रीयुत वि. कों. ओकांची भेट.

केशवसुत हे मुंबईस असतांना बालबोध मासिकाचे कर्ते व सुप्रसिद्ध ग्रंथकार प. वा. श्रीयुत विनायक कोंडदेव ओक यांनां भेटले होते. आपल्या कविता त्यांनां दाखवून त्यांच्या कविता पहाण्याची त्यांनीं उत्सुकता दाखविली. श्रीयुत ओकांनीं बालबोधांतील आपल्या छापलेल्या कविता त्यांजपुढें टाकल्या; पण केशवसुतांनीं प्रसिद्ध न झालेली अशी आपली कांहीं कविता दाखवावी, म्हणून विनंति केली; पण श्रीयुत ओकांनीं ती विनंति अमान्य केली. याचें कारण विचारतां, " हस्तलिखित कविता पाहून वाचकांच्या मनावर योग्य तो परिणाम होत नाहीं म्हणून ती मी कोणास दाखवित नसतों. " असें त्यांनीं स्पष्ट सांगितलें. तेव्हां नाइलाज होऊन केशवसुतांनां गप्प रहावें लागलें; पण सुबक छापील कवितेनेंच मनावर विशेष काय परिणाम होत असेल हें त्यांनां समजेना. ही गोष्ट झाल्यानंतर कित्येक वर्षांनीं प्रस्तुत लेखकानें आपली एक चतुर्दशपदी कविता केशवसुतांच्याकडे पहाण्याकरितां पाठविली. ते ती वाचून कांहीं उत्तर लिहिणार होते इतक्यांत मासिक मनोरंजनाचा नवा अंक त्यांच्या हातांत पडला. त्यांतच प्रस्तुत लेखकानें त्यांच्याकडे पाठविलेली कविता गोंडस रीतीनें छापलेली त्यांच्या दृष्टीला पडली. तेव्हां ती त्यांनीं पुनः वाचली. प्रथम हस्तलिखित प्रत वाचल्यावर त्यांच्या मनावर जो कांहीं परिणाम झाला होता त्यापेक्षां अधिक अनुकूल असा ग्रह ती मुद्रित कविता वाचून झाला व श्रीयुत ओकांच्या म्हणण्यांत बराच अर्थ होता, असें त्यांनां वाटून समाधान वाटलें.

वरील हकीकत समक्ष भेटीअंतीं प्रस्तुत लेखकाला केशवसुतांनींच सांगितली होती.

येथवर केशवसुतांचें चरित्र, त्यांचा स्वभाव, त्यांची रहाणी, त्यांच्या आठवणी, त्यांचे कविमित्र, त्यांची काव्यमयकृति, त्यांचे काव्यसंबंधीं व ईश्वरविषयक विचार, वगैरे गोष्टींचा विचार केला. आतां आपण त्यांच्या कवितांकडे वळूं.

आतां काव्य ह्मणजे काय, खरी कविता कशाला ह्मणावयाची, तिचे किती प्रकार आहेत, कवितेचा उद्देश काय वगैरे गोष्टींसंबंधीं येथें कांहींच न सांगतां या सर्व गोष्टी आमच्या रसिक वाचकांनां माहित आहेत असेंच आह्मी धरून चालतों. तसेंच प्राचीन व अर्वाचीन कविकल्पनेंत व काव्यरचनेंत कोणते व कसकसे फरक पडले हेंहि प्रस्तुत स्थळीं आम्ही सांगत बसत नाहीं. प्राचीन कवि श्रेष्ठ, कीं, अर्वाचीन कवि श्रेष्ठ याहि वादांत आपणांला शिरण्याची जरूर नाहीं. आपला कवि अर्वाचीन आहे. तेव्हां आपणांला त्याचा विचार त्याच दृष्टीनें करावयाचा आहे.

## अर्वाचीन कवींचे वर्ग व त्यांत केशवसुतांचें स्थान.

अर्वाचीन मराठी कवींचे साधारणपणें तीन वर्ग करितां येतील. पहिला, प्राचीन संस्कृत कवींच्या शाळेंतले कवि; दुसरा, संस्कृत व इंग्रजी कवींतल्या शाळेंतले कवि; आणि तिसरा, या दोन्ही शाळांचा पूर्ण परिचय असूनहि ज्यांनीं काव्यस्फूर्तीनें स्वतःचा स्वतंत्र मार्ग काढिला असे कवि. या तिसऱ्या वर्गांत केशवसुतांनां रसिकजन आज पहिली जागा देत आहेत. 'काव्य ह्मणजे उत्कट मनोवृत्तींचा अनायासें बाहेर पडणारा महापूर,' ही वर्डस्वर्थ कवीची व्याख्या जर कोणत्या महाराष्ट्र कवीनें खरी करून दाखविली असेल तर ती केशवसुतांनींच दाखविली आहे. खऱ्या कवीचें कशावांचूनहि अडत नाहीं. '**खरें काव्य ह्मणजे कवीचेंच अन्तःकरण**' हें इमरसनचें ह्मणणें सिद्ध करणारा मराठी कवि केशवसुत हाच होऊन गेला. हा होऊन गेला इतकेंच; जणूं काय आधुनिक मराठी कवींनां एक अत्यंत हितकर नवीन दिशा दाखविण्यापुरताच हा कवि या जगांत एखाद्या धूमकेतू-

प्रमाणें उदय पावला आणि अदृश्य झाला ! यांच्या हातून यापेक्षां अधिक कार्य झालें नाहीं. तें यांच्या अनुगामी कवींनीं करावें अशी ईश्वरी योजना आहेसें दिसतें. आणि ही सिद्धीस जावो.

केशवसुतांच्या कविता सर्वच स्फुट Lyric (वीणाकाव्यें) आहेत. त्यांतील १२६ चुटके आज आपणासमोर आहेत. ह्या चुटक्यांवरील आपले विचार लिहिण्यास कशा प्रकारें प्रारंभ करावा व त्यासंबंधानें कोणता मार्ग स्वीकारावा, हेच प्रश्न सकृद्दर्शनीं आमच्यापुढें उभे रहातात. श्रीयुत आपटे यांच्या पुस्तकांत केशवसुतांच्या कविता कवींनीं लिहिलेल्या कालानुक्रमानें छापलेल्या आहेत असें भासतें. तेव्हां या दृष्टीनें त्यांच्या कवित्वशक्तीचें कसें विकसन झालें, त्यांचें भाषेवर प्रभुत्व कसकसें वाढत गेलें, त्यांनां वयानुपरत्वें कोणकोणत्या विषयां-संबंधीं जागृति झाली व अखेर त्यांची कविता कशांत विलीन झाली वगैरे गोष्टी कळण्यासारख्या आहेत. परंतु या मार्गानें त्यांच्या कवितांचा विचार करणें बरेंच कठीण जाईल. कारण प्रस्तुत लेखकाला जी माहिती आहे तिच्यावरून त्याला असें वाटतें, कीं, या संग्रहांत कालानुक्रम सर्वतोपरि अवलंबिला आहे असें नाहीं. कारण 'दिवस आणि रात्र' (९१) 'प्रीतीची भाषा' (७६), 'मनोहारिणी' (८७), 'प्रीति' (७४), 'रांगोळी घालतांना पाहून' (८६), 'दोन बाजी' (५७), 'नैऋत्येकडील वारा' (६३), 'निशाणाची प्रशंसा'(६२), 'कवितेचें प्रयोजन' (२०), 'तुतारी' (४७), वगैरे ज्या कविता उत्तरार्धांत आल्या आहेत त्या पूर्वार्धांत आल्या पाहिजे होत्या. या कविता केशवसुतांनीं बऱ्याच अगोदर लिहिलेल्या आहेत. उदाहरणार्थ, 'निशाणाची प्रशंसा' (पान १२७ ) व 'तुतारी' (पान ९८) या कविता 'कवितेचें प्रयोजन' या कवितेच्या आधीं लिहिल्या गेल्या असून आपट्यांच्या पुस्तकांत 'कवितेचें प्रयोजन' (२०) या कवितेनंतर त्या छापिल्या गेल्या आहेत. हें आमचें ह्मणणें 'कवितेचें प्रयोजन' (पान ५२) या कवितेंतील अन्तःप्रमाणांनींच सिद्ध होतें.

"हातीं घेउनियां 'निशाण' कवि तो पाचारितो बान्धवां
या हो या ! झगडावयास सरसे व्हा मेळवा वाहवा

प्रेतेंही उठवील जीं निज रवें, ती तो 'तुतारी' करी
आतां नादवती, निरर्थ तर ती त्याची कशी चाकरी ?"
( पृ. ५४ ) चु. २७.

या श्लोकावरून कवीला आपली काव्यकृती सरस असल्याची जाणीव असून त्याबद्दल त्याला योग्य अभिमानहि वाटत होता हेंहि दिसून येईल. वरील श्लोकांतील 'निशाण' व 'तुतारी' यांच्या उल्लेखावरून 'कवितेचें प्रयोजन' ही कविता निःसंशय त्यांच्या मागून लिहिली गेली आहे व असें असल्याबद्दल प्रस्तुत लेखकाची खात्रीहि आहे. यावरून हें उघड होतें, कीं, ज्या कवितांखालीं कवीच्या चोपडींत वर्ष व तारीख लिहिलेली सांपडली नाहीं त्या कविता संपादकांनीं आपल्या इच्छेनुरूप वाटेल त्या स्थळीं घुसडून दिल्या आहेत. अशा स्थितींत पुस्तकांत दिलेल्या कालानुक्रमावर भिस्त ठेवून त्यावर तर्कवितर्क करून अनुमानें बांधणें व सिद्धांत स्थापित करणें हें वरेंचसें धोक्याचें आहे. तेव्हां या मार्गाचा अवलंब न करितां दुसराच एकादा—चिकित्सक बुद्धीला पटेल असा मार्ग काढून, त्यावरच आपली समग्र भिस्त टाकणें विशेष श्रेयस्कर होय. हा दुसरा मार्ग ह्मणजे प्रस्तुतच्या संग्रहांतील समग्र कवितांचें विषयानुरूप वर्गीकरण करणें हा होय. हाहि मार्ग सुलभ नाहीं. केशवसुतांच्या कवितेचें वर्गीकरण करणें हें कामहि प्रस्तुत लेखकाला तितकेंच कठिण वाटतें.

विषयानुरूप वर्गीकरण करावयाचें म्हटलें तर या संग्रहांतील बरेच चुटके एकाहून अनेक वर्गांत पडण्यासारखे आहेत; व कांहीं चुटके तर कोणच्या वर्गांत घालावे हेंच समजणें कठीण पडतें. तथापि केवळ विवेचनाच्या सोयीकरितां म्हणून पुढील वर्गीकरण करण्यांत येत आहेः—

## चुटक्यांचे निरनिराळे वर्गः—

१. भाषान्तरित.
२. प्रेमविषयक.
३. व्यक्तिविषयक.
४. ऐतिहासिक.
५. विनोदात्मक.

६. पौराणिक.
७. संवादात्मक.
८. नैतिक.
९. भूतदयात्मक, सहानुभूतिपूर्वक व क्षुल्लक
विषयांवरून गंभीर विचार सुचविणारे.
१०. सृष्टिसौन्दर्यात्मक.
११. किरकोळ.
१२. कवि आणि कविता यांसंबंधीं.
१३. मनाला धीर देणारे, समाजाला
व राष्ट्राला जागे करणारे व
आशीर्वाद व प्रयत्नवाद
यांनीं ओथंबलेले.
१४. तात्त्विक व गूढ.

वरील वर्गीकरण हें यथोचित नाहीं हें वर सांगितलेंच आहे. परंतु वरील वर्गीकरण कवीच्या गुणावगुणांची योग्य अशी छाननी करण्यास विशेष सोयीचें होईल एतदर्थंच तें केलेलें आहे.तर आतां वर नमूद केलेल्या विचारसरणीनेंच केशवसुतांच्या कवितासंग्रहाकडे आपली दृष्टि कळवूं या.

## [ १. ] भाषान्तरितः

[ चुटक्यांचा पुस्तकांतील अनुक्रमांक. ]

**संस्कृतमधून**

‘ खिडकीकडे मौज पहावयास ’ ( १ )
‘किरातार्जुनीय सर्ग १ ’ ( २७ )

**इंग्लिशमधून**

‘ मरणकाल ’ ( ८९ ) ( Thomas Hood )
‘ मदन आणि मदनिका. ’ ( ८६ ) (Shakespeare )
‘ कामान्धत्व ’ ( २३ )
‘ ईश्वराचा ग्रन्थ ’ ( १० ) ( Shakespeare )

‘ जायाचें जग कां असेंच ?’ ( ४१ ) ( Drummond )
‘ सुभाषित ’ ( ११० )
‘ आपल्या प्रियेला कवीचा निरोप’ ( ७ ) ( Shakespeare )
‘ स्वप्नामध्यें स्वप्न ’ ( १२२ ) ( Edgar Allan Poe )
‘ तिनें जातां चुंबिलें असें यानें ’ ( ४६ ) ( Lee Hunt )
‘ घुबड ’ ( ३५ ) ( Edgar Poe )
‘ सृष्टि आणि कवि ’ ( ११४) ( Emerson )

बहुतेक सर्व आधुनिक मराठी कवींप्रमाणें केशवसुत यांनींहि संस्कृत इंग्लिश काव्यांचीं भाषान्तरें अथवा रूपान्तरें करूनच काव्याचा ओनामा गिरविला.

‘ खिडकीकडे मौज पहावयास ’ हा चुटका रघुवंशांतून घेतला असून, ‘किरातार्जुनीया’ च्या एका सर्गाचें तर त्यांनीं रूपान्तर केलें आहे. या चुटक्यांच्या भाषेंकडे लक्ष्य दिलें असतां ती बहुतेक जुन्या वळणाचीच आहे, असें आपणाला दिसून येईल. इंग्रजींतून निवळ भाषान्तर किंवा रूपान्तर केलेले असे १० चुटके आहेत. यांच्यांतहि प्रथमप्रथम लिहिलेल्या चुटक्यांत कवीची भाषा थोडीशी विस्कळीतच दिसते. उदाहरणार्थ ‘मरणकाल’ ही कविता पहा. हिची भाषाच अशी पडली आहे, कीं, ती कानाला कितपत गोड लागेल याची शंका वाटते. इंग्रजी भाषेंतील विचार मराठींत—चांगल्या मराठींत—कवीला मांडतां आले नाहींत, हें या कवितेवरून आपल्या निदर्शनाला येईल. पण तेंच पुढील कविता वाचल्यास त्यांत कवीच्या भाषेची व मूळांतील कल्पनेशीं तादात्म्य झाल्यामुळें ती मांडण्यांत लागणाऱ्या कौशल्याची प्रगतिच होत गेली आहेसें दिसून येईल. या सदराखालीं येणाऱ्या कवितेंत स्वतः कवीचें असें फारच थोडें असल्यामुळें त्याबद्दल विशेष लिहितां येत नाहीं. तरी पण मूळ कवितांशीं ताडून जर आपण हीं भाषान्तरें वाचलीं तर तीं बरींच बेमालूम साधलीं आहेत, एवढेंच नाहीं, तर तीं कोठें कोठें मूळाहूनहि सरस साधलीं आहेत, असें आपल्या ध्यानांत येईल. या कवितांबद्दल मुख्य श्रेय मूळ इंग्लिश कवींनां दिलें पाहिजे. त्यांच्या

मराठी पेहरावाबद्दल केशवसुत जबाबदार आहेत, व तो पेहराव त्यांनीं नीट नेटका चढविला आहे, यांत शंका नाहीं.

भाषान्तरित या सदराखालीं नमूद केलेल्या कवितांत अप्रतिम आणि अव्वल नंबरची कविता ह्मणजे 'घुबड' ही होय. ही कविता जरी 'पो' कवीच्या 'रेव्हन' काव्या वरून सुचली आहे तरी तिच्यांत परकीय कल्पनांचें मुळींच वातावरण नाहीं. ती सर्वस्वी केशवसुतांचीच आहे. यांत ज्याची 'गुणरूपवती प्रिया निमाली' आहे अशा जनाच्या मानसिक स्थितीचा हुबेहुब चित्रपट फारच बहारीनें रेखाटला गेला आहे. प्रसंग मध्यरात्रीचा, ती रात्रहि अंधारी, सगळीकडे शांतता—"स्तब्धत्व जनीं स्तब्धत्व मनीं" अशा वेळीं विरहव्यथित जन, दयितानिधनानें ज्याच्या मनांत घोर निराशा वास करीत आहे असा घुबडाचा घूत्कार ऐकून आपल्या मनाशींच प्रश्न करतो व घुबड त्याच्या सर्व प्रश्नांस आपल्या एकच भीषण घूत्कारानें—ऊं हूं, घू घू—नें उत्तर देतो. त्याच्या प्रत्येक प्रश्नाला नकारार्थींच उत्तर येतें त्यामुळें त्याची स्थिति फारच विलक्षण होते. या कवितेंतील नायकाच्या मानसिक स्थितीच्या प्रसंगाला योग्य व अनुरूप अशीच सृष्टीच्या वर्णनाची भूमिका घेतली गेली आहे. मानवी हृदय आणि सृष्टीचें जीवन यांचा परस्पर संबंध व परस्परांवर त्यांचे परिणाम यांचें मूर्त चित्र या कवितेंत रेखाटलें गेलें आहे. इंग्रजी कवितेंतील Raven च्या ऐवजीं घुबड या पक्ष्याची योजनाहि फारच अजब झाली आहे. या अशुभ पक्ष्याकडून हृदयांतील विषण्ण विचारांनां फारच खुलावट दिली गेली आहे व घुबडाच्या घूत्काराचा उपयोग कवीनें फारच बहारीनें करून घेतला आहे. ही कविता कितीदां जरी वाचली तरी पुरे असें वाटतच नाहीं. या कवितेच्या शेवटल्या तुकड्यांत नायकाच्या मनांतील नैराश्याचा भर व घुबडाचें आपल्या स्थलावरून न हालणें यांतच आपणाला कवि सोडून देतो. या भयंकर विषण्ण वातावरणांत शिरल्यामुळें कविता वाचून झाल्यावर देखील कांहीं काल वाचक सुस्कारे टाकीत निस्तब्ध होऊन जातो. ही कविता प्रत्येक रसिकानें अवश्य वाचावी. साधल्यास मूळ इंग्रजी कवितेशीं ती ताडूनहि पहावी.

## (२). प्रेमविषयक.

[ चुटक्यांचा पुस्तकांतील अनुक्रमांक. ]


‘ प्रियेचें ध्यान.’ ( ७३ )

‘ जरी तूं या येथें असतिस सखे सौख्यद मला.’ ( ४० )

‘ अपर कविता–दैवत.’ ( २ )

*‘ नाहीं ज्या परि डोंगळा कधिंहि तो गेला क्षणीं साखरे.’ ( ६० )

‘ अहा पक्षी हे चित्र पक्ष यांचे ! ’ ( ३ )

‘ प्रणयगीत.’ ( ७२ )

‘ विकसन. ’ ( १०२ )

‘ प्रत. ’ ( ७० )

‘ काल आणि प्रियेचें सौन्दर्य. ’ ( २४ )

‘ माझा अन्त.’ ( ९० )

‘ स्वप्न.’ ( १२१ )

‘ त्वत्प्रीतीस अपात्र हा जन.’ ( ४८ )

‘ माझें ठेउनि चित्त घे.’ ( ९१ )

‘ चिरवियुक्ताचे उद्गार.’ ( ३७ )

‘ थकलेल्या भटकणाराचें गाणें.’ ( ४९ )

‘ प्रीति आणिक तूं.’ ( ७५ )

‘ रुष्ट सुन्दरीस.’ ( ९८ )

‘ सुन्दरीदर्शन. ( ११३ )

‘ कविच्या हृदयीं जरी गुंगती.’ ( २१ )

‘ फार दिवसांची भेट.’ ( ७७ )

‘ प्रणयकथन. ’ ( ६९ )

‘ वियुक्ताचे उद्गार.’ ( १०४–१०५ )

‘ स्मरण आणि उत्कण्ठा.’ ( ११९ )

‘ वियोगामुळें.’ ( १०६ )

‘ प्रीतीची भाषा.’ ( ७६ )

‘ मनोहारिणी.’ ( ८७ )

‘ प्रीति.’ ( ७४ )

वरील यादीवरून केवशसुत 'स्त्रीपुरुषप्रेमां'त कितपत रंगले होते, याची आपणाला कल्पना येईल. प्रेम हेंच जीवनाचें सार आहे, या मानानें केशवसुतांच्या कवितांचा बराचसा भाग या विषयाला वाहिला गेला असल्यास नवल नाहीं. 'प्रीती वसते संयोगीं नच परी वियोगीं खरी' या ह्मणीप्रमाणें बरीचशी कविता पत्नीपासून दूर असल्या काळांतच तिचीं प्रेम-चित्रें काढण्यांत कवीनें लिहिली आहे. यांत संयोगाचींहि चित्रें आहेत, पण थोडीं. यांच्या या चुटक्यांतून शुद्ध व विप्रलंभ या शृंगाराच्या दोन्ही प्रकारचीं चित्रें आहेत, व शुद्धांपेक्षां विप्रलंभाचाच भाग विशेष आहे. या चुटक्यांतील प्रत्येकांत कांहींनाकांहीं विशिष्ट गुण आहे. तो वाचीत असतांना वाचकांच्या मनाला हलवून सोडीत असतो. प्रत्येक रसिक वाचकाला या कविता वाचीत असतां आपण आपल्या आयुष्यांत अनु-भविलेल्या प्रसंगांचींच मूर्त चित्रें आपण पहात आहों असें वाटून तो आनंदांत रंगून गुंग होऊन जातो. निःसीम पत्नीप्रेमाचे मासले यांत अनेक आहेत. यांतील प्रत्येक कवितेच्या अर्थाचा विस्तृतपणें स्फोट करून लिहूं गेल्यास फारच विस्तार होईल. तरी पण या सदरांत आलेल्या कांहीं कवि-तांचा वरवर तरी थोडाबहुत विचार केल्याशिवाय आमच्यानें पुढें जाववत नाहीं; व असें करण्यापासून, केशवसुतांविषयीं प्रेम व आदर असणाऱ्या कविताप्रिय वाचकांचा आमच्यावर केवळ रोषच होईल, अशी भीति वाळ-गण्याचेंहि कांहीं प्रयोजन नाहीं.

**प्रियेचें ध्यान** (पृ. ४, चुटका ४ था) या कवितेचा प्रसंग—कवि आपल्या पत्नीचा निरोप घेऊन पुण्यास येऊन पोंचल्यानंतर त्याला निघण्याच्या आदल्या दिवशींच्या रात्रीच्या प्रसंगाची आठवण होऊन तो व्यथित होतो, असा आहे. यांत वर्णिलेले प्रसंग व कवीच्या मनाची विरहामुळें झालेली स्थिति कोणत्या तरुणानें अनुभवली नसेल बरें !

जरी तूं या येथें०—( पृ. ८, चु. ८) यांत कवि आपल्या पत्नीला 'प्रिये ! कान्ते ! ' असें संबोधून पत्र लिहावयाला बसतो; पण 'प्रिया' हें तोंडानें उद्गार-ण्याचें संबोधन लांकडाच्या—बोरूच्या—लेखणीनें लिहावें लागावें, ही कल्पना

मनांत येऊन त्याला अत्यंत वाईट वाटतें—कुठें प्रिया आणि कुठें हें लांकूड! तेव्हां अर्थातच—

पुरीं हाताच्यानें नच करवती तीं प्रिय जरी
न वा डोळ्यांच्यांनीं क्षण बघवती तेंवि अपुरीं;
पुसाया तीं इच्छी परि कॅर धजेना ह्मणुनियां
कराया सांगे तें स्वनयन–जलांला रडुनियां!

हीं अर्धवट लिहिलीं गेलेलीं संबोधनें धड पुरींहि करवेनात, अथवा अपुरींहि ठेववेनात; तेव्हां तीं पुसूनच टाकावीं, असें कवीला वाटलें. पण त्याच्या हातांच्याकडून ही निर्दय कामगिरी होईना. तेव्हां कवीला रडें कोसळलें व त्याच्या नयनजलानेंच ती कामगिरी केली! किती रमणीय चित्र हें?

**अपर कविता–दैवत.** (पृ. १०, चु. १०) यांत कवि पत्नीपासून दूर असतांना त्याचा काव्याचा मुख्य विषय त्याची प्रियकांता झाल्याचें दिसून येतें. या वेळीं कवि विशीएकविशींत होता. अर्थात् या चुटक्यांत कवीची शृंगारलोलुपता विशेष दिसून आल्यास नवल काय?

**नाहीं ज्यापरि डोंगळा०**–(पृ. १२, चु. १२) या कवितेंत निरनिराळ्या दृष्टांतांच्या द्वारें कवीची प्रणयासक्ति प्रगट होत आहे. दृष्टांतांतील भऱ्या शेले कवीची स्मृति देतात.

**विकसन.** ( पृ. ४१, चु. २७ ) या लहान चुटक्यांत कळी आणि तरुणी यांच्या विकसनाची फारच खोंचदार मिळवणी करून दाखविली आहे.

**'—प्रत.'** (पृ. ४८, चु. ३३) हा चुटका लहानच, पण नितांत रमणीय आहे! यांत प्रेमी माणसांच्या जीवनाचें एकजीवत्व फारच कुशलतेनें दाखविलें आहे.

नाडि माझी तव करीं वाहताहे
हृदय माझें तव उरीं हालताहे!
करा अपुल्या तूं पहा चांचपून
उरा आपुलिया पहा तपासून.

प्रकृति माझी ही तुज तिथें कळेल,
विकृति माझी तिथें तुज आढळेल!

काल आणि प्रियेचें सौंदर्य, (पृ.५४,चु. ३८) यांत, दुष्ट काळ कालावधीनें आपल्या प्रियेचें सौन्दर्य हिरावून नेईल, पण तें त्यास नेतां येऊं नये ह्मणून कवीनें एक अजब योजना शोधून काढली आहे, ती अशी:—

काळ्या शाइमध्यें प्रियेस अपुल्या मी कागदीं ठेवितों
तेथें अक्षयरूपिणी सतत ती राहो असें इच्छितों!

कल्पनेचें केवढें उड्डाण हें!

'माझा अंत' (पृ. ६१, चु.४२) या लहानशा कवितेंत—मुसमुसणारें स्त्रीसौंदर्य पाहून तरुणाच्या मनावर जो परिणाम होतो त्याचें उत्तम चित्र रेखाटलें आहे. हें अनुपमेय सौंदर्य पाहून कवीचे नेत्र एकदम तारवटून गेले, त्याला ज्वर भरला, तो भ्रमिष्ठ झाला, त्याला शुद्धीच उरली नाहीं, व त्या शुद्धीबरोबर तोहि विनष्ट झाला! व शेवटीं उद्गारला:—

माझा असा अंत अहो जहाला!
'कोठूनियां हा मग येथ आला?—'
ऐसा तुम्हां संशय येतसे का?
मी भूत हें मम असे, नच यांत शंका!

हा मी नव्हें, हें माझें भूत आहे! या कल्पनेंत केवढी आणि कितीतरी विलक्षण अर्थपूर्ण जादू भरली आहे!

'स्वप्न' (पृ. ६३, चु. ४४) या चुटक्यांतील कल्पनेची भरारी फारच कुतूहल—जनक व उच्च दर्जाची आहे. यांत कवि स्वप्नांत आपल्या बाहूंस हंसाचीं पिसें लावून उड्डाण करून एका तेजोमयी ताऱ्यावर जातो; तेथें त्यास त्याच्या प्रियेची स्मृति होते, तोंच तीहि तेथें येऊन त्यास दृढालिंगन देते. इतक्यांत एकाएकीं:—

पायाखालुनि जाय हाय! तुटुनी तारा परी तो सवें!"

आणि कवीला एकदम धक्का बसून तो घसरून पृथ्वीवर पडतो, व सर्व

स्वप्नसृष्टि मावळून तो जागा होतो व हंसाचीं पिसें लावलेले ते बाहू नसून आपलेच हात आपल्या छातीवर असल्याचें त्याचे प्रत्ययास येतें. कवीच्या कल्पनाशक्तीचें केवढें उच्च उड्डाण हें !

**कर्तव्य आणि प्रीति किंवा प्रियेला सादर केलेली पुष्पमाला.** (पृ. ६९, चु.५०)ही अभिनव पुष्पमाला कधींहि न कोमेजतां अनंतकालपर्यंत एकसारखी सुगंधी राहील, अशीच अलौकिक आहे. या चुटक्यांत कवीचें आपल्या पत्नीवरील निःसीम, गाढ व पवित्र प्रेम अत्यंत उत्कर्षानें प्रतिबिंबित झालें आहे. ही कविता म्हणजे केशवसुतांच्या प्रेमविषयक कवितांचा कलिजा अथवा आत्माच होय. ही कविता वाचीत असतांना हृदयसरोवरावर सात्त्विक प्रेमाच्या लहरी शांत व गंभीरपणें हेलकावे खाऊं लागतात ! या कवितेचीं जितकीं पारायणें करावीं तितकीं अपुरींच वाटतात. या कवितेंत उपमा इतक्या गोड, समर्पक, व हृदयस्पर्शी आहेत, कीं, त्या वाचतांना वाचक आनंदानें डोललाच पाहिजे !

**चिरवियुक्ताचे उद्गार.** (पृ. ९२, चु. ६७),
**वियुक्ताचे उद्गार.** (पृ. १५०, चु. १०२),
**प्रीति आणिक तूं.** (पृ. ११०, चु. ७७),
**स्मरण आणि उत्कण्ठा.** (पृ.१५२,चु. १०४),
**वियोगामुळें.** (पृ. १६१, चु. १११)

वगैरे चुटके फारच हृदयंगम आहेत. या चुटक्यांत उच्छृंखल प्रेमाला यत्किंचितहि वाव नसून गंभीर प्रेमाचा निर्मल ओघ यांच्यांतून खळखळून वहात आहे, असें ते वाचीत असतां वाचकांनां पदोपदीं आढळून येईल.

**'थकलेल्या भटकणाराचें गाणें'** (पृ.१०९, चु.७६) हें गाणें कवीनें सरल, सुलभ व गोड भाषेंत रचलें आहे. यांत प्रियेच्या मीलनाचा ध्यास आणि तिच्या विरहापासून होणारा त्रास यांचें वर्णन फारच खुबीदार रीतीनें केलें आहे. हें गाणें द्व्यर्थी असून प्रियेप्रमाणें कवितेसहि तें लागू पडतें, व त्यामुळें तें वाचीत असतांना रसिकाला ध्वनींतून निघणाऱ्या अर्थापासून एक विशेष प्रकारचा आनंद अनुभवावयास मिळतो.

**रुष्टसुंदरीस.** (पृ.११५, चु.८२) हा चुटकाहि द्व्यर्थी आहे असें वाटतें. याची भाषाहि तितकीच सोपी, सुलभ-जिव्ह आणि कर्णमधुर असून चाल लावणीची आहे.

**फार दिवसांनीं भेट.** फार दिवसांनीं पतिपत्नी एकमेकांनां भेटलीं असतां त्यांच्या होणाऱ्या अवस्थेचें वर्णन यांत अगदीं वस्तुस्थितीला धरून फारच बहारीचें रेखाटलें आहे. या चुटक्यांत, पुनः असा वियोग होण्याचा प्रसंग आल्यास 'यावा मृत्युच त्याच सुवेळीं' या परस्परांच्या हृदयांतील भावाचें जें दिग्दर्शन केलें आहे, त्यामुळें तर कवीच्या मनोवृत्तींचा येथें कडेलोटच होत आहेसें दिसतें, व या चिमुकल्या कवितामंदिरावर ही कल्पना सुंदरशा कळसाप्रमाणें शोभूं लागून हृदय आनंदसागरांत पोहूं लागतें !

**प्रणयगीत.** ( पृ. ४१, चु. २६ ) व '**प्रणयकथन**' ( पृ. १२४, चु.९१) हे चुटके वाचीत असतांना शेले कवीच्या Love's philosophy या कवितेची स्मृति झाल्यावांचून रहात नाहीं. या दोन्ही चुटक्यांवर त्या कवितेचा पूर्ण छाप दिसतो.

**प्रीति.** (पृ. १८१, चु. १२४) हा चुटका जरी अगदीं लहान आहे, तरी तो फारच अर्थपूर्ण आहे. यांत प्रीतीचा कोठेंहि शोध करून ती सांपडणार नाहीं, ती सांपडण्याचें नेमकें स्थल ह्मणजे 'प्रिय—जन—हृदय' हेंच होय, हें मोठ्या मार्मिकपणें कवीनें वर्णिलें आहे.

**मनोहारिणी.** (पृ. १७७, चु. १२१) या चुटक्यांतील शब्दलालित्य, साध्या कल्पना व सरळ रचना, हीं सर्वच अत्यन्त वाखाणण्यासारखीं आहेत. ही कविता रसिकांनीं एक वेळ तरी अवश्य वाचून पहा.

'**प्रेमविषयक**' कवितांच्या वरील विवेचनावरून आपणांस कळून येईल, कीं, केशवसुत हे प्रेमाच्या तीनीहि अवस्थांतून गेले होते. प्रथमतः ते शरीर-सौंदर्याच्या व शृंगाराच्या—अथवा बाह्य प्रेमाच्या ह्मणा—गोष्टींत रमले होते. तेंच पुढें त्यांचें प्रेम बाह्य गोष्टींतून निघून हृदयाच्या अंतर्गूढ अशा प्रीतीच्या शुद्ध स्वरूपाकडे धांव घेऊं लागलें, आणि त्यांची तिसरी अवस्था ह्मणजे त्या अंतर्गूढ प्रेमाची त्यांनां ओळख पटून त्यांत ते विलीन होऊन गेले.

वयपरत्वें, ज्ञानपरत्वें व अनुभवपरत्वें याच अवस्था प्रत्येक मनुष्य आपल्या आयुष्यांत अनुभवीत असतो. या तीनहि अवस्था केशवसुतांनीं अनुभवून त्यांचीं मूर्त चित्रें त्यांनीं आपणांपुढें मांडलीं आहेत. उत्पत्ति, स्थिति आणि लय किंवा एक-स्वरूपत्व या तीनहि अवस्था आपआपल्यापरी सुखकरच आहेत. असो.

## [ ३. ] व्यक्तिविषयक.

'दुर्मुखलेला.' (पृ. ११, चु. ११ )
'गांवीं गेलेल्या मित्राची खोली लागलेली पाहून.' (पृ. १७, चु. १४ )
'गोष्टी घराकडिल मी वदतां गड्या रे !' (पृ. २४,चु. १६ )
'वा. ब. पटवर्धन यांस.' (पृ.४६, चु. ३२ )
'पण लक्ष्यांत कोण घेतो ?' च्या कर्त्यास (पृ. ९१, चु. ६५ )
'नैर्ऋत्येकडील वारा.' (पृ. १२८, चु. ९३ )
'आईकरितां शोक.' (पृ. १५३,चु. १०५ )

**दुर्मुखलेला.** (पृ. ११,चु. ११) वर्गांत एका शिक्षकानें केशवसुतांना दुर्मुखलेला ह्मटल्यावरून कवीला तें विशेषण शल्याप्रमाणें बोंचलें. ही मानखंडना असह्य होऊन त्यांच्या मुखांतून साहजिकच जी दर्पोक्ति कवितारूपानें बाहेर पडली, तिच्यांत कवि गुरूला बजावतातः—

याचें तोंड कुरूप हें विधिवशात् गाईल काव्यें नवीं !
तेणें सर्वहि डोलतील जन हे हर्षें कदाचित् भुवि !

× × ×

माझ्या दुर्मुखल्या मुखामधुनि या, चालावयाचा पुढें
आहे सुन्दर तो सदा सरसवाङ्निष्यंद चोहींकडे !
तुह्मी नाहिं तरी सुतादि तुमचे धातील तो प्राशुनी
कोणींही पुसणार नाहिं, 'कवि तो होता कसा आननीं ?'

वरील दर्पोक्ति वाचून पंडित जगन्नाथरायांच्या किंवा प. वा. प्रो. आगरकरांच्या दर्पोक्तींची वाचकांना आठवण झाल्यावांचून रहाणार नाहीं.

केशवसुत हे तरी आगरकरांचेच चेले! केशवसुतांनीं केलेल्या भाकिताप्रमाणें दिवस उगवल्याचें आज आपण प्रत्यक्ष पहात आहोंत. त्यांच्या वाणीचा सरसवाङ्निष्यन्द चोहोंकडे झिरपत असल्याचें आपल्या अनुभवाला येत नाहीं काय? त्यांच्या कवितांचे वेंचे क्रमिक पुस्तकांत उद्धृत केले जाऊन, त्यांचें रहस्य शिष्यास उकलून सांगण्याचा प्रसंग याच गुरूवर आज आला नाहीं काय? या एकाच चुटक्यावरून कवीचा आत्मविश्वास केवढा दांडगा होता, याची प्रचीति प्रत्येक वाचकाला आल्यावांचून राहणार नाहीं!

**गांवीं गेलेल्या मित्राची खोली लागलेली पाहून** (पृ.१७,चु.१४) या कवितेंत कवीचें आपल्या मित्रावरील प्रेम तर स्फटिकासारखें स्पष्ट दिसत आहे; पण या कवितेंत 'पाशावांचूनि कांहीं नाहीं,' ही कल्पना फार गोड शब्दांत गुंफली गेली आहे:—

पाशाविण या कोठें कांहीं नाहीं,
पाशाकरितां चाले अवघें कांहीं.
पाशांतुनि या सुटतां सुन्दर तारे,
तेज तयांचें विझूनि जाई सारें!

ह्या आकर्षणाच्या—पाशाच्या—व्यातीचें सत्य कथन करीत असतां कवीची भरारी एकदम कोठवर गेली आहे तें पाहिलें म्हणजे मोठें आश्चर्य वाटतें.

या कवितेंतील विचार वाचून प्रत्येकाला 'Aspirations of youth' ह्या कवितेची स्मृति झाल्यावांचून रहाणार नाहीं.

देशाचा ऱ्हास व पारतंत्र्य या संबंधानें कवीला कशी तळमळ लागून राहिली होती हें याच कवितेंतील खालील उताऱ्यावरून स्पष्ट दिसून येईल:—

देशाविषयीं गोष्टी बोलत येथें
बसलों, विसरुनि कितीकदां निद्रेतें;
श्वासीं अमुचे श्वास मिळाले तेव्हां,
अश्रूमध्यें अश्रु गळाले तेव्हां!

या प्रसंगाचा एखाद्या चित्रकारानें जर सुंदर चित्रपट रेखाटला तर तो किती बहारीचा होईल !

यापुढें कवी काय म्हणतात तें पहा:—

तेव्हां आह्मीं ह्मटलें—'ही ऱ्हासाची
रजनी केव्हां जाइल विरूनि साची ?—
स्वतंत्रतेची पहांट ती येईल,
उत्कर्षाचा दिन केव्हां सुचवील ?—
या डोळ्यांनीं पहाट ती बघण्याचें
असेल का हो ! नशिबीं दुर्दैव्यांचे ?
किंवा तीतें आणायाचें कांहीं
यत्न आमुच्या होतिल काय करांहीं ?'

वरील ओळींवरून कवीच्या ठिकाणीं देशाभिमानाची ज्योत किती तीव्रत्वानें तेवत होती याची वाचकांस बरोबर कल्पना येईल.

या कवितेंतील शेवटल्या म्हणजे १३ व्या श्लोकांत कवीनें 'मित्र' या शब्दावर थोडी मौज केली आहे, म्हणून तो श्लोक खालीं देत आहोंत.

झाल्यानंतर अस्त तो, कमल तें पाहूनियां लागलें
'उद्यां मित्र करील तो निजकरें येऊनि याला खुलें,'
ऐसें बोलुनि ज्यापरी भ्रमर तो जातो श्रमानें दुरी,
जातों, बोलूनि या स्थलासहि तसें, मित्रा ! अतां मी घरीं !

या श्लोकांतील सर्वच रूपक फार गोड साधलें आहे.

**गोष्टी घराकडिल मी वदतां गड्यारे !** (पृ. २४, चु. १६) ही कविता कवीच्या स्वगृहविषयक व आप्तजनविषयक प्रेमासंबंधानें अगदीं ओथंबलेली आहे. यांतील वर्णन इतकें मूर्त आहे, कीं, यांत वर्णिलेलें घर व त्याची मांडणी वगैरे झाडून अगदीं लहानसहान गोष्टी देखील आपणाला दिसूं लागून तें स्थल आपण प्रत्यक्षच पहात आहों, असें वाटतें. यांत कवीचें आपल्या मातापितरांवरील, बंधुभगिनींवरील व तसेंच पत्नीवरील अलोट प्रेम व्यक्त होत आहे.

**पटवर्धन यांस.** (पृ. ४६, चु. ३२.) ही कविता एका कविमित्रास पत्र ह्मणून लिहिली असल्यामुळेंच आम्हीं ती व्यक्तिविषयक कवितांत ओढली आहे, इतकेंच काय तें. बाकी, या कवितेंत केशवसुत कवीची दिव्य दृष्टि व शक्ति केवढी असते हें मोठ्या शालीनतेनें आपल्या कवि-मित्रापुढें मांडून, भविष्यत्काळीं होणाऱ्या कवींनां त्यांच्या संचाराचें क्षेत्र केवढें मोठें आहे, ही गोष्ट पर्यायानें त्यांच्या अंतःकरणावर बिंबवीत आहे.

"आहे तुला सर्वहि सृष्टि मोकळी,
व्योमांतली सर्वहि तेंवि पोकळी;
संचार कीजे तरि तूं स्वमानसें,
कोठें जराही प्रतिबंध तो नसे !
या अन्तरालांतिल तारकांत
आत्मे कवीलागुनि दीसतात;
कांचेमधूनी दिसतें जनांला,
धोंड्यामधूनीहि दिसे कवीला !
निर्जीव वस्तु तर लाव वदावयाला !
जन्तूस लावहि विचार करावयाला !
आम्हां शिकीव सुवचीं सुर व्हावयाला !
पृथ्वीस सांग अमरावति जिंकण्याला !

× × ×

ऐकती न बघती न जें जन,
गम्य होयचि कवीस तें पण;
हे ह्मणून नर जातिचे खरे
नेत्र कर्णचि नव्हेत का बरें ?

'पण लक्ष्यांत कोण घेतो ?' च्या कर्त्यास (पृ. ९१, चु. ६५) या चुटक्यांत योग्य पुरुषास योग्य कवीनें जें योग्य ह्मणावें तेंच योग्य शब्दांत ह्मणून त्याचा मोठ्या प्रेमानें गौरव केला आहे. पण—?

**नैर्ऋत्येकडील वारा.** ( पृ. १२८, चु. ९३ ) यांत कवीचें आपल्या जन्मभूमीवरील प्रेम व्यक्त होतें. तसेंच सृष्टिसुंदरीच्या जडस्वरूपाचें वर्णन कवीनें यांत फार मोहक शब्दांनीं केलें आहे;तसेंच हा जन्मभूमीवरून येणारा वायु कवीस तेथील 'वनदेवतांचें' खालील गाणें आणून पोंचवितोः—

'वाग्देवीसुत जन्मला अपुलिया ग्रामांत, यालागुनी
जैजैकार करा, सुरां परिसवा हा मंगलाचा ध्वनी !'

कवीनें वनदेवतेकडून ( स्वतःविषयीं ) वदविलेल्या ह्या उद्गारांवरून कवीला आपल्या ठिकाणीं वसत असणाऱ्या कवित्वशक्तीची केवढी जाणीव आणि केवढा आत्मविश्वास होता, याची वाचकांस सहज कल्पना येईल! तोच वायु मातामह, मातापितरें, व ज्येष्ठ बंधु यांचीं आशीर्वचनें, आणि पत्नीनें आपल्या श्वासांनीं लिहिलेलीं, डोळ्यांच्या पाण्यांनीं विरामचिन्हें दिलेलीं,व प्रीतीनें भरलेलीं अशीं प्रेमपत्रें आणून पोहोंचवितो.ह्या चुटक्यांतहि कवीचें आप्तजनांवरील प्रेम चांगल्याच तऱ्हेनें व्यक्त झालें आहे.

**आईकरितां शोक** (पृ. १५३, चु. १०५) हें करुणरसभरित गीत वाचीत असतां अंतःकरण भडभडून येऊन कोणाच्या डोळ्यांतून टिपें गळल्यावांचून रहातील !

या सदरांत नमूद केलेल्या कवितांवरून कवीचें मातृभूमीवरील, स्वदेशावरील, मित्रांवरील आणि सर्व आप्तजनांवरील उत्कट प्रेम स्पष्टपणें दिसून येतें. कवीच्या बाणेदार आणि प्रेमळ स्वभावाचे आणखी याहून अधिक रमणीय चित्रपट प्रस्तुत कवितांहून अन्यत्र कोणत्या स्थळीं आढळणार !

## [ ४. ] ऐतिहासिक.

'जयाजीराव शिंदे आणि तुकोजीराव होळकर.' ( पृ. ५, चु. ५ )
'.मयूरासन आणि ताजमहाल.' (पृ.९२,चु.६६)
' दोन बाजी. ' ( पृ. १५४, चु. १०६ )

**' जयाजीराव आणि तुकोजीराव,'** (पृ. ५,चु.५ )महाराज जयाजीराव शिंदे व महाराज तुकोजीराव होळकर या थोर राजकारणपटु महाराजांचा अंत झाल्याचें ऐकून आमच्या स्वदेशाभिमानी कवीचें अंतःकरण

उलून जाणें अगदीं स्वाभाविकच होतें. या पुरुषांचे मूळपुरुष जे राणोजी आणि मल्हारी–जे महाराष्ट्रपदपादशाहीचे केवळ आधारस्तंभच–त्यांची केवळ स्मृति देऊनच कवीनें आपल्या देशबांधवांपुढें मागील सर्व इतिहास एकदम मूर्तिमंत उभा केला आहे! हा नुसता नामोच्चारच आहे, पण तो कोणच्या जातिवंत मराठ्याच्या अंगांत स्फुरण भरविल्यावांचून राहील ?

**मयूरासन आणि ताजमहाल.**(पृ. ९२, चु. ६६) शहाजहान बादशहानें सहा कोटि रुपये खर्च करून केवळ स्वतःच्या दिमाखाकरितां–अर्थात् स्वार्थाकरितां–मयूरासन तयार करविलें, व तें चोरांनीं चोरून पळवून दूरहि नेलें; पण प्रेमाखातर यमुनातीरीं तीन कोटि रुपये खर्च करून प्रेममंदिर–अर्थात् ताजमहाल बांधिला तो मात्र अजून जशाचातसाच उभा आहे ! यावरून स्वार्थाकरितां केलेल्या गोष्टी क्षणैक असतात, पण त्याच प्रेमाकरितां केलेल्या अक्षय्य टिकणाऱ्या असतात, हें सर्वकालीन सत्य कवीनें केवढ्या शिताफीनें दाखविलें आहे पहा:—

विल्हेवाट अशीच रे तव कृती त्या सर्वदा पावती
मत्त भ्रान्त नरा ! सदैव कितिही तूं धूप रे जाळिला;
स्वार्थाच्या प्रकृतीपुढें–निजमनीं ही याद तूं जागती
राहूं दे–तरि धूर होइल जगीं केव्हांच तो लोपला !
काडी एकच गन्धयुक्त, नमुनी प्रीतीस तूं लाव ती
तीचा वास सदा जगीं पसरुनी देईल तो तुष्टिला.

तसेंच ‘चोर’ शब्दाच्या योजनेनें कवीचा त्वेष व स्वदेशप्रेम हीं दोन्हीहि एकाच कालीं व्यक्त होतात.

**दोन बाजी.**(पृ. १५४, चु. १०६) यांत पहिले बाजीराव आणि दुसरे बाजीराव या दोन पुरुषांच्या कृति आणि स्वभाव यांच्यांत असलेलें महदंतर तुलनात्मक दृष्टीनें फारच मजेदार रीतीनें दाखविलें आहे. हा फटका असून याच्यांतील भाषा एकाद्या कसलेल्या शाहीराला साजेल अशीच अर्थपूर्ण

आणि जोरदार आहे.या चुटक्यांवरून कवीला उत्तम पुरुषाबद्दल वाटत असणारा आदर व आवड, आणि नीच व्यक्तीबद्दलचा तिरस्कार व चीड हीं चांगलींच व्यक्त होतात.

## [ ५. ] विनोदात्मक.

'सुभाषित.'( पृ. ७२, चु. ५२)

'घृतधारा—खाणावळींतील.' ( पृ.९८, चु.७२ )

केशवसुतांमध्यें विनोद, थट्टा, मस्करी वगैरे मुळींच नव्हती.त्यांनां कोट्या करतांना, किंवा शब्दच्छल करून मौज उत्पन्न करतांना प्रस्तुत लेखकानें केव्हांच पाहिलें नाहीं.त्यांची वृत्ति सदा गंभीर असे. त्यांच्या चेहऱ्यावर कधींकाळीं दिसणारें हास्य सात्त्विक भावाचें असे. वरील चुटके केवळ एकेकाच श्लोकाचे आहेत. त्याअर्थी ते वाचकांनीं एकवार अवश्य पहावे.

## [ ६. ] पौराणिक.

'कचाप्रत देवयानी.' ( पृ. १६२, चु. ११२ )

'राजा शांतनु.' ( पृ. १६६, चु. ११३ )

' **कचाप्रत देवयानी** ' हें काव्य आर्यावृत्तांत असून फारच हृदयंगम झालें आहे. हें वाचीत असतांना आपण मोरोपंत कवीचीच आर्या वाचीत आहोंत कीं काय, असा भास होतो. अर्वाचीन कवीहि प्राचीन कवींप्रमाणेंच भाषेवर प्रभुत्व गाजविण्यास समर्थ आहेत, अशी हें काव्य वाचून आपली खात्री होते. यांतील कल्पना व शब्दरचना वाचकांचें मन आकर्षून घेऊन, देवयानीचीच केवळ नव्हे,तर प्रत्यक्ष करुणरसाचीच मूर्ति—वाचकांच्या अंतश्चक्षूंपुढें उभी करून अंतःकरणांत विलक्षण खळबळ उडवून देतात. मात्र या कवितेंतील चवदावी आर्या गालबोटादाखल आहे ती ही:—

घालून निराशेचें अंडें, आशा अहा ! उडुनि गेली;
झाडून पंख ज्यांवरि होतीं तीं ईप्सितें गिरविलेलीं !

ही आर्या इंग्रजी कल्पनेनें प्रेरित झाल्यासारखी दिसून ती कानाला व मनाला गोड लागत नाहीं. असो.

**राजा शांतनु.** (पृ. १६६, चु. ११३)—ही कविता अपूर्णच असल्यामुळें तिच्याविषयीं जास्त लिहितां येत नाहीं. तरी पण आहे तेवढीच देखील ती गोड आहे.

## [ ७. ] संवादात्मक.

‘ मुळा—मुठेच्या तीरावर.’ ( पृ. २७, चु. १७ )

‘ जास्वंदीचीं व पारिजातकांची फुलें.’ ( पृ. ३५, चु. २० )

‘ समृद्धि आणि प्रीति.’ (पृ. ४४, चु. ३० )

‘ फूलपांखरूं.’ ( पृ. ८७, चु. ६२ )

या सदरांतील कविता खरोखर पाहूं गेलें असतां ‘प्रेमविषयक’ किंवा ‘सृष्टिसौंदर्यात्मक’ या सदराखालींच पडल्या पाहिजेत; पण संवादरूपानें कविता लिहिण्याचा हा एक नवीनच प्रकार असल्यामुळें त्याचा आह्मीं एक निराळाच वर्ग केला आहे. हा प्रकारहि अर्वाचीन कवींत प्रथम केशवसुतांनींच प्रचारांत आणला असावा, असा आमचा तर्क आहे.

**मुळामुठेच्या तीरावर** (पृ. २७, चु. १७ )—हा चुटका करुणरसानें परिपूर्ण असून तो कोणाहि वाचकाच्या डोळ्यांतून टिपें गाळण्यास लावल्यावांचून रहाणार नाहीं. एका तरुणीचा वल्लभ तिला प्रसन्न करण्याकरितां मुळामुठेच्या कांठीं असलेलीं वनपुष्पें तोडण्याकरितां ह्मणून दरडीवर चढतो, पण एकाएकीं पाय घसरून मुळामुठेंतील एका डोहांत पडून प्राणास मुकतो. नंतर ती तरुणी त्या स्थलीं आली असतां दुसराच एक तरुण तिचें रूपयौवन पाहून तिला आपली रमणी होण्याविषयीं विनवितो. ती त्याला आपली सर्व प्रेमकहाणी सांगते, व ज्या दरडीवर तिचा प्रियकर चढला होता त्याच दरडीवर तीहि चढते, व तेथें उभें राहून—जातांजातां वाटेंत खुडलेलीं वन्य फुलें आपल्या प्रियकराच्या नांवानें त्या डोहांत सोडते, व मागोमाग आपल्या देहाचेंहि त्याच डोहांत विसर्जन करून आपल्या प्रियकराकडे जाते !

हा चुटका वाचून आमच्या वाचकांनां श्रीयुत भा. रा. तांबे यांच्या ‘निर्जनीं, घोर या वनीं’ या चुटक्याची आठवण झाल्यावांचून रहाणार नाहीं.

**जास्वंदीचीं व पारिजातकांचीं फुलें** (पृ. ३५, चु. २०) या लहानशा कवितेंत उच्च स्थिति कायमची नसते, हें तत्त्व कवीनें केवळ ध्वनीनें सुचविलें आहे. याचप्रमाणें मनुष्यमात्राला अखेरीस मातींतच मिळावें लागतें, हें त्रिकालाबाधित सत्य या कवितेच्या द्वारें कवि वाचकांच्या मनावर मोठ्या मार्मिकपणानें बिंबवीत आहे.

**समृद्धि आणि प्रीति** (पृ. ४४, चु. ३०) ही कविता कवीच्या जोमदार मनाची व करारी स्वभावाची पूर्णपणें साक्ष पटविणारी आहे. या कवितेंत कवीनें, सर्व कांहीं अनुकूल असून, एक प्रीति जर नसेल तर मनुष्याचें जिणें व्यर्थ होय, असें प्रतिपादिलें आहे. समृद्धींत जर प्रेम नसेल तर सुख नाहीं; पण तेंच जेथें प्रेम आहे तेथें समृद्धीवांचून मुळींच अडत नाहीं. 'कान्तेविणें व्यर्थ तें जिणें' हेंच कवि सांगतो, व तिच्यासह आपल्यास एकाद्या द्वीपांत नेऊन टाकलें—कीं जें द्वीप, कांटेकुटे, दऱ्याखोरीं, कडे वांकणें यांनीं युक्त असून ज्यांत भयाण अशीं अरण्यें माजलेलीं आहेत, व जेथें वन्य व हिंस्र पशूंच्या डुरकण्या व गर्जना ऐकूं येत आहेत—अशा ठिकाणीं राहूनहि:—

**कांटे झाडिन मी, पशू वधिन मी, किल्ला तिला बांधिन**
**मी तीतें सुख व्हावयास अपुले हे प्राणही टाकिन !**

आणखी

**बांधूं आह्मि परस्परांप्रत लताजालीं सुखानें गळीं;**
**स्वर्गाला निरयामधूनि पहिल्या काढूं अह्मी त्या स्थळीं !**

किती जोरदार व स्फूर्तिकारक उद्गार आहेत हे ! 'प्रियेच्या सान्निध्यानें पूर्वीच्या निरयाचा दुसरा स्वर्ग बनवून तेथें राहूं,' ही दर्पोक्ति कवीच्या मनाची तयारी किती उच्च दर्जाची होती, हें स्पष्टपणें प्रत्ययाला आणून देते, व हे कवि एकादें नवीन द्वीपकल्प शोधून काढून त्यांत वसाहत करूं पहाणारे कोणी अद्वितीय व साहसी असे प्रतिकोलंबसच आहेत कीं काय, असें वाटूं लागतें ! अस्तु.

**फुलपांखरूं** (पृ. ८७, चु. ६२) धाकटा भाऊ आपल्या वडील बहिणी-पाशीं फुलपांखरूं खेळायला रूधन देण्याबद्दल हट्ट धरितो, व ती त्या बागड-

णाऱ्या नाजुक फुलपांखराला धरल्यास त्याचा चोळामोळा होईल, ह्मणून त्याला धरण्याचा हट्ट सोडून दे, इत्यादि आपल्या भावास सांगत आहे, या प्रसंगाचें हें सुंदर चित्र आहे. या चुटक्याचा विशेष ह्मटला ह्मणजे एवढाच कीं, याची भाषा अत्यंत सोपी व मुलाच्याच तोंडांत शोभण्यासारखी आहे. इतकी सोपी भाषा लिहिण्यासहि भाषेवर बरेंच प्रभुत्व असावें लागतें; तें केशवसुतांच्या ठिकाणीं असल्याची साक्ष हें एकच गाणें पटवील.

## [ ८. ] नैतिक.

'फुलांतले गुण.' ( पृ. १०४, चु. ७४ )
'कांट्यावांचुनि गुलाब नाहीं.' (पृ.१८०,चु.१२२)
'फुलांची पखरण.' ( पृ. ७६, चु. ५६ )
'दिवा आणि तारा.' ( पृ.९०,चु. ६४ )
'पुष्पाप्रत.' ( पृ. ५७, चु. ४० )

**फुलांतले गुण** (पृ. १०४,चु.७४) या चुटक्यांत कवीला सुन्दरता, प्रीति, मार्दव, सद्गुण आणि गाणें हे गुण फुलांत दिसून येतात; व यांपैकीं आपणांत किती आहेत याची छाननी करण्याला तो प्रवृत्त होतो.

**कांट्यांवांचुनि गुलाब नाहीं** ( पृ. १८०, चु. १२२ ) या कवितेंत कवि जें तत्व शिकवीत आहे तें हें:—

**अविकृत ऐसें नसेचि कांहीं विकृतिरूप संसार !**

**फुलांची पखरण** ( पृ. ७६, चु. ५६ ) या चुटक्यांत, आलेली संधी वायां जाऊं देऊं नये, हें तत्त्व कवीनें गोविलें आहे. कवि ह्मणतो:—

**" सकाळ जाईल संपून, मग तापेल तें ऊन;**
**मग धंदे कराल, पण, फुलें हीं विसराल; सुख कैसें पावाल ?**

× × ×

**ह्मणुनि, असे जों बहर तोंवरी टिप् फुल टिप् !**

जें ज्या वेळेस करावयास व मिळवावयास पाहिजे तें त्याच वेळीं करा व मिळवा, अशी याची शिकवण आहे.

**दिवा आणि तारा** ( पृ. ९०, चु. ६४ ) यांत दिवा आणि तारा यांचा संवाद फारच गोड भाषेंत दिला आहे. दिवा आपली प्रौढी मिरवितो; त्याला तारा इतकेंच उत्तर देतो, कीं, 'भांडीं, मडकीं,डबे यांनां तूं उजेडांत आणीत असशील, पणः—

**" आत्मे उज्ज्वल आंतले पण गड्या ! होतात माझे करें !"**
ही कल्पना वाचून कवीच्या विशाल दृष्टीबद्दल आणि अचाट कल्पनाशक्तीबद्दल कोणास अचंबा वाटणार नाहीं ? पण हें ज्याचें त्यालाच.आतां कोणी एकादा जर केवळ आपल्या जन्मदात्या पित्याचें नांव **केशव** आहे, एवढ्यावरूनच जर स्वतःस' केशवसुत ' ह्मणवून कविता खरडूं लागला, तर सिंहाचे कातडें पांघरणाऱ्या × ×प्रमाणें त्याचें जगांत हंसें मात्र होईल. ही गोष्ट प्रतिभासंपन्न कवीशीं स्पर्धा करूं इच्छिणाऱ्या कवित्रुवांनीं लक्ष्यांत ठेवून, वरील ताऱ्याची उक्ती आपल्या डोळ्यांपुढून हालूं देऊं नये,इतकीच आमची त्यांस प्रेमाची इशारत! आहे कविश्रेष्ठ केशवसुत यांच्या या उंच भरारी-बरोबर उड्डाण करण्यास कोणता आधुनिक कवि आपले पंख फडफडून थेट हें पवित्र तारामंडळ गांठील ?

**पुष्पाप्रत**. ( पृ. ५७, चु. ४० ) या लहानशा चुटक्यांत पुष्पाकडून जे धडे कवीनें शिकविले आहेत ते फारच उत्कृष्ट व बहारीचे आहेतः—

जगांत दुष्ट दर्प जे भरूनि फार राहिले
तयांस मार, टाकुनी सुवासजाल आपुलें.

× × ×

' तुझ्याकडे पहावयास लागतील लोक ते,
प्रीतिचें तयांस सांग तत्त्व फार रम्य तें.'

× × ×

जगास सांग अल्प मी असूनिही, परांचिया
जागतों हिता स्वहृद्यदानही करूनियां.

× × ×

या गीताच्या शेवटल्या दोन ओळींत कवींची नेमणूक कोणच्या कामगिरीवर झाली आहे हें केशवसुत फारच मार्मिकपणें सांगत आहेत, व तेंहि अगदीं मोजक्या आणि वेंचक शब्दांत:—

**अह्मां भ्रमिष्ठ बालकांस काव्य देवतेचिया**
**जीव निर्जिवांतलाहि नेमिलें पहावया.**

केवढ्या मोठ्या कामगिरीवर कवींची नेमणूक ही? मोठे कवि थोड्या शब्दांत पुष्कळसा अर्थ कसा खच्चून भरीत असतात, याचें हें एक उत्कृष्ट उदाहरण आहे. यांतील कल्पना किती गोड आणि सुंदर आहे! त्याचप्रमाणें कवीची दृष्टी या ठिकाणीं एकदम कशी अंतर्मुख होत आहे हें पाहून आनंदभरानें कोण आपली मान तुकवीत राहणार नाहीं?

## [ ९. ] भूतदयात्मक सहानुभूतिपूरक व क्षुल्लक विषयांवरून गंभीर विचार सुचविणारे चुटके.

'मजूरावर आलेली उपासमाराची पाळी' (पृ. ३९, चु. २५)
'अंत्यजांच्या मुलांचा पहिला प्रश्न' (पृ. ४९, चु. ३४)
'मुलांस झोडपणाऱ्या पंतोजीस' (पृ. ४२, चु. २८)
'आई! आई!' (पृ. ५१, चु. ३६)
'दंवाचे थेंब' (पृ. १७३, चु. ११८)
'निजलेल्या मुलीस पाहून' (पृ. ५५, चु. ३९)
'रांगोळी घालतांना पाहून' (पृ. १७०, चु. ११५)

**मजूरावर आलेली** (पृ. ३९, चु. २५) या कवितेंत मजुरावर उपासमाराची पाळी आल्यामुळें तो श्रीमंतांत व गरीबांत असलेल्या भयंकर विषमतेचा विचार करून अत्यंत हताश होतो. श्रीमंतांची सर्व चैन गरीबांच्याच जीवावर चालली असून गरीबांच्याच नशिबीं असे कष्ट कां? असा प्रश्न त्याच्या मनांत उद्भवतो. सायंकाळीं पक्षी देखील आपल्या पिलांकरितां चोचींतून अन्न घेऊन जातात; पण दिवसभर काम न मिळाल्यामुळें आपल्या

लाडकील आणि लाडक्यांनां तोंड कसें दाखवूं या विचारानें मजूर कावला जाऊन त्याला मृत्यूची याचना करावी लागते ! या विषम स्थितीबद्दल कोण जबाबदार आहे ? या कवितेवरून, मजुरवर्गाकडे कवीचें 'लोण्याहूनि मऊ' असें मृदुल हृदय ओढलें जाऊन तो त्याकडे किती सदय दृष्टीनें पहात होता, हें वाचकांच्या तेव्हांच ध्यानांत येईल.

**अंत्यजांच्या मुलांचा पहिला प्रश्न**–( पृ.४१, चु.३४) या कवितेवरून अस्पृश्य जातीबद्दल कवीला किती सहानुभूति वाटत होती हें सहज कळून येतें.

**मुलांस झोडपणाऱ्या पंतोजीस**– ( पृ. ४२, चु. २८. ) यांत केशवसुतांनीं मारक्या पंतोजीचा खूपच खरपूस समाचार घेतला आहे. शेवटीं गुरूंची शिकविण्याची पद्धत कशी असावी तें दोन ओळींतच कवि सांगत आहेत:—

> **" केव्हां धाकहि, पारितोषिक कधीं गोडीगुलाबी कधीं,**
> **शिक्षा योग्य कधीं करूनि गुरु ते नांवास येती सुधी. "**

केशवसुत हे स्वतःहि शिक्षकच होते, तेव्हां त्यांची शिक्षण देण्याची पद्धति कशी असेल याची अटकळ केशवसुतांच्या या उद्गारांवरून सहज करितां येते. मारकट गुरुजींनां ही एक नामी इशारतच आहे !

**आई! आई!** ( पृ. ५१, चु. ३६ ) आणि **दंवाचे थेंब** (पृ. १७३, चु. ११८ )–या दोन्ही चुटक्यांतील प्रसंग हृदयास अगदीं हलवून टाकणारे असून, ते वाचीत असतां मनांत एकच खळबळ उडून तें कळवळून जातें. दंवांचे थेंब पुनः सूर्य आपल्या किरणांनीं आकाशांत ( गगनांत ) घेऊन जाईल, हें मुलांनां समजावून सांगतांना आईला तिच्या मृत बालकांचें ( गत बाळांचें ) स्मरण होतें व तिच्या डोळ्यांत आसवें उभीं राहतात ! आणि मग ती पुढें असलेल्या आपल्या बालकास पाहून ह्मणते:—

> **" देवा रे!"–मग ती स्फुंदे—**
> **" एवढा तरी लाभू दे."**

असें म्हणून ती आपल्या तान्हुल्याला आपल्या हृदयाशीं दृढ कवटाळून धरते ! हा देखावा पाहून कवीहि उद्गारतो:—

> "होते हिमबिंदु सकाळीं
> कोठें ते सायंकाळीं?"

असे उद्गारून कवि वाचकांनां त्यांच्या अंगणांतील वृक्षलतेपुढून एकदम उचलून थेट अस्तगिरीवर नेऊन सोडतो !

दा. क्र. ९८२८

**निजलेल्या मुलीस पाहून** ( पृ.५५, चु. ३९) यांत कवीला सुचलेले विचार फारच उदात्त, गंभीर आणि पवित्र आहेत. 'साधेपणा, नम्रता, मधुरता, शांति हे सर्व बाळपणींचे गुण यौवनांतहि असेच टिकतील काय? गालांवर दिसणारें गोड अजाणतेपण पुढें देखील असेंच कायम टिकेल, का त्या ठिकाणीं जाणतेंपण आपला कठोर नांगर ओढील? तूं मोठी झाल्यावर आतां दिसत असलेल्या सर्व सद्वृत्ति तुझ्या चेहऱ्यावर तशाच दिसतील, का त्यांत कांहीं पालट होईल?' असे अनेक विचार कवीच्या मनांत उद्भवून शेवटीं कवि त्या मुलीला आशीर्वाद देत आहे:—

> "हे माझे भगिनी ! दिनानुदिन गे दुःखें अशा घेरिती,
> त्यांतें हाणुनियां सुखें तुज सदा भेटोत तीं राखिती !"

**रांगोळी घालतांना पाहून** ( पृ. १७०, चु. ११५) ही कविता नितांत रमणीय असून वाचकांनीं ती अवश्य वाचावी. अतिपरिचयामुळें मनुष्याला क्षुद्र वाटणाऱ्या गोष्टीहि कशा काव्यमय असतात, व त्यापासून केवढे मोठे धडे घेतां येतात यांचें दिग्दर्शन या कवितेच्या द्वारें केशवसुतांनीं फारच बहारीचें केलें आहे ! अतिपरिचयामुळें सहज दिसून न येणारी—पण नीरस जीवितांतहि निश्चितपणें दडून बसणारी, अशी मौज प्रत्येक वस्तुमात्राचे ठिकाणीं कसकशी भरली आहे हें पहाण्याकरितां डोळे नेहेमीं उघडे ठेवा, ह्मणून केशवसुत सांगत आहेत:—

> साध्याही विषयांत आशय कधीं मोठा किती आढळे !
> नित्याच्या अवलोकनें जन परी होती पहा आंधळे !

**रांगोळी बघुनी इतःपर तरी होणें तयीं शाहणे !**
**कोठें स्वर्गसमक्षता प्रगटते हें नेहमीं पाहणें !"**

## [ १०. ] सृष्टिसौंदर्यात्मक.

'उगवत असलेल्या सूर्यास '–( पृ. २, चु. २)
'सृष्टि आणि कवि '–( पृ. ६, चु. ६ )
'अढळ सौंदर्य '–( पृ. ९, चु. ९ )
'एक खेडें '–( पृ. १३, चु. १३ )
'भृंग'–( पृ. ५८, चु. ४१ )
'पुष्पाप्रत '–( पृ. ८५, चु. १६ )
'कविता आणि प्रीति '–( पृ. ६२, चु. ४३ )
'पर्जन्याप्रत '–( पृ. ८०, चु. ५८ )
'संध्याकाळ '–( पृ. ९५, चु. ६९ )
'वातचक्र '–( पृ. १३१, चु. ९४)
'फुल पांखरू '-( पृ. १४८, चु. १०१ )

**उगवत असलेल्या सूर्यास** ( पृ. २ चु. २ ) यांत प्रभातकालीं दिसणाऱ्या सृष्टिसतीचें मनोहर वर्णन करून कवि त्यांतच कसा विलीन होत आहे तें पहा:—

**अनुकरण करीं मी गाउनी या खगांचें,**
**तदिव सुमनतांचें वंदुनी या लतांचें;**
**अनुसरत असें मी हांसुनी पद्मिनींस,**
**शरण तुजसि आलों मी असा नम्र दास !**

यांत सृष्टीशीं कवि कितीतरी तल्लीन आणि एकरूप झाल्याचें दिसत आहे ! पण सृष्टिदेवीचा आवडता पुत्र तिच्या स्वरूपीं असा एकजीव होऊन गेल्यास त्यांत नवल तरी कसचें ? असें न होईल तरच नवल !

**सृष्टि आणि कवि** ( पृ. ६, चु.६) यांत कवींत आणि सृष्टींत किती अंतर आहे तें दाखविलें असून, सृष्टीचें कवीपेक्षां श्रेष्ठत्व प्रतिपादिलें आहे.

सृष्टीचें मधुर गाणें कोणीकडे आणि कविपामराचें कोणीकडे ? तिचीं पक्षि-मुखांतलीं श्रवणसुभग कवनें कोणीकडे आणि कवीचीं कर्णकटु नीरस कवनें कोणीकडे ? सृष्टीचें वृष्टिरूपी खळखळ रडणें कोणीकडे ? आणि कवीचे कवितारूपी अश्रु कोणीकडे ! सृष्टीचे मृदुमरुच्छ्वास कोणीकडे आणि कविदुहिता कवितेचे क्षुद्रश्वास कोणीकडे ! उघडच आहे. ज्या सृष्टीच्या अवलोकनानें कवीला कविता सुचणार, त्या सृष्टीची बरोबरी कवितेला कशी करितां येणार ?

**अढळ सौन्दर्य** (पृ. ९, चु. ९) इतर सौन्दर्य अक्षय आनंद देणारें नाहीं. अक्षय आनंद पाहिजे असेल तर एका सृष्टिसौंदर्याकडेच वळलें पाहिजे:—

" ह्मणुनि कथितों निःशंक मी तुम्हांतेः—
असे सुंदरता अढळ जरी कोठें
तर करी ती सृष्टींत मात्र वास—
पहा मोहिल सर्वदा ती तुम्हांस. "

**एक खेडें** (पृ. १३, चु. १३) हें चित्रहि फारच रम्य आहे. कल्पना उदात्त असूनहि त्या साध्या भोळ्या मराठी भाषेंत किती उत्तम तऱ्हेनें गोंवितां येतात, याचा ही कविता एक उत्तम मासला आहे. ही कविता वाचून श्रीयुत भा. रा. तांबे यांच्या ' गुराख्याचें गाणें ' या कवितेची आठवण होते.

**भृंग** ( पृ. ५८, चु. ४१ ) ही कविता फारच बहारदार आहे. यांत सृष्टिवर्णनाची कमाल झाली आहे. या वर्णनांत सृष्टि अचेतन अथवा जड अशी भासत नाहीं. तिच्यांत जीवनाचा ~~संचार~~ होऊन ती मानवी हृदयाला आनंद देऊन कवीला स्फूर्ति देते. यांत कवीनें आपल्या मधील आणि भृंगामधील अन्तर दाखविलें आहे.

' भृंगा ! आणि तुझें गान
सृष्टीचें गमतें कवन !

गा तूं गा ? नादी भ्रमरा !
मी गणमात्रा जुळणारा !

× × ×

' कवि ' आम्हांलागुनि म्हणणें
कविशब्दार्था लोळविणें !
असद्गान नव्हे ' गान '
तें गाना चिन्ध्यादान !

शेवटीं भृंगाच्या त्या नैसर्गिक कवित्वपूर्ण क्रीडा अवलोकन करून कवि ह्मणतोः—

' होईल का रसिकता तव लब्ध मातें ?
गुंगी मिळेल मजला तव केधवां ते ?
येतें मनांत तुझियासम भृंग व्हावें,
वेलीं मधूनि कलिकांवरुनी झुकावें ! '

पुष्पाप्रत–( पृ. ८५, चु. ६१ ) ज्या पुष्पाला कवीनें एकदा आह्मांला नैतिक धडे शिकवावयास लाविलें, त्याच पुष्पाला पाहून कालान्तरानें त्याच कवीची कांय अवस्था झाली पहा ! त्या पुष्पाला पाहून कवीस आपला बाळपणचा काल आठवतो;पण तो सुखाचा काल निघून गेल्यामुळें कवीच्या मनाला आज उदासीनता येते, व खेद वाटतो ! फुलांचें तेंच हास्य अजूनहि आहे; परंतु हाय ! कवीच्या भाळीं 'अश्रूंचा ढग डवरला आहे ! 'कवीला पुष्पाच्या दिव्यपणाला पाहून स्पर्श करण्याचें भय वाटतें व पुष्पांत व कवींत केवढा उंच दरा आहे याची जाणीव होते.

"काळोखाच्या जगामधें या
मृत आशांच्या चितांवरुनि या
पिशाच माझें भटकत आहे–
शांति नसेचि तया !
मच्चित्ताच्या क्षितिजावरती
नृत्याला जीं स्वप्नें करिती

**निदान, त्यांच्यामध्यें मजला**
**भासो तव मूर्ति !**

असें ह्मणून कवि स्वतःला पुष्पाचें गाणें गाण्याला अपात्र ठरवून तें काम भृंगाकडे सोंपवून देतो !

**कविता आणि प्रीति, पर्जन्याप्रत,** आणि **संध्याकाळ** या चुटक्यांत बाह्य सृष्टीचें वर्णन मोठ्या खुबीनें केल्याचें आढळून येतें.

**वातचक्र** ( पृ. १३१, चु. ९४) यांत वातचक्राचें तर वर्णन आहेच, पण त्याबरोबरच सृष्टीच्या भोंवऱ्याचेंहि वर्णन मोठें सरस आहे. यांत कवि वाग्देवतेला शब्दांनां या भोंवऱ्याच्या मार्गानें निजधामाला नेण्यास विनवीत आहे. कारण जगांतील शब्दांत आतां राम राहिला नाहीं, आणि ह्मणूनच ते शब्द आतां कोणाला मारीत नाहींत अथवा तारीत नाहींत. त्यांनां मनुष्यानें मळविलें आहे. त्यांचें पुनर्जीवन होण्यास त्यांनां वर–दिव्यलोकांतच–गेलें पाहिजे. असें सांगून शेवटीं स्वतःबद्दलहि कवि ह्मणतो—

**‘ मीहि कशाला येथ रहावें ?**
**काय असे ज्या मीं चिकटावें ?**
**वाटे गिरक्या घेत मिळावें—**
**या पवनाच्या चक्रीं,–**
**होउनि लीन सच्चिदानंदांत;**
**जगद्रुमाचें पिकलें पर्ण,**
**गलित असें मी अगदीं जीर्ण;**
**तर भर भर भर उडूं द्या मला**
**शब्दासंगें स्वर्गांत !**

या कवितेच्या चालीची आणि तशीच त्यांतील शब्दांचीहि कवीनें अशी योजना केली आहे, कीं, ही कविता वाचीत असतांना वातचक्राचा नाद आपल्या कानांत एकसारखा मूर्त घुमूं लागतो, व आपणहि त्याबरोबर

गिरक्या खात वर आकाशांत जात आहों कीं काय, असा क्षणैक भास होतो. कवीच्या वाग्देवीचें केवढें अचाट सामर्थ्य हें !

फुलपांखरूं ( पृ. १४८, चु. १०१) या कवितेंत केशवसुतांनीं आरंभींच फुलपांखराची व कविकल्पनेची फारच हृदयंगम तऱ्हेनें तुलना केली आहे. नंतर वनश्रीमधून फुलपांखराचें निर्वंधपणें चालत असणारें बागडणें पाहून, स्वतःच्या नेहमीं विवंचनेमध्येंच कंठाव्या लागणाऱ्या जिण्याचा त्याला कसा विषाद वाटतो, याचें कवीनें मोठें रमणीय चित्र काढलें आहे. आणि यापुढें फुलपांखराच्या जीवनक्रमावरून काढलेलें सत्य तर फारच आश्चर्यकारक आहे. तें असें:—

> ' सर्व विनाशी असती प्राणी, '
> ही मज खोटी वाटे वाणी;
> फुलपांखरूं–मरण पाहिलें–आहे का कोणीं?

हें सांगून शेवटीं कवि आपलें गुपित सांगतो:—

> ' जें रम्य तें बघुनियां मज वेड लागे,
> गाणें मनांत मग होय सवेंचि जागें;
> गातों म्हणून कवनीं फुलपांखरातें,
> व्हायास सौख्य मम खिन्न अशा मनातें.'

वरील सृष्टिसौंदर्यात्मक कवितांच्या विवेचनावरून वाचकांच्या ध्यानांत येईल, कीं, केशवसुतांचें सृष्टिप्रेम ह्मणजे जड वस्तूमुळें उत्पन्न झालेली क्षणैक वृत्ति नसून मानवी जीविताशीं संबद्ध असलेल्या निष्काम प्रेमाचाच हा एक प्रकार आहे. मानवी प्राण्याच्या आयुष्यांतील प्रसंग वर्णन करतांना, सृष्टीचा केवळ पार्श्व–भूमिकेप्रमाणें उपयोग करून घेऊन, ते ते प्रसंग त्यांनीं फारच सुंदर रीतीनें चितारिले आहेत. सृष्टींतील रमणीयतेचें त्यांनीं आपणाला वेड लावून घेतलें आहे. जड सृष्टीचा व जीवंत सृष्टीचा त्यांनीं संयोगच जुळवून आणल्यामुळें त्यांच्या काव्याला साहजिकपणेंच विशेष रमणीयता व हृदयंगमता आली आहे, यांत शंका नाहीं. केशवसुतांच्या

निधनाचें वृत्त ऐकून कविवर्य टिळक उद्गारले:—"माझ्या मतें आपल्यांतला आज वर्डस्वर्थ गेला !" हें त्यांचें ह्मणणें किती सार्थ होतें, हें कोणाला सांगावयास पाहिजे काय ?

## [ ११. ] किरकोळ.

या वर्गांत येणाऱ्या कविता खालीलप्रमाणें आहेत:—

'सृष्टि, तत्व आणि दिव्यदृष्टि.' (पृ.६४,चु.४५)
'स्वर्ग, पृथ्वी आणि मनुष्य.' (पृ.६५, चु.४६)
'सिंहावलोकन.' ( पृ. ६६, चु. ४७ )
' आहे जीवित काय ?' ( पृ. ६७, चु. ७१)
' दिवस आणि रात्र. ' (पृ. १५५, चु. १०७)
'तहान आणि भूक आरंभीं नव्हती.'(पृ. १२३, चु. ९)
' पद्यपंक्ति.' ( पृ. १२२, चु. ८८)
' स्फुट. ' इ०
' दिवाळी. ' ( पृ. १३८, चु. ९७)
'तुझें नाम मुखीं.' ( पृ. १८६, चु. १२६ )

**सृष्टि, तत्त्व आणि दिव्यदृष्टि** ( पृ. ६४, चु. ४५ ) या कवितेंत चराचर अखिल वस्तूंत अनन्तस्वरूप कसें भरून राहिलें आहे, हें दाखविलें आहे. सृष्टीच्या अवलोकनानें कवीला तिच्यांतील तत्त्वाची ओळख पटून, त्याला अलौकिक दिव्य दृष्टि प्राप्त होऊन, सृष्टीचें गूढ उकलण्याला तो कसा समर्थ होतो,हें फारच मनोवेधक रीतीनें सिद्ध करून दाखविलें आहे.

**स्वर्ग, पृथ्वी आणि मनुष्य** ( पृ.६५, चु.४६ ) या चुटक्यांत, आरंभीं स्वर्ग आणि पृथ्वी हीं संलग्नच होतीं—ह्मणजे स्वर्गीय आनंद या पृथ्वींतच नांदत होता, असें कवीनें ध्वनित केलें आहे.मनुष्यानें आपल्या दुष्कृत्यांनीं पृथ्वीला लाथ मारल्यामुळें स्वर्गाला मानवाची ती कृतघ्नता न आवडून तो आकाशांत उंच उडून गेला ! ही स्थिति पाहून कवि काकुळतीला येऊन ह्मणतो:—

तेव्हांपासूनि ही धरा झुरतसे ! माते ! चुकी जाहली !
स्वर्गा ! तूंहि अह्मां क्षमस्व सदया ! ये खालता भूतलीं;–
ये बा ! आणिक या धरेस अगदीं देऊं नको अन्तर !–
आहे तूजवरी तसेंच बसलें स्वर्गा ! तिचें अन्तर.

यांतील कल्पनेची भरारी किती अपूर्व आणि मनोहर आहे, तें वाचकांनींच पहावें !

**सिंहावलोकन** (पृ.६६,चु.४७). गत आयुष्यांत घडलेल्या प्रमादांचें निरीक्षण करून गद्गद रवानें पश्चात्ताप पावलेला कवि ह्मणतोः—

चुकी भरुनि काढणें फिरुनि, हें घडेना कधीं
विनिष्ठुर असें भरें प्रकट तत्त्व चित्तामधीं !–
ह्मणूनि अनिवार हें नयनवारि जें वाहतें,
असे अहह ! शक्त का कवणही टिपायास तें ?"

वाचकवर्गापैकीं किती जणांनीं ही उद्वेगजनक मानसस्थिति अनुभविली नसेल ?

**आहे जीवित काय ?** (पृ. ९७, चु. ७१) हा प्रश्न करून कवि त्यास उत्तर देतोः—

'नाहीं स्वप्न–न भास–वा बुडबुडा जीवित्व साचें असे !'

ही कविता वाचतांना लॉंगफेलोच्या—

"Life is not but an empty dream,
life is earnest, life is real"

या कवितेची आठवण झाल्यावांचून रहात नाहीं.

'**तहान आणि भूक आरंभीं नव्हती.** (पृ. १२३, चु. ८९) या चुटक्यांत "स्वर्ग, पृथ्वी आणि मनुष्य" (पृ. ६५, चु.४६ ) या कवितेंतील कल्पनांची पुनरुक्ति झालीसें दिसतें. उदाहरणार्थ, ८९ व्या चुटक्यांतीलः—

"**स्वर्ग आणि पृथ्वी जुळूनियां होतीं**" ही कल्पना ४६ व्या चुटक्यांतीलः—

"आरंभीं क्षितिपासुनी होती स्वर्ग न फार दूर." या कल्पनेशीं ताडून पहाण्याजोगी आहे.

**'दिवस आणि रात्र.'** ( पृ. १५५, चु. १०७ ) या कवितेंत दिवस आणि रात्र यांचा फारच मनोहर संवाद असून रात्रीनें आपलें श्रेष्ठत्व मोठ्या बहारीनें स्थापित केलें आहे. ती कविता फारच गोड आहे. वाचकांनीं मुळांतूनच ही अवश्य वाचून पहावी.

**पद्यपंक्ति** (पृ. १२२, चु. ८८). या 'पद्यपंक्तीं'तील खालील ओळी किती अर्थपूर्ण व काव्यानें डबडबलेल्या आहेत !

> " अमुचा पेला दुःखाचा डोळे मिटुनी प्यायाचा;
> पितां बुडाशीं गाळ दिसे, त्या अनुभव हें नांव असे !
> फेंकुनि द्या तो जगावरी अमृत होउ तो कुणातरी !

यांत कवि आपल्या अनुभवानें लोक शहाणे करा, ह्मणून किती आस्थेनें आणि कळकळीनें सांगत आहे? व तेंहि विलक्षण कविताशैलीनें ! एकाच्या दुःखाच्या पेल्यांतला बुडाशीं बसणारा **गाळ** दुसऱ्याला **अमृत** व्हावा, ही केवढी अजब शक्ती !

**स्फुट** (पृ. ७७, चु. ५७ ), **विद्याप्रशस्ति** ( पृ. १२४, चु. ९० ), **स्फुटविचार** ( पृ. १७२, चु. ११७, ) या कविताहि वाचनीय आहेत.

**दिवाळी** ( १३८, चु. ९७ ) या कवितेंतील अगदीं शेवटल्या दोन ओळी दिवाळीच्या उत्सवाच्या दिवसांत देखील आमच्या कवीची मनःस्थिति कशी असे याचें दिग्दर्शन करतातः—

> " मी संध्यासमयीं खुशाल गिरणातीरावरी बैसुनी
> कालक्षेप करीन उन्मन असा वेड्यापरी गाउनी ! "

**तुझें नाम मुखीं** ( पृ. १८६, चु. १२६ ) हा या संग्रहांतील शेवटचा चुटका केशवसुतांचा नसावा असें आह्मांला वाटतें. पण असें कां वाटतें हें मात्र आह्माला सांगतां येत नाहीं.

## [१२.] कवि आणि कविता यासंबंधीं.

'कविता आणि कवि.' ( पृ. ६, चु. ७ )
'दिव्य ठिणगी.' (पृ. ६८, चु. ४९ )
'कवितेचें प्रयोजन.' ( पृ. ५२, चु. ३७ )
'कल्पकता.' ( पृ. ७२, चु. ५३ )
'कवि.' ( पृ. ७५, चु. ५५ )
'क्षणांत नाहींसे होणारे दिव्य भास.' ( पृ. ९६, चु. ७० )
'शब्दांनो ! मागुते या.' ( पृ. ८९, चु. ६३ )
'धूमकेतु आणि महाकवि.' ( पृ. १११, चु. ७८ )
'काव्य कोणाचें ?' ( पृ. ११७, चु. ८३ )
'आह्मी कोण ?' ( पृ. १४४, चु. ९९ )
'चिन्हीकरण अर्थात् भाव आणि मूर्ति यांचें लग्न.' (पृ. १५७, चु. १०८)
'दूर कोठें एकला जाउनियां.' (पृ. १५८, चु. १०९)
'फिर्याद.' ( पृ. १६०, चु. ११० )
'प्रतिभा.' ( पृ. १७२, चु. ११६ )

**'कविता आणि कवि'**(पृ. ६, चु. ७)हा चुटका केशवसुतांच्या कवितेच्या साध्याभोळ्या शुद्ध मराठीचा आदर्शभूत आहे. 'कविता अशी असावी आणि तशी असावी,'असें सांगणारे दुढ्ढाचार्य तुह्मी कोण ? ह्मणून कवि मोठ्या दर्पानें प्रश्न करीत आहेत. तो किती बहारीनें करीत आहेत तें पहा:—

' अशी असावी कविता, फिरून
तशी नसावी कविता, ह्मणून
सांगावया कोण तुम्ही कवीला
अहांत मोठे ?–पुसतों तुह्मांला.

आपल्या लाडकीशीं अशाअशा तऱ्हेनें लाडीगोडी लावून तिचें रंजन कर, हें सांगणें जितकें अप्रयोजक आणि मूर्खपणाचें, तितकेंच कवीला अशी-

अशी कविता लिही, ह्मणून सांगणें अप्रयोजक आहे. लोकांच्या रुचीप्रमाणें काव्य करणें, ह्मणजे तें केवळ सूत्रधारानें नटवून आणलेल्या नटीच्या रंगभूमी-वरील नाचासारखें आहे! तुह्मांला जर खरी कविता पाहिजे असेल तरः—

'कवीस सोडा कवितेबरोबरी,—
न जाच वाटेस तयाचिया तरी.'
तयाचिया हो खिडकीचिया, उगे
खालीं, तुह्मी जाउनि हो रहा उभे;-
तिच्या तयाच्या मग गोड लीला
ऐकूनि पावाल तुम्हीं मुदाला.

'कवितेचें प्रयोजन' ( पृ.५२, चु.३७ ) या कवितेंत कवीनें कवितेची आवश्यकता फारच जोरदार रीतीनें मांडली आहेः—

" गाणें जें परिसावया कविपुढें राजेशही वांकले
यन्नादेंच लहान थोर सगळे गुंगून वेडावले
त्याला मान नसे, नसो; पण, अतां त्याची अपेक्षा नसे
हें कोणी ह्मणतां विषाद अहिसा मन्मानसाला डसे !"

असें सांगून याच्याच पुढील श्लोकांत कवि छातीला हात लावून आपल्या देशबंधूंनां काय बजावीत आहेत तें पहाः—

" आलेल्या दुरवास्थितींतुनि तुम्ही उत्तीर्ण व्हाया जरी
उद्योगीं रत व्हावया धरितसां औत्सुक्य चित्तीं, तरी

* * *

गाण्यानें कविच्या प्रभाव तुमचा वर्धिष्णुता घेइल,
स्फूर्तीचा तुमच्या पिढ्यांस पुढल्या साक्षी कवी होइल !"

इतकेंच नव्हे तर—

" आशा, प्रेम, तसेंच वीर्य कवनीं तो आपुल्या गाइल,

* * *

गेलें वैभव गाउनी स्फुरण तो युष्मन्मना देइल."

किती स्फूर्तिजनक उद्गार हे ! तसेंच—

**द्या उत्तेजन हो कवीस, न करा गाणें तयाचें मुकें !**

या वर दिलेल्या गोष्टी तुह्मांला पटत नसतील तर कवितेनें एवढें तरी होईल कीं नाहीं, कीं:—

**गाण्यानें श्रम वाटतात हलके, हेंही नसे थोडकें !**

कवीच्या कवितेनें एवढें कार्य झालें तरी बस्स नाहीं काय ?

‘ **कवि,** ’ ‘**आम्ही कोण,**’ आणि ‘**प्रतिभा**’ हे तीनहि चुटके वाचकांनीं मूळांतून अवश्य साग्र वाचावे, अशी आमची त्यांनां आग्रहाची शिफारस आहे. यांतील प्रत्येक ओळ कवीच्या अलौकिक सामर्थ्याची द्योतक आहे. यांत कवीचा अधिकार, शक्ति, दर्जा व सामर्थ्य यांचें फारच जोरदार आणि हृदयंगम असें वर्णन केलें आहे. हे चुटके वाचल्यावर कवीच्या अफाट व दांडग्या सत्तेची आपणांला कल्पना येऊन आपलें मन गोंधळून जातें.

केशवसुतांनां आपल्या सामर्थ्याची पूर्ण आत्म-प्रतीति झाली होती, ह्मणूनच असे सत्ताधीशाला साजेसे, अधिकारयुक्त व प्रचंड गर्जनेनें दुमदुमणारे व सर्वांस थक्क करून टाकणारे उद्गार त्यांच्या मुखांतून सहज लीलेनें बाहेर पडले आहेत !

‘**धूमकेतु आणि महाकवि**’ (पृ. १११, चु. ७८) या उभयतांत कवीनें जें साम्य दाखविलें आहे तें पांचपन्नास वर्षांनीं आकाशांत उगवणारा एकादा धूमकेतु व दोनचार शतकांत पृथ्वीवर उत्पन्न होणारा एकादा महाकवि यांच्यामध्यें दिसून येणाऱ्या साम्याच्या विचारानें वाचकांनां अगदीं तंतोतंत पटेल ! ते कोणच्या तत्त्वाचे बनले आहेत ह्मणून विचाराल तरः—

**‘जड धातूचे तुह्मी न दिसतां—तेजस्तत्त्वाचे !**
**कोठुनि अथवा ब्रह्माण्डीं हो स्वेच्छगमन तुमचें ?**
**कधींमधिं तुम्ही विचित्र पुतळे उगवतसां थाटें !**
**वदा तर तुम्ही कोठुनि चुकलां इकडे हो वाटे ?”**

‘**काव्य कोणाचें**’ ( पृ. ११७ चु. ८३ ) या सरस कवितेंत कवि हा काव्याचा खरा कर्ता नसून त्याचा उगम शारदेच्या हृदयप्रांतांतूनच होत

आहे, व कवि हा केवळ तिचा दास आणि लेखक होय, ही गोष्ट कवीनें फारच चातुर्यानें मांडली आहे:––

*  *  *

काव्य लिहिलें मीं खरें, परी मातें
शारदेनें जो मंत्र दिला कानीं,
तसें लिहिलें मीं;–काव्य तिचें मानी !
दिव्य शक्तीनें स्फुरे गंध पुष्पीं,
रंग खुलतीही तिचे इंद्रचापीं;
सृष्टिमाजी जें रम्य असे कांहीं
तीच कारण त्या शक्ति असे पाहीं !

'क्षणांत नाहींसे होणारे दिव्य भास' (पृ. ९६, चु. ७०) यांत, कवीला, संपूर्ण रमणीयतेचें जें चित्र त्याच्या मनश्चक्षूंनां दिसतें तें मूर्त शब्दांत आणण्याचा तो कितीहि आटोकाट प्रयत्न करीत असला तरी तें चांगल्या प्रकारें शब्दांत कसें उतरवितां येत नाहीं, हें कवि सांगत आहे. तीं अलौकिक स्वप्नें, त्या दिव्य कृति, व ते दिव्य आलाप जर कवीला आपल्या काव्यविरचनाच्या करामतीनें मूर्त स्वरूपांत गोंवतां येते तर मग:––

पृथ्वीचा सुरलोक कीं बनवुनी टाकीन मी सत्वर !

असें होतें ! आणि असें होतें, तर किती बहार होती ! पण हाय ! दुर्दैवाची गोष्ट एवढीच, कीं, हें करण्यास कवीजवळील शब्दभांडार अपुरें, असमर्थ आणि दुर्बळ असेंच ठरतें ! असें न होतें तर हे कवीश्वर पृथ्वीचा निःसंशय सुरलोक बनविते !

'दिव्य ठिणगी' (पृ. ६८, चु. ४९). 'कल्पकता' (पृ.७२, चु. ५३). 'दूर कोठें एकला जाउनियां' (पृ. १५८, चु. १०९). 'शब्दांनो ! मागुते या !' (पृ. ८९, चु. ६३) वगैरे चुटके देखील असल्याच उदात्त कविकल्पनांनीं परिप्लुत आहेत. यांतील उतारे देण्याचा मोह उत्पन्न होतो;

पण विस्तारभयास्तव तो आवरावा लागत आहे. याला लेखकाचा नाइलाज आहे. वाचकांनीं ते मूळांतूनच वाचावे.

'फिर्याद' (पृ.१६०, चु.११०). ही फिर्याद कवीनें कवितेवर—'कवितेनें आपणाला फसविलें' असा तिच्यावर आरोप करून मांडली आहे. कवीला कवितेचें प्रथम दर्शन होणें, तिच्या रूपाला पाहून कवीनें मोहून जाणें, तिचीं गाणीं ऐकून गुंगून जाणें, कवीचें मन चोरून कवितेनें पळून जाणें, त्यामुळें कवीला वेड लागून त्याला खाणें, पिणें, निजणें गोड न लागून त्यानें रानावनांतून वणवण करीत फिरणें, वगैरे प्रसंग या कवितेंत फारच बहारीनें ग्रथित केले आहेत आणि शेवटीं:—

तूंच चित्त आधीं हरिलें,
मज आतां कां दुरि धरिलें ?
चिर चरण तुझे मीं स्मरले !
हो प्रसन्न नुरवीं खेद !

असें म्हणून कवि कवितेची विनवणी करीत आहे. यांत केशवसुतांचा कवि या नात्यानें सर्व इतिहासच ग्रथित झाला आहे, ही गोष्ट मार्मिक वाचकांच्या लक्ष्यांत आल्यावांचून राहणार नाहीं.

या वरील सर्व चुटक्यांवरून कवि, कविता आणि कविकल्पना यांसंबंधानें केशवसुतांचे काय विचार होते हें वाचकांच्या ध्यानांत येईल, आणि तसेंच त्यांच्या सर्व कृतिहि या विचारांनां साजेशाच उतरल्या आहेत, ही गोष्टहि पण निःसंशयपणें त्यांच्या प्रत्ययाला आल्यावांचून राहणार नाहीं असा आमचा समज आहे.

## [ १३ ] मनाला धीर देणारे, समाजाला व राष्ट्राला जागे करणारे व आशावाद आणि प्रयत्न—वाद यांनीं ओथंबलेले.

'फुकट दवडलेला तास'. ( पृ. ६७, चु. ४८ )
'सतारीचे बोल'. ( पृ. १३३, चु. ९५ )
'गोफण केली छान. !' ( पृ. १७६, चु. १२० )

'रूढि, सृष्टि, कलि'. ( पृ. ७३, चु. ५४ ).

'निशाणाची प्रशंसा'. ( पृ. १२७, चु. ९२ ).

'नवा शिपाई'. ( पृ. १२१, चु. ८७ ).

'स्फूर्ति'. ( पृ. ११२, चु. ७९ ).

'तुतारी'. ( पृ. ९८, चु. १०३ ).

'फुकट दवडलेला तास' (पृ. ६७, चु. ४८). गेलेला तास फुकट घालविला या विचारानें पश्चात्ताप पावून कवि खिन्न होतो, इतक्यांत दुसरा तास ह्मणतो:—

आशा आणि तिची बहीण कविता ह्या घेउनी पातला
तों मी 'तास नवा' बघूनि जवळी मोदें नमस्कारिला;
'आतां व्यर्थ रडूनि काय फळ रे?' आशा असें बोलली,
'बा, कांहींतरि गा नवीन!' कविता आज्ञापिती जाहली!

ही कविता वाचून विशेष जोमानें व उत्साहानें काम करण्याचा कोणास बरें हुरूप वाटणार नाहीं?

'सतारीचे बोल' ( पृ. १३३, चु. ९५ ) हें काव्य फारच गोड आहे. याचा मिठासपणा किती म्हणून वर्णन करावा? अंधाऱ्या रात्रीं विमनस्कपणानें कवि जात असतां त्याच्या कानीं सतारीचे बोल पडतात. पण इकडे—काय करावें, कोठें जावें, विष खाऊन मरावें कीं काय, अशी पिसाट कवीच्या मनाची स्थिति झाली असल्यामुळें त्याला सतारीचा राग येतो व तो त्वेषानें आपली मूठ वळून तोंडानें सतार वाजविणाऱ्या इसमाला उद्देशून ह्मणतो:—

× × × आटप, आटप, मूर्खा!
सतार फोडुनि टांकिसी न कां?
पिरपिर कसली खुशालचंदा,
करिसी—दिड दा, दिड दा, दिड दा!

असें पुटपुटत चार पावलें पुढें जातो, तोंच कवि त्या सतारींतून निघणाऱ्या प्रेमरसाच्या मधुर अशा ध्वनिजालांत गुंतून पडतो; व स्ववशता विसरून जवळच एका ओट्यावर—

के. ५

"× × कोपरें अंकीं टेंकुनि करांजलीला मस्तक देउनि"
बसतो व ते रसपूर्ण ध्वनि श्रवण करित असतांना त्याला आशाप्रेरक असें आश्वासन मिळतें:—

—"खेद कां इतुका करिसी ?
जिवास कां वा असा त्रासशी ?
धीर धरीं रे!–धीरा पोटीं
असती मोठीं फळें गोमटीं!
ऐक, मनींच्या हरितील गदा—
ध्वनि हे–दिड दा, दिड दा, दिड दा!"

हे आशाप्रेरक शब्द ऐकतांच कवीला 'तम, अल्प, द्युति बहु' हें उच्च सत्य पटतें व त्याला असें वाटतें, कीं, आपली स्वतःचीच विभूति—

'स्फुरत पसरली विश्वामाजी'! ॥

आणि नंतर त्याला असें वाटतें, कीं,:—

"दिक्कालासहि अतीत झालों;
उगमीं विलयीं अनंत उरलों;
विसरुनि गेलों अखिलां भेदां
ऐकत असतां–दिड दा, दिड दा!"

आणि अखेर कवीचें हृदय शांत होऊन तो घरीं परततो.

**गोंफण केली छान** (पृ. १७७ चु. १२०)–भयानक रसाचा अत्यंत भयानकपणें एकदम उठाव करणारी कवीच्या कल्पनेंतून निर्माण झालेली ही गोंफण फारच अद्‌भुत आणि चमत्कारिक आहे. कवि सत्वाच्या चोरानें आपल्याच नखांनीं आपलें हृदय फाडून त्याच्या आंतड्यांचा अपूर्व दोर वळून ही गोंफण तयार करीत आहे. या दोराला त्वेषाचा घट्ट पीळ घालून वैराची गांठ मारल्यामुळें तो पीळ कधींच उकलणार नाहीं अशी कवि योजना करीत आहे. ही अशी कधींहि दगा न देणारी, जोरदार गोंफण तयार करून तिच्यांतून कठिण शब्दरूपी धोंड्यांचा मारा करून कवि झोंपी गेलेल्या जन-

समूहाला खडबडून जागें करीत आहे. आळसांत लोळणाऱ्या आळशांनां, पोकळ तोऱ्यांत बडबडणाऱ्या घमंडखोरांनां, हांजी हांजी करणाऱ्या हराम खोरांनां, वडिलांचें श्रेष्ठत्व गाऊन स्वतः रुढकृति आचरणारांनां, मारखाऊ रडतराऊंनां, व पुढील तरुण पिढींतील तरुणांनां नादानपणा अतएव गरिबी शिकविणाऱ्यांनां तर या घोंड्यांचा मार इतका जबर दिला आहे, कीं, कांहीं पुसूंच नये! हें जीवंत कर्मवीरांचें जीवंत गाणें ऐकून कोणच्या मनुष्याला स्फुरण चढणार नाहीं? पशूनांहि तें चढेल इतका आवेश आणि जोर या कवनांत गच्च भरून राहिला आहे.

**रूढि–सृष्टि–कली** ( पृ. ७३ चु. ५४ ) रूढि राज्य करीत आहे, तिच्या जुलमी अंमलाखालीं लोक नाडले जात आहेत, तरी देखील ते सृष्टीच्या नियमाला अनुसरण्याला नाखूष असून '**शास्त्राद्रूढिर्बलीयसी**' असलीं वेडगळ मतें अनुल्लंघनीय आहेत असें मानीत आहेत. लोक ज्याला 'कलि म्हणून भितात, तो त्यांच्या बऱ्याकरितां–रूढीचा पाडाव' करण्यासाठीं–झपाट्यानें ग्रन्थप्रसार करीत आहे; तेव्हां लवकरच रूढिअक्का राम म्हणतील आणि सृष्टीला लोक भजूं लागतील असा प्रचण्ड भविष्यध्वनि कवीनें या कवितेंत काढला आहे:—

**'येवो तूर्ण कले! तुझ्या विजय तो अस्त्रांस त्या कागदी,**
**गाडूं ही मग रूढि विस्मृतिचिया त्या खोल खाड्यामधीं!**
**साधो! नांव तुझें खचीत बदलूं, बोलूं न तूंतें 'कली,'**
**जैजैकारुनि सृष्टिला, ध्वनि तिचा तो एक मानूं बली!**

यांत रूढीचा नफरत (तिरस्कार,) सृष्टीची इभ्रत व कलीची कसरत या सर्व गोष्टी कवीनें मोठ्या कुशलतेनें वाचकांपुढें मांडून ग्रन्थप्रसाराचें अचुक सामर्थ्य प्रशंसिलें आहे.

**निशाणाची प्रशंसा** (पृ. १२७ चु. ९२) या कवितेंत कवीनें निशाणाची प्रशंसा करून योद्ध्यांनां युद्धार्थ आव्हान केलें आहे:–

**" भक्ति जिथें, दिव्यत्वउत्सव जिथें, जेथें फार,**
**तेथें तेथें दिसे तुझा प्रोत्साहक आकार!**

वीर्य जिथें, ऐश्वर्य जिथें, जेथें जयजयकार,
उंचावर तेथें तेथें दिसे तुझा आकार!
म्हणूनि मानवचित्ताची उंचावर जी धांव,
तीचें चिन्हच तूं;–तुजला निशाण सार्थचि नांव!
मिळमिळीत ज्याची कविता न असे रंडागीत,
खचित जडेलचि त्या कविची तुझ्यावरी रे प्रीत!
संसारा मी समरंगणीं; उचलुनि म्हणुनि निशाण
साद घालितों–"योद्धे हो! झटुनि मोडुनि द्या प्राण!"

असली अभिमानानें व ओजस्तेजानें भरलेली कविता कोणाच्या अंगांत उत्साह उत्पन्न करून त्याला स्फुरण देणार नाहीं?

नवा शिपाई (पृ. १२१ चु. १२१॰) हा नव्या मनूंतील नव्या दमाचा शूर शिपाई गडी इतका बहाद्दर आहे, कीं, त्याला वठणीला आणण्यास कोणीहि समर्थ नाहीं. याला जात नको, पंथ नको आणि प्रदेशहि नको. याची महत्त्वाकांक्षा मोठीच बलवत्तर आहे. सर्व मानवजाति हीच याचीं भावंडें, सर्व धर्मांचा जीव हाच याचा धर्म, व सर्व विश्व हाच याचा प्रदेश! सर्व विश्वाला हा आकळून बसला आहे. मी तूं, लहान मोठे, साधु अधम, दूर जवळ, हा फरक याच्याजवळ मुळींच नाहीं. जगांतील विषम-स्थितीचा कलह कसा मिटेल हीच काय ती या बहाद्दराला चिंता लागली आहे. याचें ध्येय म्हणजे जगांत शांतीचें साम्राज्य स्थापावयाचें हेंच होय. या मर्द आणि शूर शिपायाचें हें खड्या सुरांतलें आशापूर्ण गाणें ऐकून अंतःकरणांत विश्वप्रेम जागृत होतें, आणि शांतिसाम्राज्याकडे आपले डोळे लागतात; तसेंच या वरील भावनांचा आपल्या हृदयांत प्रकाश पडतो आणि आपलें अन्तिम ध्येय काय असलें पाहिजे, याची अंतःकरणाला साक्ष पटते. असलींच उठावाचीं गाणीं आपल्या मृतदेहांत जीव घालण्याला समर्थ आहेत, व यांच्याच द्वारें राष्ट्राला नवजीवन प्राप्त होत असतें.

'स्फूर्ति' आणि 'तुतारी' (पृ. ११२ चु. ७९; व पृ. ९८ चु. ७३) या दोन्ही कविता जोडीनें बरोबर वाचाव्या, अशी आमची वाचकांना

शिफारस आहे. आपला सर्व समाज भयंकर गाढ निद्रेंत घोरत पडला आहे, याची कवीला पूर्ण जाणीव असल्यामुळें तो त्याला या कवनांच्या द्वारें खडबडून जागें करीत आहे!

रूढींचीं व जुलमांचीं भेसुर गिधाडें झांप घालण्याला आसपास टपून बसलीं असतां, अशा वेळेला जलसे कसले करीत बसलां आहांत? म्हणून कवी स्वदेशबांधवांनां सवाल करीत आहे. जागे व्हा, डोळे उघडा, व डोळ्यांवर किती भयंकर काळेकुट्ट ढग कोसळूं पहात आहेत, तें पहा, असें सांगून त्यांनां तो गाफिलगिरींतून सावध व्हा, म्हणून बजावीत आहे. तुमची पुराणप्रियता–जुन्यालाच चिकटून राहण्याची तुमची खोड–फार वाईट आहे–नव्हे, अत्यंत घातुक आहे,–असें कवि मोठ्यानें ओरडून सांगत आहे. आपल्या बांधवांनीं नेभळेपणानें, गतानुगतिकत्वानें व थिल्लरपणानें आपलें नांव गमावलें आहे, हें पाहून कवीला जरी त्वेष चढतो तरी आशा न सोडतां आपल्या बांधवांनां तो जास्त जास्त नेटानें प्रोत्साहनच देतो व रूढि, दंभ, विषमता, व जुलूम यांनीं उभारलेल्या बंडावर त्यांनीं एकदम हल्ला करावा म्हणून तो त्यांनां साद घालतो. तसेंच, नियम हे मनुष्यांकरितां आहेत, मनुष्य नियमांकरितां नाहीं, म्हणून ते नियम बेलाशक तोडा, असेंहि कवि जोरानें उपदेशितो. या कवितांतून ‘ स्वातंत्र्यतत्त्व ’ पदोपदीं कसें तुडुंब ओतप्रोत भरून गेलेलें आहे, तें पाहिलें ह्मणजे कवीच्या अंतरंगांत स्वातंत्र्याची ज्योत किती तीव्रत्वानें तेवत होती हें पूर्णपणें प्रत्ययाला येतें. अशा स्वतंत्र बाण्याच्या कवीचे हे चैतन्य व नवसंजीवन देणारे खडे बोल कोणत्या मनुष्याचा मानवी कर्तबगारीवरील विश्वास सुदृढ करून त्याला कर्तव्यतत्पर करून टाकणार नाहींत?

## [१४.] तात्त्विक व गूढ.

‘कोठें जातोस ?’ (पृ. ५० चु. ३५ )
‘कोणीकडून ?–कोणीकडे ?’ (पृ. १३७ चु. ९६)
‘म्हातारी.’ ( पृ. १४२ चु. ९८ )

'झपूर्झा !' ( पृ. १०६ चु. ५७ )

'हरपलेलें श्रेय.' ( पृ. १८३ चु. १२५ )

**कोठें जातोस?** ( पृ. ५० चु. ३५)–ही कविता फारच गोड असून, हिच्यांत साध्या व शुद्ध मराठीचें स्वरूप पूर्णपणें प्रकट झालें आहे. या कवितेंत कवीपुढें येणाऱ्या प्रत्येक मनुष्याला ' तूं कुठें जातोस ?' असा कवि प्रश्न करितो व प्रत्येक जण अमुकअमुक कामाला जातों ह्मणून त्याला उत्तर देतों. पण इतक्यांत,—

> पुढुनि दिसतें मग मढें एक येतां
> "कुठें बाबा जातोस सांग आतां ?"
> हवेंतुनि हे पडतात शब्द पाहीं
> " कुठें जातों हें मला कळत नाहीं !"

यांत आयुष्यानंतर काय गूढ आहे, हें कवीला उमगलें नाहीं, पण हें गूढ त्यानें '**कोणीकडून ! कोणीकडे**' ( पृ. १३७ चु. ९६ ) या कवितेंत उकललें आहे.

**कोणीकडून?–कोणीकडे?**(पृ.१३७ चु.९६) ही कविता फारच खोल व गूढार्थसूचक असून नवीन दृष्टि देणारी आहे. आपण कोणीकडून आलों आणि कोणीकडे जाणार? हा प्रश्न प्रत्येकापुढें उभा रहातो. पण तो प्रत्येकाला सुटत मात्र नाहीं. तो केशवसुतांसारखे ज्ञानी आणि अधिकारी कविच सोडवूं शकतात. इकडून आलों, तिकडे जाणार, येथून तेथें, तेथून येथें या उत्तरांनीं कवीचें समाधान होत नाहीं. अंधारांतून जगांत आलों, आणि जगांतून पुनः अंधारांतच जाणार; आपलें आयुष्य हें दोन्हीकडील अंधारांत परिमित काल टिकणारें ऊन आहे आणि मधुनमधून त्याच्यावर हीं संकटांचीं अभ्रें येतच असतात; यामुळें हृदयांत निराशा उत्पन्न होऊन तें उलूं लागतें. मागेंपुढें कांहींहि न दिसल्यामुळें संशयडोहांत आयुष्याची नौका हेलकावे खाऊं लागते, आणि देवा ! या जन्माच्या फेऱ्यांत कोठून आलों आणि यांतून आतां कसा सुटून जाईन, असा सारखा तो विचार करूं लागतो.

या विचाराअंतीं संशयग्रंथि किंवा भ्रमबुद्बुद फुटून दिव्य दृष्टि प्राप्त होते. मागेंपुढें जो अंधार किंवा शून्य होतें त्यांतूनच दृष्टि आल्यामुळें मागें आणि पुढें प्रकाश दिसूं लागतो व सत्य भासणारें हें मधलें आयुष्य केवळ अंधारमय दिसूं लागतें, व आपण निजधामाहून आलों असून निजधामाकडेसच परत जात आहोंत, याची स्पष्ट जाणीव त्याला एकदम उत्पन्न होते.

या कवितेंत प्रश्न, संशय, प्रयत्न व अखेरीला-दिव्य दृष्टीनें मिळालेलें उत्तर, या चारहि अवस्था कवीनें मोठ्या मार्मिक रीतीनें एकत्र ग्रथित केल्या आहेत.

म्हातारी (पृ. १४२ चु. ९८) हा चुटका अत्यंत मधुर आणि मनोहर आहे. इतका कीं, तो प्रत्येकानें वाचून त्याच्या रसास्वादानें तल्लीन होऊन डोलतच रहावें ! कवि लहान विषयावरून गहन आणि गूढ—अत्यंत गूढ—अशा वातावरणांत कल्पनेच्या भरारीबरोबर एकदम कसें उड्डाण करीत आहे, हें या कवितेवरून अगदीं स्पष्टपणें व्यक्त होतें. वाऱ्याच्या झुळकीबरोबर उडणाऱ्या म्हातारीला कवि म्हणतो, 'तुझ्या ठिकाणीं दिव्य आणि अद्‌भुत तत्त्व आहे तें—

"प्रत्यक्षांतुनि तें परोक्षीं शीघ्र मला नेतें."

कवीच्या ह्या उत्तान कल्पनेच्या वातावरणांत जाण्यास वाचकांनांहि क्षणैक वायुरूपच धारण करावें लागेल ! व केशवसुतांची प्रतिभा त्यांनां तें धारण करण्याची शक्तीहि देईल अशी आमची ठाम अटकळ आहे !

झपूर्झा ! ( पृ. १०६ चु. ५७ ) या कवितेच्या प्रसिद्धीसंबंधानें एक मौजेची गोष्ट आहे, ती आह्मांला केशवसुतांकडूनच कळली असल्यामुळें ती येथें नमूद करितों. हेतु हा, कीं, या योगें तरी या कवितेचें खरें हृद्गत वाचकांनां बरोबर कळावें. ती गोष्ट अशी:—

ही कविता लिहिल्यानंतर कवीनें ती 'करमणूक'कारांकडे प्रसिद्धीकरितां पाठविली. पण संपादकांनीं 'झपूर्झा' हा मथळा गाळून 'हर्ष खेद ते मावळले' ही कवितेची पहिली ओळ इंग्रजी पद्धतीप्रमाणें कवितेच्या मथाळ्यादाखल घातली ! ज्याअर्थी इतक्या विद्वान् आणि रसिक संपादकांनां आपल्या

कवितेचें गूढ उकललें नाहीं, त्याअर्थी आपल्याच कृतींत कांहीं तरी दुर्बोधता राहिली असेल असें वाटून कवींनीं इतरत्र ही कविता प्रसिद्धीसाठीं पाठवितेवेळीं आपल्या याच कवितेला पुढें दिलेली टीप जोडली:—

"आपणाला जें कांहीं नाहीं असें वाटतें त्यांतूनच महात्मे जगाच्या कल्याणाच्या चिजा बाहेर काढतात.त्या महात्म्यांची स्थिति लक्ष्यांत वागवून पुढील गाणें वाचल्यास, तें दुर्बोध होऊं नये असें वाटतें."

'झपूर्झा' हा शब्द कवीनें नवीनच तयार केला असून तो सांकेतिक आहे. जें वर्णन करून सांगतां येण्यासारखें नाहीं तें सर्व या शब्दानें तो व्यक्त करीत आहे. हा जादूनें भारलेला शब्द कवि–यांत्रिकानें आपल्या ऐंद्रजालिकीय टांकसाळींतून निर्माण केला आहे!

हर्ष आणि खेद, हास्य आणि अश्रु, कंटक आणि मखमल, प्रकाश आणि तिमिर या विषम अवस्थांच्या स्थितींतूनहि जो पार झाला आहे, [ आणि अशा स्थितीची बरोबर कल्पना करून द्यावयाची, म्हणजे त्या स्थितीला कांहीं तरी सांकेतिक नांव दिलें पाहिजे; तें नांव आमचे कवि 'झपूर्झा' हें देत आहेत. ] अशा महात्म्यालाच त्याला लोक मग 'वेडापिसा'हि म्हणोत– 'व्यर्थी अधिकची अर्थ, आहे,' असें भासतें. ह्या अर्थाचेहि बोल कसे? तर– 'झपूर्झा!'। त्या महात्म्याची चिद्घनचपला–'ज्ञानाच्या कुंपणावरून धीरत्व धरून, उड्डाण करून, तिला जिथें 'अंधुक आकृति तिस दिसली, त्या गातातीं निगूढ गीति, त्या गीतीचे ध्वनि निघती'–त्या ठिकाणीं जाते. आतां त्या गीतीचे ध्वनि कसे आहेत म्हणून विचाराल तर 'झपूर्झा!' 'झपूर्झा!' या एकाच सांकेतिक शब्दद्वारें ते व्यक्त करतां येतील. अशा ह्या प्रदेशांत किती तरी जमीन मोकळी पडली आहे! पण तेथें हजारांतून एकाद्याच शेतकऱ्याला लागवड करण्याची सनद मिळते! असें जरी आहे तथापि त्या दिव्य भूमींतून वनमाला घेऊन येण्याला कोणालाहि अटक नाहीं; पण हें छातीठोक काम करण्यास जाणाऱ्यानें तोंडानें जो मंत्र जपावयाचा तो मात्र :–'झपूर्झा गडे झपूर्झा!' हाच जपला पाहिजे! या सर्वांचा अर्थ

इतकाच, कीं, महात्म्यांची—अर्थात् कवींची—तंद्रा किंवा त्यांना लागणारी समाधि ही मात्र ती दिव्यमाला आणूं पहाणाऱ्यांनां लाभली पाहिजे!

पुरुषाशीं प्रकृति क्रीडा करीत असतांना त्यांचा स्वर—संयोग जाणणें हाच जर ज्ञानाचा हेतु असेल, आणि त्यांची सुंदरता आपणाला प्राप्त व्हावी अशी जर तुमची इच्छा असेल, तर तीहि सफल होईल; पण ती पूर्ण होण्याला, "झपूर्झा गडे झपूर्झा!" हें गाणें—हें दिव्य गाणें—एकसारखें गुणगुणत राहिलें पाहिजे!

चंद्र, सूर्य, आणि तारे ज्या ठिकाणीं आकाशांतील दिव्य फुलें तोडीत आहेत त्या ठिकाणीं जावयाला जर तुह्मीं इच्छित असाल, तर तेथेंहि तुह्मांला सहज—बिनअटकाव—जातां येईल; मात्र एवढें करा, कीं:—

धरा जरा निःशंकपणा
मारा फिरके
मारा गिरके
नाचत गुंगत ह्मणा ह्मणा
"झपूर्झा! गडे झपूर्झा!"

यांत कवीनें महात्म्याच्या अर्थात् कवीच्या—ठिकाणीं असणाऱ्या असामान्य समाधि—सामर्थ्याचें वर्णन केलें आहे. असलेच थोर पुरुष, असलेच थोर कवि ज्यांची 'झपूर्झा'—प्रमाणें स्थिति—झाली आहे, अर्थात् समाधि लागली आहे, तेच—जगाचें कल्याण करूं शकतात, बाकीच्यांचें सामर्थ्य ह्मटलें ह्मणजे केवळ कःपदार्थ निव्वळ बोजवार होय.

**हरपलेलें श्रेय.** (पृ.१८३चु.१२५)ही कविता कवीची शेवटली कविता होय. उदात्त बुद्धीला संसारांत राम वाटत नाहीं. अलौकिक असें जें कांहीं तिला वाटत असतें, तें तिचें हक्काचें असून देखील, त्याच्या प्राप्तीकरितां तिला सतत झुरावें लागतें, हें त्रिकालाबाधित सत्य या कवितेंत कवीनें ग्रथित केलें आहे. 'Ideal' ह्मणजे मनोनिर्मित असें जें सर्वोत्कृष्ट ध्येय तें प्राप्त करून घेण्याविषयींची हुरहुर या कवितेंत ओतप्रोत भरली आहे.

या कवितेंत कवीनें स्वतःच्याच मानसिक स्थितीचें वर्णन केलें आहे. याच कवितेला उद्देशून केशवसुतांनीं पुढील उद्गार काढले आहेत. "You can guess my state of mind from my piece in the last issue of मनोरंजन. A crab in heart! But alas! where is the restoration ?" हा चुटका ह्मणजे केशवसुतांच्या काव्यरत्नांतलें एक अमोल रत्न आहे! असो.

येथवर केशवसुतांच्या मुख्यमुख्य कवितांच्या अंतरंगाचें आम्ही आपल्या ऐपतीप्रमाणें पर्यालोचन केलें. त्यांच्या कवितांचा जो भावार्थ आम्हाला वाटला तो आह्मी आमच्या समजुतीप्रमाणें यथामति निवेदन केला. 'यथामति' असें ह्मणण्याचें कारण एवढेंच, कीं, केशवसुतांच्या गूढ कवितांतील प्रमेयें उकलणें हें काम खरोखर फारच कठिण आहे. त्यांच्या कवितांचें आम्हीं केलेलें वर्गीकरण कदाचित् चुकीचेंहि असेल, आम्ही सांगितलेल्या भावार्थापेक्षां दुसऱ्या एकाद्या रसिकाला त्यांच्या कवितांचा निराळा भावार्थ कदाचित् वाटेल. तरी देखील आपणाला त्यांच्या कवितांपासून जो बोध होतो तो रसिकांपुढें मांडण्याचा प्रयत्न करावा, याच एका सदिच्छेनें हें कार्य आम्हीं केलें आहे. वास्तविक पाहतां केशवसुतांच्या उत्तमोत्तम कवितांची पाश्चात्य कवींच्या कृतींशीं तुलना करून दाखवावयाला पाहिजे होती. पण हें काम तितकें सुलभ व सुकर नसल्यामुळें तें आम्हांला हातीं घेतां आलें नाहीं. तें केशवसुतांच्या एकाद्या रसिक व विद्वान् शिष्यानें अथवा अधिकारी अशा भक्तानें हातीं घेतल्यास केशवसुतांच्या कवितेवर अधिक प्रकाश पडून त्यांच्या कवितेचें खरें हृद्गत बाहेर पडून त्यांच्या कवित्वाचा दर्जा व महती हीं केवढी आहेत हें महाराष्ट्र वाचकांच्या निदर्शनास येईल. इतकें सांगून आतां कांहीं अवांतर गोष्टींकडे वळूं.

## केशवसुतांच्या कवितेचें बाह्यांग.

केशवसुतांच्या कवितेंत अशा कित्येक ओळी आहेत, कीं, त्या मराठींत ह्मणीप्रमाणें लवकरच रूढ होतील असें वाटतें.

उदाहरणार्थः—

'धीरा पोटीं फळें गोमटीं'
'इथें या दुःखाचें सतत मनुजाला दडपणें'.
'इथें न्यायस्थानीं अनय उघडा स्वैर फिरतो !'
'नरालागीं येथें नरच चरणींही तुडवितो!' *
'प्रौढत्वीं निज शैशवास जपणें बाणा कवींचा असे.'
'गाण्यानें श्रम वाटतात हलके, हेंही नसे थोडकें !'
'व्यवहाराची काय कसोटी प्रीतीला लावावी ?'
'प्रीती पुढती सुज्ञपणाची काय थोरवी गावी ?'
'दो हृदयांच्या संगमसमयीं कसल्या लौकिक-रीति ?'

केशवसुतांचीं सर्व स्फुट वचनें व स्फुट विचार याच पद्धतीचे आहेत. यांपैकीं प्रत्येक वचन ह्मणजे अर्थपूर्ण अशी एकेक ह्मणच आहे. उदाहरणार्थः—

'बोल लावितो दैवास, त्यास म्हणावें का पुरुष ?'
'आधीं भर बांगड्या करीं मग हात कपाळावर मारीं.'
'काय निराशा असे बरें ? बुजग बाहुलें जगांतलें.'
'स्वकीय ज्याला लेखावें त्या न कधीं अन्तर द्यावें.'
'पैशासाठीं जीव देई ! त्याचा सौदा सस्ता नाहीं.'
'हृदयांतून न जे बोल निघती ते सगळे फोल !'

'कांट्यावांचुनि गुलाब नाहीं' या कवितेंतील प्रत्येक ओळ अशी ह्मणीच्या स्वरूपाचीच आहे.

## शब्द.

केशवसुतांच्या कवितेंत, रूढ नसलेले असे शब्द व आपणांला ग्राम्य वाटणारे असे शब्द बरेच आहेत. पण मृत शब्दांनां जीवंत करणें व आजकाल ग्राम्य ह्मणून त्याज्य वाटणाऱ्या शब्दांनां त्यांच्या पूर्वींच्या योग्य स्थानीं

---

* याच्याशीं सदृश असे पुढील उद्गार आहेतः—
" What man has made of man."—Wordsworth.

बसवून त्यांचा उद्धार करणें, हेंहि केशवसुतांचें एक कार्य होतें असें दिसतें. केशवसुतांसारख्या भाषेवर प्रभुत्व मिरविणाऱ्या लेखकाकडून असले शब्द-प्रयोग उपयोगांत आणले जावे याचा हेतु यावांचून अन्य कांहीं असेल, हें संभवत नाहीं. अशा शब्दांचे कांहीं मासले खालीं दिले आहेत:—

'पढीक,' 'बूज,' 'काडीवजा,' 'लकडी,' 'कुपी,' 'रखाडी,' 'लटकुनी,' 'मुदली,' 'चुथडवूं,' 'अंतुरी,' 'धक्काबुक्की,' 'चलाख,' 'टपका,' 'वस्ताद,' 'चीज,' 'मेरी जान', 'गुलनार,' 'गद्धा,' 'अडक फडक,' 'राऊत,' 'विरुद,' 'कीजे,' 'टांक,' 'भंडें,' 'बुजगबाहुलें' वगैरे वगैरे.

## वृत्तें.

जुन्या मराठी कवींनीं संस्कृत छंदःशास्त्राचा अवलंब केला, पण केशव-सुतांनीं काव्यकल्पना व कवितेचा विषय या दोहोंनां अनुरूप अशा वृत्तवैचित्र्याची कास धरिली. मराठी वृत्तांत भर घालणें व त्यांनां लवचिक-पणा आणणें असें दुहेरी कार्य केशवसुतांनीं फारच कुशलतेनें आणि उत्तम तऱ्हेनें बजाविलें आहे.

## कवितेचा मथळा.

कवितेला ' मथळा ' किंवा तिला नांव देण्याची हातोटी त्यांनां फारच उत्कृष्ट साधली होती. पण जेव्हां जेव्हां हें त्याच्या मनाजोगें साधत नसे तेव्हां तेव्हां ते आपल्या कवितेची पहिली ओळच—कांहीं इंग्रजी कवितांच्या पद्धतीप्रमाणें—मथळ्यादाखल देत असत.

## कल्पना.

केशवसुतांच्या काव्यांत एकाच कल्पनेची ज्यांत पुनरुक्ति झाली आहे असें एकच स्थळ आह्मांला आढळलें, व त्याचा आह्मीं वर उल्लेखहि केलाच आहे. अलीकडील कवींच्या काव्यांत पुनरुक्तिदोषाचा असा अभाव कितपत सांपडेल याची शंकाच आहे ! या एकाच गोष्टीवरून केशवसुतांच्या अत्यंत समृद्ध, प्रतिभासंपन्न व कल्पक डोक्याची आपणाला चांगलीच साक्ष पटते. त्यांची कल्पनाशक्ति फारच दांडगी आणि स्वैरसंचारी होती. त्यांच्या काव्यांचे विषय इतके निरनिराळे आहेत, कीं, त्या विषयांचें वैचित्र्य

पाहून त्यांच्या विशाल बुद्धीचें व दिव्य दृष्टीचें कौतुक वाटून मनुष्य आश्चर्यानें थक्क होऊन जातो, व त्याची बुद्धि कुंठित होते. केशवसुतांच्या कवितेचा असा विलक्षण प्रभाव आहे, आणि ह्मणूनच त्यांच्या ठिकाणीं कवींनांहि शिकविण्याची अजब पात्रता आलेली आहे.

## उपसंहार.

येथवर केशवसुतांचें त्रोटकसें चरित्र देऊन त्यांच्या कवितासंग्रहाचें यथामति संक्षेपानें पर्यालोचन केलें. आतां शेवटीं उपसंहारादाखल केशवसुतां-संबंधीं अर्वाचीन कविशिरोमणि श्रीयुत नारायण वामन टिळक आणि रसिकाग्रणी श्रीयुत डॉ. गुणे या उभयतां थोर गृहस्थांनीं जे प्रशंसोद्गार काढले आहेत ते येथें देऊन आणि त्याचप्रमाणें काव्यरत्नावलीच्या २२ व्या पुस्तकाच्या १९ ते २१ या पृष्ठांवर "केशवसुत-स्मरण" या नांवाची जी एक "**नारायण**"–कवीची कविता आली आहे, तिच्यांतून कांहीं भाग उद्धृत करून, ही बरीच लांबलेली लेखमाला पुरी करूं.

श्रीयुत टिळक ह्मणतातः—

" केशवसुत स्वभावानें निःस्पृह, बाणेदार व करारी होते, हें त्यांच्या 'कवितेचें प्रयोजन,' 'दुर्मुखलेला विद्यार्थी,' 'आम्ही कोण' व 'दोन बाजी' या कवितांमधून दिसून येतें. हांजी हांजी करणें तर त्यांनां मुळींच खपत नसे. 'सांप्रत गाण्यास किंवा काव्यास मान राहिला नाहीं,' असें एकाकडून ऐकतांच, त्यांनीं तत्काल "**त्यांनां मान नसे, नसो; पण अतां त्याची अपेक्षा नसे,**" असें निर्भीडपणें उत्तर दिलें ! जेथें त्यांचा परिचय नसे तेथें त्यांची संकोचवृत्ति दिसत असे. एका मुलीला रांगोळी घालतांना पाहून तिनें त्यांत घडवून आणलेल्या स्वर्भूसंगानें थक्क होऊन तिला—

**'नातें, स्नेह, निदान ओळख जरी येथें मला आणिती**
**होतों मी तर पाद सेवुनि तुझे रम्य स्थळीं या कृती'**

अशी उत्कट इच्छा कवि प्रदर्शित करतो; पण येथें वरीलपैकीं कोणतीहि गोष्ट नसल्यामुळें—

**‘ जा मार्गें अपुल्या, न दृष्टि कर, जा, द्वाराकडे वांकडी ’**

अशा प्रकारच्या रांगोळींतील सुदर्शनाचा भाव समजून, कवि निमुटपणें आपल्या घराची वाट धरितो !

“ त्यांचें स्वत्वावरील प्रेम हें ‘ नैर्ऋत्येकडील वारा ’ या कवितेंत व्यक्त होतें. त्यांची शुद्ध व सात्त्विक प्रीतीविषयींची उदात्त कल्पना ही ‘ प्रीति ’ व ‘ कविता व प्रीति ’ या काव्यांमध्यें; आपलें पत्नीविषयक पवित्र कर्तव्य हें ‘प्रियेला सादर केलेली पुष्पमाला’ यांत; आपल्या अंगावर पडलेल्या उच्च कर्तव्याची जाणीव ही ‘ आम्ही कोण?’ या कवितेंत; रूढि, जुलूम यांच्या राक्षसी संतानांनीं होरपळलेल्या समाजाला आपलें नुकसान किती झालें आहे व होत आहे याची ओळख, तसेंच जुन्याला चिकटून नव्याला धिकारणाऱ्यांनां ‘ जुनें जाऊं द्या मरणालागुनि, ’अशी खडखडीत वाणी आपणाला ‘तुतारी’ या सर्वोत्कृष्ट कवितेंत सांपडेल. ‘ निशाण ’ या कवितेंत त्यांची कळकळ, ‘ हरपलें श्रेय ’ या कवितेंत मनाला लागून राहिलेली तळमळ, ‘ भृंग ’ कवितेंत गुंगीविषयीं उत्कण्ठा, ‘ झपूर्झा ’ यांत कवीची अविकृत स्थिति, यांचा वाचकांनां तेव्हांच प्रत्यय येतो. अगदीं परिचयांतील साध्या व सरळ गोष्टी आणि त्यावरून सुचणारे ईश्वरी शक्तीचे व मानवी कर्तव्याचे विचार काव्यद्वारानें प्रकट करणें हें केशवसुतांचें हातखंडा काम असे. केशव–सुत हे मोठे कुशाग्र बुद्धीचे जातिवंत कवि होते, याची साक्ष एकट्या ‘म्हातारी ’ या कवितेवरून होण्यासारखी आहे. ”

**श्रीयुत डॉ. गुणे** लिहितातः—

. “ ‘ स्वतंत्रतेचे शाहीर ’ या नात्यानें ते आंग्लकवि ‘ शेली ’ व जर्मन कवि ‘ शिलर ’ यांच्या तोडीचे आहेत यांत बिलकुल संदेह नाहीं. *** अचाट कल्पनाशक्ति, प्रचंड निरीक्षण, पराकाष्ठेची सहृदयता, प्रासादिक वाणी, भाषेवरील प्रभुत्व, तिला वाटेल तशी लववावयाचें सामर्थ्य–व आपणाला आपल्या देशबांधवांनां सृष्टीचा–परमेश्वराचा उदात्त संदेश सांगावयाचा आहे ही दृढ भावना, ही महाकवि होण्याला लागणारी सामग्री केशवसुत यांच्यामध्यें होती. परिस्थिति, अल्प आयुष्य, व आणखी कांहीं

अडचणी त्यांच्या पूर्ण विकासाला प्रतिबन्धक झाल्या असतील; पण स्वतःला ' महाकवि ' होतां आलें नाहीं तरी–भावी महाराष्ट्र महाकवीचा मार्ग त्यांनीं मोकळा करून ठेवला आहे, यांत शंका नाहीं ! ''

## केशवसुत–स्मरण.

कवि–नारायण.

( आर्या )

कोण ' तुतारी ' फुकुनि रसिकांचें हृदय खोल हालविल ?
घालविल भ्रम मनिंचा दुःखामध्येंहि मोद कालविल ?
वा ' वातचक्र ' फिरवुनि पवनाला उंच दिव्य आकाशीं
मारिल कोण भरारी ! कीं केवळ ती कला तुझ्यापाशीं !
त्वत्काव्यमेव अमृतचि वर्षे, त्या जन अधाशिसा प्याला
आकंठ नित्य, न तरी सेवुनियां कविवरा कधीं धाला !

* * *

राजी करील कविता ऐसा निपजेल कां दुजा गाजी ?
झाले कविही, असती सांप्रत, होतीलही पुढें फार.
**केशवसुता** परि तुझ्या कवितेचें कोण ओळखिल सार?
अधुनिक कविवृंदाचे पात्र खरा व्हावयास तूं राज्य
त्याज्य तुझ्या कवितेच्या रसापुढें स्वर्गिंची सुधा प्राज्य.
पूज्य मला सर्वहि, परि आम्राची सर न पावतां गरुड
केवळ सपक्ष सारे, **नभगामी तूंच एकला गरुड !**

(काव्यरत्नावलि पुस्तक २२ वें, पृष्ठें १९ ते २१)

या आमच्या चिमुकल्या निबंधानें ''केशवसुतां''ची कविता कशी काय आहे तें वाचून पाहण्याची उत्कट इच्छा एकाद्या व्यक्तीला जरी झाली तरी तेवढ्यानेंहि आमच्या श्रमाचें चीज झालें, असें आह्मी समजूं. पण आमचा असा होरा आहे, कीं, या लेखानें केशवसुतांचे इतर मित्र जागे होतील, त्यांचे चहाते आणि भक्त यांचीं अंतःकरणें क्षणैक कां होईनात–त्यांच्या देवते-

वरील भक्तीनें आणि प्रेमानें सद्गदित होऊन जातील, त्यांनां ' तुतारी–मंडळा'च्या संघटनेची पडणारी विस्मृति नाहींशी होऊन ते जागृत होतील, आधुनिक महाराष्ट्र कविवर्गाच्या कवितेवर निष्कारण तोंडसुख घेणारांच्या तोंडाला थोडी तरी खीळ बसेल, व वेळींअवेळीं आधुनिक कवींच्या उपहासाचे येणारे प्रसंग टळतील. पण ही गोष्ट देखील कालानेंच ठरणार आहे, ह्मणून त्या संबंधानेंहि येथें अधिक विस्तारानें लिहिण्याचें प्रयोजन नाहीं.

येथपर्यंत केशवसुतांच्या पवित्र काव्योद्यानांत विहार करून त्यांच्या आत्म्याशीं एकजीव होणाचा आह्मीं हा अत्यंत आवडीचा आणि प्रेमाचा अल्पसा प्रयत्न केला आहे. या प्रयत्नापासून दूर होण्याची कल्पनादेखील आम्हांस उद्वेगजनकच वाटत आहे! पण-'एकजीव होऊं पाहणारे आत्मे सदैव एकमेकांच्या स्मृतीच्या आनंदांतच आनंद मानून राहतात,' ह्या आप्तवाक्यावर विश्वासून, शेवटीं केशवसुतांच्या आत्म्याला परमपदाची प्राप्ति लाभो, अशी त्या परमेश्वराजवळ अनन्यभावें प्रार्थना करून येथेंच विराम पावतों.

ॐ शांतिः शांतिः शांतिः

१६२४

* हा [illegible] येथील ' महाराष्ट्र साहित्य सभे'पुढें ता. २५ मे १९१८ रोजीं प्रथम वाचण्यांत आला होता. हा लिहिते वेळीं केशवसुतांसंबंधीं खालील लेखांचा प्रस्तुत लेखकाला उपयोग झाला आहे:—

1. 'मा. मनोरंजन,' पु. ११ वें, भा. ७ वा. 'केशवसुत'
2. ,, ,, ,, २३ वें, भा. ४ था. केशव–कविता
3. 'उषा' वर्ष ३ रें. जुलै, सप्टेंबर व ऑक्टोबरचे अंक.
4. 'काव्यरत्नावली' 'सालअखेर १९०५,
5. ,, १९१७ अंक पहिला.

# शुद्धिपत्र.

| पृष्ठ. | पंक्ति. | अशुद्ध | शुद्ध. |
|---|---|---|---|
| [illegible] | २१ | crab | crack |
| [illegible] | २८ | जन | गत |
| [illegible] | —'दंवाचे थेंब' हें २९ व्या ओळी नंतर समजावें. | | |
| २९ | ११ | आशीर्वाद | आशावाद |
| २९ | १७ | कळवूं | वळवूं |
| ४६ | २७ | रूधन | धरून |
| ५० | २१ | मुलांना | मुलाला |
| ६७ | १८ | गाढूं | गाडूं |
| ६७ | २१ | रूढीचा | रूढीची |
| ६७ | २६ | उत्सव जियें, | जियें उत्सव |
| ७४ | ४ | crab | crack |
| ७४ | ५ | res toration | restorative |
| ७६ | ८ | मंढें, | मढें |
| ८० | ८ | होणाचा | होण्याचा |

REFBK-0001624